

For Members only

ज्येष्ठांनी ज्येष्ठांसाठी
प्रत्यक्ष सहभागातून चालविलेले
नृपो सदस्यांचे एकमेवाद्वितीय

# नृपोजगत्

संपादक - प्रा. सौ. वैदेही कुलकर्णी

वासंतिक
अंक
मे २०२२

छायामन्यस्य कुर्वन्ति तिष्ठन्ति स्वयमातपे।
फलान्यापि परार्थाय वृक्षाः सत्पुरुषा ईव।।

House Journal of Non Resident Indians' Parents' Organisation, Pune



संपादक
**प्रा. सौ. वैदेही कुलकर्णी**
**9370147497**

**ज्ञान, साधना, मनोगत व**
**मनोरंजन यात**
**रमणाऱ्या नृपोच्या ज्येष्ठ**
**रसिकांचे हे नृपोजगत् !**

## Form IV (Rules) NRIPOJAGAT

Place of Publication : Pune
Periodicity of Publication : Quarterly
Publisher's Name & Address
**Suresh Kango**
6, Phule Chambers,
Shivdarshan Chowk, Parvati,
Pune 411 009.
**E-mail :** nripoho@yahoo.co.in
**Website :** www.nripopune.org
Name of the Organisation which
owns the Publication
**Non Resident Indians' Parents' Organisation, Pune.**
(Founded on 11th June, 1994)
Registered vide Certificate
No. Maharashtra 9965-67
Pune Dated 14th February, 1995

### संपादकीय व व्यवस्थापन कमिटी

संपादक - वैदेही कुलकर्णी
नृपो अध्यक्ष - सुरेश कानगो
नृपो सेक्रेटरी - सुभाष कुलकर्णी
मुद्रित शोधन - वैदेही कुलकर्णी
भालचंद्र कुलकर्णी

अक्षर जुळणी व मांडणी
गुड प्रिंटस्
४१३ गुरुवार पेठ, पुणे ४२.
☎ ०२० २४४६६११४

खासगी वितरणासाठी फक्त

# NRIPO EXECUTIVE COMMITTEE 2019-2022

PRESIDENT



Mr. Suresh Kango
9527048866

VICE PRESIDENT



Mr. Suresh Natu
9763704815

SECRETARY



Mr. Subhash Kulkarni
9881237586

TREASURER



Mrs. Padma Paranjape
9403185007

JT. TREASURER



Mr. Diwakar Lele
9403356819

JT. SECRETARY



Mr. Vasudeo Kench
9822648354

## MEMBERS



Mr. Prakash Kulkarni
9422000795



Mr. Rajendra Mahulkar
9822773020



Mr. Bhalchandra Kulkarni
9822051830



Mr. Vidyadhar Deshpande
9867621272



Mr. Ashok Deshpande
7030197878



Mr. Prakash Gadgil
9850881408



Adv. Shanta Divan
9423562635

# अंतरंग


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | संपादकीय .... | | 2 |
| 2. | President's Address | | 3 |
| 3. | Secretary's Report | | 4 |
| 4. | कश्यप ऋषींचे काश्मीर | सुहासिनी देशपांडे | 5 |
| 5. | निवृत्ती नंतरची प्रवृत्ती | विजय माजगावकर | 8 |
| 6. | वाचकांचा अभिप्राय | | 9 |
| 7. | एक अनुभवलेला थरार | डॉ. पुष्पा पिंपळनेरकर | 11 |
| 8. | मुक्त – मुक्ताई | डॉ. सीमा दाबक | 12 |
| 9. | अविस्मरणीय 'राजबाग' | बी. बी. कुलकर्णी | 15 |
| 10. | लँडलाईनचे दिवस | अंजली देशपांडे | 17 |
| 11. | अन्य नसे पर्याय | सुधाकर सुदामे | 18 |
| 12. | NRIPO VISION 2022 | Rajendra Mahulkar | 19 |
| 13. | बुऱ्हाणपुर येथील आश्चर्यकारक जलव्यवस्थापन | शरद द. मांडे | 21 |
| 14. | धाव घेई देवा आता ..... | सुधाकर सुदामे | 25 |
| 15. | पुन:श्च हरि ॐ | श्रीकांत मेहेंदळे | 26 |
| 16. | Colour | Anoushka Dev | 27 |
| 17. | डॉ. आशुतोष कोतवाल: एक अलौकिक भौतिकशास्त्रज्ञ | अलका गर्दे | 28 |
| 18. | मीपण माझे.... | विजय माजगावकर | 29 |
| 19. | आधुनिक तरूणीची कैफियत | मनिषा बोरा | 31 |
| 20. | Blossom into Godhood | Vaidehee Kulkarni | 31 |
| 21. | आमचे अण्णा आजोबा | डॉ. कमला संखे | 32 |
| 22. | मला वाटते | डॉ. पुष्पा पिंपळनेरकर | 33 |
| 23. | On Lighter Side | | 33 |
| 24. | एक आदर्श व निष्ठावान शिक्षक – प्रा. डॉ. विश्वनाथ दादाराव कराड | विद्याधर देशपांडे | 36 |
| 25 | मायलेकी | मनिषा बोरा | 38 |
| 26. | पुस्तक प्रकाशन समारंभ – स. रा. पटाईत | दीपा झानपुरे | 39 |
| 27. | मानवंदना फुलासारखी | प्रभाकर कुलकर्णी | 40 |


**मासिकातील लेखात व्यक्त झालेल्या विचारांशी वा त्याच्या खरेपणाशी संपादक आणि संपादकीय समिती सहमत असतीलच असे नाही. ही त्या त्या लेखकाची वैयक्तिक जबाबदारी असेल.**



# संपादकीय ....

सर्व ‘नृपो’ सभासदांना विनम्र अभिवादन !

नोव्हेंबर २०२१ मधे 'नृपोजगत्' ची संपादिका या पदाची सूत्रे हाती घेतली व ठरविल्याप्रमाणे १४ जानेवारी २०२२ या मकर संक्रांतीच्या पवित्र दिवशी आपला चालू वर्षीचा पहिला अंक प्रकाशित झाला.

मध्यंतरीच्या कोरोनाच्या पुन्हा आलेल्या लाटेमुळे अंक सभासदांपर्यंत पोहोचण्यास विलंब झाला. काहींना अंक अद्याप प्राप्त झालेला नाही, ही खेदाची बाब आहे. त्यासाठी कार्यकारिणी समितीच्या वतीने क्षमस्व !

तथापि मी संपादित केलेल्या पहिल्याच अंकाचे चहूकडून झालेल्या स्वागताने व कौतुक वर्षावाने अत्यानंद झाला व पुढे काम करण्याचा उत्साह द्विगुणीत झाला.

सदर अंक प्रकाशित करण्यासाठी व सभासदांपर्यंत पोहोचवण्यासाठी अध्यक्ष श्री. कानगो, सचिव श्री. कुलकर्णी, खजिनदार श्रीमती परांजपे व माझे पती श्री. बी. बी. कुलकर्णी यांची खूप मदत झाली. त्यांची मी मनापासून आभारी आहे. सर्व सभासद लेखक व कवी यांचे पण मनापासून आभार. वर्षातील दुसरा अंक मे २०२२ च्या अखेरीस ‘वासंतिक अंक’ म्हणून प्रकाशित करीत आहे.

हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे भारतात माघ आणि फाल्गुन या महिन्यांत वसंत ऋतू असतो. वसंताचा उत्सव हा निसर्गाचा उत्सव आहे. सतत सुंदर भासणारा निसर्ग वसंत ऋतूत सोळा कलांनी फुलून उठतो. यौवन हा जर आपल्या जीवनातील वसंत असेल तर वसंत हे सृष्टीचे यौवन आहे. महर्षी वाल्मीकींनी रामायणात वसंत ऋतूचे अतिशय सुंदर व मनोहारी चित्रण केले आहे. भगवान श्रीकृष्णानेही गीतेत 'ऋतूनाम कुसुमाकरः' असे म्हणून ऋतुराज वसंताची बिरुदावली गायली आहे. कवीमन तर वसंत ऋतूचे वर्णन करताना थकतच नाही.

सतत आकर्षक वाटणारा निसर्ग वसंत ऋतूमध्ये लोभस बनतो. मानवाने स्वतःच्या स्वस्थ प्रकृतीसाठी निसर्गाच्या सान्निध्यात गेले पाहिजे. निसर्ग एक अशी अजब जादू आहे की, तो मानवाला त्याच्या सर्व वेदनांचे तात्काळ विस्मरण करवितो. निसर्गाचे सतत सान्निध्य मानवी जीवनावर चिरगामी परिणाम करते.

निसर्गात अहंशून्यता असते आणि म्हणूनच तो ईश्वराच्या अधिक जवळ आहे. याच कारणामुळे निसर्गाच्या सान्निध्यात गेल्यावर आपण ईश्वराच्या अधिक जवळ गेलो आहोत, असा अनुभव येतो.

निसर्ग सुखदुःखाच्या द्वंद्वापासून दूर आहे. वसंत असो अथवा वर्षा, वेगवेगळ्या रूपात ईश्वराचा हात सृष्टीवर फिरत असतो आणि समग्र निसर्ग फुलून उठतो. जीवनातही जर ईश्वराचा स्पर्श झाला तर संपूर्ण जीवनच बदलून जाईल, जीवनात वसंत फुलून उठेल आणि जीवनातून दुःख, दैन्य, दारिद्रय क्षणभरात दूर होईल. ईश्वरस्पर्शी जीवनात नेहमी एकच ऋतू असतो आणि तो म्हणजे वसंत!

वसंताचा उत्सव हे अमर आशावादाचे प्रतीक आहे. वसंताचा खरा पुजारी जीवनात कधीच निराश बनत नाही. वसंत म्हणजे आशा व सिद्धी ह्यांचा सुंदर संगम, कल्पना व वास्तवता ह्यांचा सुगम समन्वय. जीवन व वसंत ज्याने एकरूप करून टाकले अशा मानवाला आपली संस्कृती संत म्हणते. ज्याच्या जीवनात वसंत फुलतो तो संत !

धन्यवाद !

**प्रा. सौ. वैदेही कुलकर्णी**

संपादक



# President's Address

My Dear NRIPO Family Members,

It is my pleasure to meet and greet you all thru this new issue of NripoJagat.

It is a matter of pride for us to place this special "Vasantik Issue" in your hands on the occasion of our Vasantik Melawa. This has been made possible because of the persistent efforts of our able editor Mrs. Vaidehee Kulkarni. The precise timing that is achieved in bringing out this issue is admirable.

As I had mentioned in my address ,in the previous issue of NripoJagat, winds of change are blowing in NRIPO. After remaining dormant for nearly 2 years due to COVID 19 pandemic, we have geared up the activities in Nripo since all the restrictions are now removed. Our annual Melawas, Group Meetings, Picnics have started as in the past.

I would like to mention a few changes that are on the cards. We are thinking of shifting from our old office to a new one. The present office located on the third floor is not convenient for most of the EC members and also our visitors. Besides there is no parking space available. This change may come into reality if we are able to cross some legal and financial hurdles.

Secondly, to facilitate smoother working we intend to recast our group set up. We want to form 4 or 5 zones by amalgamation of adjoining groups and thereafter hold cluster meetings zonewise. A detailed report for this is awaited

A special mention must be made of the NRIPO Vision 2022 workshop arranged for EC members recently. Exhaustive discussions were held in it on various subjects like finance, group activities, office administration etc. as regards NRIPO. This workshop was a grand success and will benefit NRIPO in the long run.

Finally, I sincerely thank all my NRIPO Family Members for their active participation in our activities and the continued support they have given all these years and I am sure that the same will be continued in the coming years also.

Please take care of your health and remain happy and cheerful.

Thanks and Regards,

**Suresh Kango**
President, NRIPO

# Secretary's Report



Greetings!
Dear Members,

I am happy to submit this report for our latest Nriprojagat. Before proceeding further I must congratulate Mrs. Vaidehee Kulkarni who took charge from Mr. Sadashiv Patayeet as Nripojagat Editor. She has received very good response from members for her commendable work for her very first Nripojagat issue. I strongly believe, she will continue her good work in future too.

I wish to inform you that, recently we took age wise survey of our members and found that more than 50% of members are above 75 and less than 10 members are below 60 years of age. This is very alarming situation for the executive committee. With growing age some committee members have difficulty in climbing stairs to NRIPO office, parking space scarcity is also there. Considering these practical difficulties the committee has come to the conclusion that it is necessary to change the office location, at the earliest. It should be convenient to all committee members as well as for members who visit the office. We would like to make an appeal to all the members to suggest a suitable alternative place.

We have scheduled our Vasantic Melava on 29$^{th}$ May 2022. Many NRIPO groups have shown their willingness to perform in it. I highly appreciate the respective group leaders and members for this great initiative and keen interest in NRIPO programmes.

Recently, all committee members had one day workshop for discussion on various present and future issues in view of past decisions taken for working of NRIPO and changing some strategies to be in line with modern times. Members' spouses also attended this workshop. Many thanks to Mr. Mahulkar for arranging such a visionary workshop. Broad information of proceedings of workshop you will find in this Nripojagat issue.

Lastly, I would like to bring to your notice that the tenure of the current executive committee will come to an end, in December 2022. New committee will be formed and will start functioning from January 2023. It is earnest appeal to the NRIPO members to come forward to join Executive Committee. I also request all members to communicate with committee members for their suggestions, new activities, achievements, innovative ideas to make NRIPO more vibrant.

I would like to inform you that we have changed application form for NRIPO membership from this year. The changed format highlights the services offered by NRIPO, which certainly will attract new members. Similarly, the rates of subscription are changed. The advertisement rates for Nripojagat, fees for sponsoring the various functions, stalls, displaying the banners are also revised to strengthen the financial status of the organization.

**Subhash Kulkarni**
Secretary, NRIPO

# कश्यप ऋषींचे काश्मीर

– सुहासिनी देशपांडे
7030197878, ग्रुप नं. १४

काश्मीरचा इतिहास अतिप्राचीन आहे. या ठिकाणी सापडलेले प्राचीन भवन, खंडहर, स्तूप, विहार, मंदिरे यांसारख्या पुरातत्त्वीय साधनांच्या सहाय्याने आपल्याला काश्मीरच्या इतिहास संबंधी बरेचसे अनुमान लावता येते. याशिवाय 'राजतरंगिणी', 'नीलमत' पुराण, चीनी प्रवासी 'फ़ाहिएन' याचे प्रवास वर्णन अशी लिखित साधने सुद्धा काश्मीरच्या इतिहास विषयी बरीच माहिति पुरवितात. यापैकी कवी कल्हणाच्या राजतरंगिणी विषयी विस्ताराने यथावकाश पाहू या. पुरातत्त्वीय साधनांखेरीज विनयादित्य, यशोवर्मन, राणी जिद्दा अशा विविध राज्यकर्त्यांची सापडलेली नाणी, शिलालेख ही सुद्धा काश्मीरचा इतिहास जाणून घेण्याची साधने आहेत. या शिवाय स्थानिक लोकांनी, परंपरांनी जतन केलेल्या आख्यायिका, दंतकथा, लोककथा वा लोकवाङ्मय यांचाही उपयोग काश्मीरचा इतिहास जाणण्यासाठी करता येतो.

भगिनी निवेदितांनी म्हटलं आहे की भारताचा इतिहास जाणून घेण्याचा सर्वात उत्तम मार्ग म्हणजे प्रवास. विविध नगरांना, गावांना भेटी दिल्या असता आपल्याला त्या गावाच्या वा शहराच्या किंवा तेथील अनेक स्थानांचा संबंध प्राचीन काळाशी, विशेषतः रामायण व महाभारताशी असल्याचे दिसून येते. दंतकथा, आख्यायिका वा पुराणकथा यांच्या खुणा वास्तवातही आढळतात, तेव्हा कधी कधी आपण चक्रावून जातो. काश्मीरच्या बाबतीतही आपल्याला हा रोचक अनुभव येतो.

काश्मीरची स्थापना कश्यप ऋषींनी केली असे 'नीलमत पुराण' तसेच राजतरंगिणी मधून आपल्याला समजते. कोण होते हे कश्यप ऋषी ?

कश्यप ऋषी हे ब्रह्मदेवांच्या मानसपुत्रांपैकी एक- मारीची ऋषींचे पुत्र होते. मारीची हे सप्तर्षींपैकी एक ऋषी होते. मारीची आणि कर्दम ऋषींची कन्या कला यांच्या पोटी कश्यपांचा जन्म झाला. कश्यपांना प्रजापती असेही म्हणतात. तार्क्ष्य, अरिष्टनेमी अशा इतरही नावांनी ते ओळखले जातात. तुम्ही अथर्वशीर्ष म्हणत असाल तर पहिल्या शांतीमंत्रातच 'स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमि..' ही दोन्ही नावे आढळतील..! कश्यपांचे गुरु म्हणून अग्नीकडे निर्देश केला जातो. तर कश्यप हे विभांडक मुनींचे गुरु. विवस्वान हा कश्यपांचा एक पुत्र.

कश्यपांनी दक्ष प्रजापतीच्या १३ कन्यांशी विवाह केला आणि त्यांच्या पासून विविध प्रकारच्या सृष्टीची निर्मिती केली, अशी मान्यता आहे. दिती, अदिती, दनु, काला, दनायू, सिंहिका, क्रोधवशा, प्रधा, विश्वा, विनिता, मुनी, कद्रू, सुरभी, सुरमा, इला, काष्ठा वगैरे. यापैकी दितीपासून दैत्य निर्माण झाले, अदितीपासून देव आणि बारा आदित्य निर्माण झाले. देवराज इंद्र सुद्धा अदितीचा पुत्र. दनु, दनायु, काला यांच्यापासून दानव, राक्षस यांची निर्मिती झाली. सिंहिका पासून सिंह व्याघ्र, तर विनिता पासून गरुड आणि अरुण (सूर्याचा सारथी) यांची उत्पत्ती झाली. तर कद्रूने साप व नागांना जन्म दिला. सुरभीपासून गौ आणि महिष जन्मले, तर सुरमा पासून श्वानादी पशु, इला पासून वनस्पती, झाडे, वृक्ष, लता, अन्न यांची निर्मिती झाली. तर मुनीपासून 'मनु' अर्थात मानव सृष्टी जन्माला आली. थोडक्यात कश्यप मुनी हे उद्भिज, स्वेदज, अंडज आणि जरायुज अशा सर्व प्रकारच्या प्राणी सृष्टीचे जनक. म्हणजे देव-दानव-मानव-राक्षस-दैत्य-सर्प-नाग-गरुड वगैरे प्राणी सारे आपण भाऊ भाऊ आहोत कारण आपला पिता एक आहे. आणखी एक महत्त्वाचे, एखाद्या व्यक्तीला जर त्याच्या गोत्राचे नाव माहिती नसेल तर तीर्थक्षेत्री वा धार्मिक विधी करताना पौरोहित्य करणारे त्याला सांगतात,'गोत्रनाम माहिती नसेल तर कश्यप गोत्र सांगा', त्याचे कारण उलगडेल.

कश्यप ऋषींनी काश्मीरची स्थापना केली असे उल्लेख नीलमत पुराण, राजतरंगिणी यांमध्ये आहेत. कश्यपांच्या नावावरून त्या प्रदेशास काश्मीर हे नाव मिळाले. याची पूर्वपीठीका अशी सांगतात की पूर्वी हा प्रदेश म्हणजे प्रचंडकाय सरोवर होते. येथे सती पार्वती आणि भगवान शिव नौकाविहारासाठी येत असत. त्यामुळे याला 'सतिसर' म्हणजे सतीचे सरोवर किंवा सतिदेश असे नाव होते. या सरोवराच्या उत्तर भागात येथील मूलनिवासी नाग, कश (खश) लोक राहत होते. याशिवाय ऋषी-मुनी तपस्या करीत होते. पुढे येथे जलोद्भव नावाच्या राक्षसाचा जन्म झाला. याने ब्रह्मदेवाकडून वरदान प्राप्त केले होते की पाण्यामध्ये असताना त्याला कोणीही मारू शकणार नाही वा इजा करू शकणार नाही. यामुळे लवकरच तो मदोन्मत्त झाला आणि त्याने मूळ निवासींना, तपश्चर्येत रमलेल्या ऋषी-मुनींना पीडा देण्यास सुरुवात केली. लोकांना सतवावे आणि

सतिसरमध्ये दडून बसावे असा आतंक मांडून त्याने लोकांना 'त्राहि भगवान' करून सोडले. नीलनाग नावाचा जलोद्भवाचा पालनकर्ता मानस पिता होता. जलोद्भवाच्या या वागण्यानं नीलानाग रुष्ट झाला आणि त्याने आपले परमपिता कश्यपांना जलोद्भवाच्या पीडेपासून सोडवणूक करावी अशी विनंती केली. जलोद्भव नेहमीप्रमाणे सरोवरात दडी मारून बसला, कारण जळ हेच त्याचे संरक्षक कवच होते. कश्यपांनी वराहमूल (आताचे बारामुल्ला) येथील सतिसरच्या अखेरच्या टोकावर असलेला पर्वत छाटून सरोवरातील पाण्याला वाट करून दिली. सरोवराचे पाणी वेगाने वाहून गेले तसे जलोद्भव उघडा पडला. त्याची शक्ती क्षीण होऊन गेली.

एक आख्यायिका असेही सांगते की कश्यपांनी तपश्चर्या करून भगवान विष्णूंना प्रसन्न करून घेतले व आपले गाऱ्हाणे त्यांना घातले. श्रीविष्णूंनी सुदर्शन चक्राच्या सहाय्याने पर्वत छाटून टाकला.. सरोवरातील पाणी वाहून गेले. जलोद्भवाने दडून राहण्यासाठी कपटाने मेघ निर्माण करून अंधार केला. मग ब्रह्मदेव आणि शिव हातात चंद्र,सूर्य घेऊन आले व जलोद्भवास हुडकून काढले. भगवान विष्णू त्यावर सुदर्शन चक्र चालविणार तोच सती पार्वतीने मैनेचे रूप धारण करून पर्वताचा मोठा दगड त्याच्या डोळ्यावर मारला आणि जलोद्भव गतप्राण झाला. काश्मिरी भाषेत मैनेला 'हारी' असे म्हणतात. आजही 'हारी पर्वत' श्रीनगरमध्ये अस्तित्वात आहे. माता सारिका पार्वतीचे मंदिरही या हारी पर्वतावर आहे. याच दगडाने अर्थात् पर्वताच्या सहाय्याने जलोद्भवाचा अंत पार्वतीने केला. पौराणिक कथा वा स्थानिक परंपरेतील आख्यायिका वास्तवाचे रूप कसे घेते तर ते असे. आता ब्रह्मा-विष्णू-महेश यांच्या आदेशानुसार कश्यपांनी या प्रदेशात मनुष्यांच्या वसाहती स्थापन केल्या. या प्रदेशाला कश्यपांच्या नावावरून 'कश्यपमीर' असे नाव पडले. मीर म्हणजे पर्वत.

पर्वत कापल्यामुळे सरोवरातील पाणी वेगाने वाहून गेले, अर्थात् त्यामुळे पूरसदृश स्थिती उद्भवली असण्याची व आसपासच्या प्रदेशाची, जंगलांची वस्तींची पडझड झाली असण्याची शक्यता आहे. इतिहास संशोधकांना या कहाणीशी जुळणारे पुरातत्त्वीय पुरावे आढळले आहेत. ज्यावरून हे स्पष्ट होते की उत्तर भारतात सिंधू संस्कृतीचे लोक राहत होते. मोहेंजो-दडो, हडप्पा नगरांचा अचानक विनाश अशाच कुठल्यातरी नैसर्गिक आपत्तीमुळे झाला होता. कदाचित सतिसरचे पाणी अशा प्रकारे वाहून जाणे हेही त्याचे कारण असू शकेल.

कश्यपांनी स्थापन केलेल्या काश्मीर मध्ये नाग, पिशाच या मूळ निवासी जनांच्या व्यतिरिक्त अन्यही जाती-जमाती येऊन वसल्या. खस (कश), डार, भोट, दमार, निशाद, तंत्रंग वगैरे. येथील धीवर जातीचे लोक कश्यप मुनींना कालू बाबाच्या रुपात पूजतात व त्यांना आपला पिता मानतात. अशा तऱ्हेची स्थानिक आख्यायिका ऐकण्यास मिळते. कश्यपांनी त्यांना तेथे शेती करण्यास प्रोत्साहन दिले. नाग जातीचे लोक येथील मूळ निवासी. त्यांच्या नावाने आजही काश्मीरमध्ये अनेक स्थाने अस्तित्वात असल्याचे दिसते. जसे अनंतनाग, नीलनाग, कोकरनाग, शेषनाग, कोंसरनाग, वेसरनाग, गौतमनाग इत्यादी. ही सर्व ठिकाणे राजांच्या नावाने वसविण्यात आली आहेत. काश्मिरात फार प्राचीन काळापासून नागपूजा अस्तित्वात होती असे दिसते. या प्रदेशात सुमारे ७०० नागांच्या आकृती कोरलेल्या आढळतात, असा उल्लेख अकबराचा दरबारी इतिहास लेखक अबुल फजल याच्या आइन-ए-अकबरीमध्ये आहे. भगवान विष्णूंनी वासुकीला सहपरिवार येथे वस्ती करण्यास सांगितले होते असे नीलमत पुराणात म्हटले आहे. इथल्या अनेक झऱ्यांना, सरोवरांना सुद्धा नागदेवतांची नावे दिलेली आढळतात. उदाहरणार्थ नीलनाग, वासुकी नाग, तक्षक नाग.

शिलालेख, दंतकथा तसेच अन्य साधन स्रोतांच्या द्वारे असे अनुमान काढता येते की 'संधिमत नगर' हे काश्मीर मधील प्राचीनतम नगर असावे जे इ.स.पूर्व २०८२-२०४१ या काळाच्या दरम्यान सुंदरसेन नावाच्या राजाच्या राज्यामध्ये होते. भूकंपामुळे शहर उध्वस्त झाले. सध्या ज्या ठिकाणी वूलर सरोवर आहे तिथेच या नगरीचे स्थान असावे असे म्हणतात. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे या नगराचे काहीही अवशेष खुणा मागे राहिलेल्या नाहीत. या भूप्रदेशावर छोट्या छोट्या राज्यांची निर्मिती झाली. या राज्यांना 'कुर्तराज्य' या नावाने ओळखले जाते. यांचा उल्लेख मात्र अनेक ऐतिहासिक स्थळांमध्ये, खंडहरांमध्ये तसेच ग्रंथांत आढळतो. कालांतराने गौनंद (किंवा गौनर्द) राजाने या सर्व छोट्या छोट्या राज्यांचे एकत्रीकरण करून विस्तृत राज्य निर्माण केले. काश्मिरात राज्य करणारा प्राचीन काळातील पहिला वंश गोनर्दीय वंश. राजा गोनर्द हा मगधराज जरासंधाचा नातलग होता. श्रीकृष्णाच्या विरोधात लढण्यासाठी जरासंधाने त्याची मदत घेतली होती. युद्धात बलरामाकडून गोनर्द मारला गेला. राजतरंगिणी मध्ये गोनर्द (गोनंद) वंशाच्या

सुमारे ८० राजांचे वर्णन केले आहे. शेवटचा गोनर्द राजा बालादित्य निपुत्रिक मरण पावला तेव्हा त्याच्या जामाताने – दुर्लभवर्धनाने– 'कार्कोट' वंशाची स्थापना केली. त्यानंतर 'उत्पल' घराणे सत्तेवर आले. उत्पलाचा नातू अवंतीवर्मा हा या घराण्यातील पहिला राजा. (इ. स. ८५५–८८३). हा मोठा पराक्रमी व प्रजाहितदक्ष राजा होता. याने आपल्या 'शूर' नामक प्रधानाच्या सहाय्याने राज्यात शांतता, सुव्यवस्था निर्माण करून प्रजेला चांगले दिवस दाखविले. याने अवंतीपूर नगरीची स्थापना केली. त्याच्या राजवटीत 'सूय्य' नामक स्थापत्यविशारदाने वितस्ता (आता झेलम) वगैरे नद्यांना बंधारे घालून अनेक कालवे बांधले. महापुराचा धोका तर कमी झालाच पण शेतीलाही प्रोत्साहन मिळाले. सूर्यपूर नगर म्हणजे 'सूय्य' या महापुरुषाचे स्मारक आहे.

अवंतीवर्म्यानंतर त्याचा मुलगा जुलमी निघाल्यामुळे काश्मीरमध्ये काही काळ अराजक निर्माण झाले. 'तंत्री' नावाच्या सेनापथाकाने सत्ता हस्तगत केली. या सेनापथकाने काश्मीरवर नियंत्रण मिळवून आपल्या मर्जीनुसार अनेक राजे गादीवर बसविले. तरीसुद्धा चक्रवर्मा नावाचा भोगविलासी, क्रूर, जुलमी राजा सत्तेवर आलाच. तेव्हा सेनादलाच्या नायकाने सेनापती कमलवर्धनाने राजधानी ताब्यात घेऊन तेथील ब्राह्मण सभेला राजाची नियुक्ती करण्याचा आदेश दिला. सभेने यशस्कर नावाच्या विद्वानास गादीवर बसविले. याने शांतता सुव्यवस्था स्थापित करून काश्मीरला वैभवाचे दिवस दाखविले. याच्या परंपरेत अभिमन्यू नावाचा मुलगा गादीवर आला तेव्हा त्याच्या नावाने त्याची आई राणी जिद्दा हिने राज्याच्या कारभाराची सूत्रे सांभाळली. हिच्या नावाची तांब्याची नाणी सापडलेली आहेत. राणी मुत्सद्दी व धोरणी असली तरी दुष्ट, संशयी, कठोर व विलासी होती. तिच्या विरोधात अनेक उठाव झाले, ते तिने हाणून पडले. तिच्या मृत्यूनंतर तिच्या भावाकडे सत्ता आली व तेथपासून काश्मिरात 'लोहर' वंश सत्तेत आला.

लोहर वंशातील राजा हर्ष अत्यंत विद्वान होता, तसेच विद्वान कवी व पंडितांचा आश्रयदाता होता. याचा राज्यकाल इ.स.१०७६–११०१. याच्याच पदरी चंपक हा एक विश्वासू मंत्री होता. मात्र राजा हर्षचा वध झाला तेव्हा काश्मीर सोडून चंपक काशीस येऊन राहिला. त्याचाच मुलगा कल्याण ऊर्फ कल्हण, ज्याने काश्मीरचा सुव्यवस्थित इतिहास लिहून महाभारत–कालापासून ते ११४८ पर्यंतचा इतिहास आपल्याला उपलब्ध करून दिला आहे.

कल्हणाला आपल्या वडिलांच्या माघारी प्रधानपदाचा लाभ झाला असता. परंतु कल्हणाने काश्मीरचा इतिहास लिहिण्याची जबाबदारी डोक्यावर घेतली. त्यासाठी साधन–सामग्रीची जुळवाजुळव करण्यासाठी त्याने प्राचीन ग्रंथ, शिलालेख, ताम्रपट, नाणी, शिक्के, प्राचीन स्थापत्य यांचा सखोल अभ्यास केला. काश्मीरची भूमी पायाखाली घातली. काश्मीरचे समग्र दर्शन व श्रवण केले. प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक परंपरा, आख्यायिका जाणून घेतल्या, भूतकाळातल्या सर्व ऐतिहासिक घटनांचा क्रम लावून लेखनास सुरुवात केली आणि अवघ्या दोन वर्षात ११४८ ते ११५० त्याने राजतरंगिणी ग्रंथ लिहून इतिहासात आपले नाव अजरामर, अमीट केले. काश्मीरचा राजा जयसिंह याच्या कारकिर्दीत हे काम पूर्ण झाले. राजतरंगिणी म्हणजे राजांची नदी. म्हणजेच राजांची मालिका. पण राजतरंगिणी केवळ राजांची मालिका नसून ती राजनैतिक, सामाजिक व काही प्रमाणात आर्थिक ज्ञानाचीही खाण आहे. हा ग्रंथ संस्कृत भाषेत असून यामध्ये ७८२६ इतकी श्लोक संख्या आहे. ९व्या शतकापर्यंतचा इतिहास काहीसा अंधूक आहे मात्र त्यापुढील १२ व्या शतकाच्या मध्यापर्यंतचा इतिहास सुसंघटित, प्रमाणित आणि विवेचनात्मक असा उतरला आहे. कुठेही पक्षपात वा अभिनिवेशाचा आश्रय घेतलेला नाही. त्यामुळेच भारतीयांना इतिहासाची व इतिहास लेखनाची जाण व दृष्टी नाही असा आक्षेप घेणाऱ्या इंग्रज इतिहासकारांनी व विद्वानांनी 'राजतरंगिणी' हा भारतातील पहिला सुव्यवस्थित व इतिहासलेखन शास्त्राला अनुसरून लिहिलेला इतिहास आहे.' असे प्रमाण पत्र दिले आहे..!

कल्हण शैव पंथी असून 'प्रत्यभिज्ञान दर्शना'चा अनुयायी होता. मात्र बौद्ध मताविषयी त्याला आदर होता. विशेषतः बुद्धांचे अहिंसावादी तत्त्वज्ञान त्याला प्रिय होते. कल्हणाची वर्णन शैली अद्भुत आहे. संधी मिळेल तिथे चार उपदेशाचे शब्द सांगितल्याशिवाय तो पुढे जात नाही. कित्येक घटना नाट्यमय संवादांनी उभ्या करतो.

ऐतिहासिक काळाच्या दृष्टीने महत्त्वाचा काळ म्हणजे इ.सनपूर्व ३रे शतक. सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा प्रचार केला. श्रीनगरची स्थापना अशोकानेच केली. त्यापूर्वी येथे शैवमत प्रचलित होते. इसवी सनाच्या पहिल्या शतकात कुषाण राजा कनिष्काची काश्मीरवर सत्ता होती. त्याने व्यास नदीवर कनिष्कपूरची स्थापना केली. सध्याच्या पाकिस्तानातील 'पेशावर' हे शहर सुद्धा कनिष्काने स्थापन केलेले असून त्याचे मूळ नाव 'पुरुषपूर' होते. कनिष्क व त्याच्या वंशजांनी बौद्ध धर्म स्वीकारून त्याचा प्रसार केला. कनिष्काने काश्मीर येथे तिसरी बौद्ध धर्म परिषद भरविली होती.

त्यानंतर काश्मीरच्या इतिहासात हूण वंशाच्या 'मिहीरकुल' नावाच्या राजाचे नाव उल्लेखनीय ठरते. मिहीरकुलाने हिंदू धर्माचा पुरस्कार केला. तो शिवोपासक होता. 'मिहीरेश्वर' शंकराचे मंदिर त्याने स्थापन केले. पहलगामचे ममलेश्वर मंदिर म्हणजेच मिहीरेश्वर मंदिर असावे. अशोकाने बौद्ध मत येथे आणण्यापूर्वीपासून वास्तविक काश्मिरात शैव पंथच होता.

प्राचीन काळी कैलास मानसरोवरापासून कॅस्पियन सागरापर्यंत शैव साम्राज्यच पसरले होते. युरोप व आशिया यांच्यामध्ये पसरलेला कॅस्पियन सागर हा सुद्धा कश्यप मुनींच्या नावानेच आहे. वास्तविक कॅस्पियन सागर हा सरोवरसदृश आहे. परंतु त्याचे आकारमान इतके मोठे आहे की त्याला सागर मानले आहे. याचे पाणी इतर समुद्रांच्या तुलनेत कमी खारट म्हणजे केवळ १/३ इतकेच खारट आहे. हा सर्व बाजूंनी जमिनीने बंदिस्त आहे. पाण्याला बाहेर जाण्याचा मार्ग म्हणजे केवळ बाष्पिभवनच.. अन्य नाही. संशोधकांच्या मते, कॅस्पियन सागरापासून कश्मीरपर्यंत ऋषी कश्यपांच्या कुलातील लोकांचेच राज्य पसरले होते. कश्यप हे या प्रदेशाचे पहिले सम्राट होते अशी सुद्धा मान्यता आहे. असे हे कश्यपांचे 'काश्यपमीर' अर्थात काश्मीर.

एकदा तरी भूलोकीच्या या स्वप्नमय, निसर्गरम्य नंदनवनाला भेट द्यावी आणि स्वर्गीय सौंदर्य भूलोकी अनुभवावे अशी रसिक माणसाची इच्छा असतेच. काश्मीरच्या या पौराणिक इतिहासानंतर काश्मीरमधील 'हटके स्थळांचा' off Beat Kashmir चा परिचय त्याच्या मनोरंजक पौराणिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी सह करून देण्याचा मानस आहे. मार्तंडतीर्थ, क्षीरभवानी, शंकराचार्यांची टेकडी, झेलम नदीचे उगमस्थळ इत्यादी. पुढील लेखात.

❑❑

---

# निवृत्ती नंतरची प्रवृत्ती

**– विजय माजगावकर**

9421081138, ग्रुप नं. १३

शाळा कॉलेजात असताना किंवा नोकरीत सक्रीय असताना मला जर कुणी मी कविता करेन असं सांगितलं असतं तर मी त्याला नक्कीच वेड्यात काढलं असतं. कारण त्या काळात मी चुकूनही कधी कवितेच्या वाटेला गेलो नाही, कविता करण्याच्या फंदातही पडलो नाही, कविताही कधी चुकूनही माझ्याकडे फिरकली नाही. पण मी नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर अचानक एकाएकी कविता माझ्याकडे आली. नुसती आलीच नव्हे तर तिनं चक्क आपला हात माझ्यापुढे केला. मीही तो नुसता हाती घेतला एवढंच नव्हे तर तो प्रेमानं कुरवाळून घट्ट धरून ठेवला. कवितेची अन् माझी दोस्ती झाली, सहवास वाढत गेला, सहवासाचं रुपांतर प्रेमात झालं आणि साठीनंतरच्या आमच्या प्रेमाची परिणती म्हणून आमचं पहिलं अपत्य जन्मास आलं ते म्हणजे माझा पहिला काव्यसंग्रह 'आपुलाचि वाद आपणासी' माझा हा छंद मला माझ्या न कळत निवृत्तीनंतरच्या काळात लागला म्हणून मी त्याला माझी 'निवृत्तीनंतरची प्रवृत्ती' असं म्हणतो, माझा हा एक प्रवास आहे अनुभूतीचा स्वान्तः सुखाय, स्वतःच्या आनंदासाठी, समाधानासाठी केलेला आणि तो अजूनही चालूच आहे.

माझा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला तेव्हा माझं वय ६५ वर्षांहून अधिक होतं. आणि दुसरा काव्यसंग्रह 'आत्मसंवाद' प्रसिद्ध झाला तेव्हा माझं वय सत्तरीच्या पुढचं होतं.

आज माझं वय ८५ पूर्ण आहे आणि माझं कविता करणं चालूच आहे. रसिकांचा त्यांना प्रतिसादही लाभत आहे. हे माझं भाग्य म्हातारपणी वेळ कसा घालवायचा हा प्रश्न कधी या माझ्या छंदामुळे पडला नाही, विशेषतः कोरोना काळात आणि आजही पडत नाही. इतकचं नव्हे तर एक वेगळा Creativity चा आनंद मिळतो आहे; कारण

नशेत कवितेच्या धुंद मी
स्वान्तःसुखात असे गुंग मी
मस्तीत माझ्या असे मस्त मी
आहे हा असा मी असामी

❑❑

# वाचकांचा अभिप्राय

नृपोजगत् जानेवारी २०२२ चा अंक इतका सुंदर, सुबक व अगदी वेळेवर छापला गेला त्याबद्दल धन्यवाद ! वसुंधरा पर्वतेंचा माझी आई – ९९ नाबाद इतका वाचनीय की मलाही त्यामुळे स्फूर्ती येऊन या मासिकात मी ‘आमचे आजोबा’ हा लेख लिहिला आहे. माधवी खुपेरकरांनी वर्षा सहलीचे वर्णन असं केलं आहे की आमच्या सारख्या न गेलेल्या लोकांच्या नजरेसमोर त्याने सहल उभी केली. प्रा. प्रकाश गाडगीळांचा लेख म्हणजे खगोलशास्त्रांची आवड असलेल्यांना मेजवानीच आहे. विश्वाची व्याप्ती प्रकाशवर्ष परिणाम, सूर्याचे आयुष्यमान इत्यादी भागांची महिति इतक्या सोप्या भाषेत दिली आहे की वाचताना खूप आनंद होतो. डॉ. राज माहुलकरांचा डॉ. विजय भटकरांविषयीच्या लेखाने भटकरांच्या जीवनावरची सविस्तर माहिती मिळाली. एकंदर सर्वच लेख, कविता व छपाई खूप छान वाटली.

**डॉ. कमला संखे**

---

Reading the articles in Nripojagat is a very pleasant experience.
अंक अतिशय सुंदर झालाय. तुमचे पुन्हा एकवार अभिनंदन !

**Suresh Kango**

---

प्रिय वैदेहीताई,

मेल पाठवायला बराच उशीर झाला, सॉरी. तुम्ही काढलेला पहिला नृपोजगत्चा अंक सर्वांगसुंदर निघाला आहे. नृपोमध्ये फारशा ओळखी नसतानाही लेख मिळवणं, त्यासाठी अनेकांना अनेकदा संपर्क करणं, मग त्यांचं संपादन, प्रूफ रीडींग आणि त्यानंतर मुख्य म्हणजे वेळेवर तो प्रसिद्ध होणं यासाठी आपण घेतलेले कष्ट खरोखरीच कौतुकास्पद आहेत. यापुढेही अशाच अनेक नवीन कल्पना राबवून आपण दर तीन महिन्यांनी प्रसिद्ध होणारं नृपोजगत् नियमितपणे आमच्या हाती द्याल असा विश्वास आहे.

या पहिल्या षटकाराबद्दल पुन्हा एकदा अभिनंदन.

**वसुंधरा पर्वते**

---

नमस्कार प्रो. वैदेही कुलकर्णी मॅडम,

जानेवारी २०२२ चा मकर संक्रांत अंक हाती पडला. या अंकाच वैशिष्ट्य म्हणजे केवळ नवीन वर्षाचा अंक एवढेच नसून, नवीन संपादकाचा पहिला अंक आहे. तुमचे मनःपूर्वक अभिनंदन. अंक नजरेस पडल्याबरोबर लगेच उचलून घ्यावा असा आकर्षक झाला आहे. आतील लेख, काव्य, नृपो संबंधी घटना इत्यादीची मांडणी उत्तम आहे. शिवाय ‘सामर्थ्य आहे चळवळी’चे, संत तुकडोजी महाराज, असे दर्जेदार लेख, श्री. राज माहुलकर, श्री. सुधाकर सुदामे अशांच्या कविता या मुळे अंक वाचनीय व प्रभावी झाला आहे यात शंकाच नाही. पुन्हा एकदा तुमचे मनःपूर्वक अभिनंदन!

**विनायक वझे**

---

नमस्ते (सौ.) वैदेहीजी,

नृपोजगत्ची सूत्रे हाती घेतल्यापासून इतक्या कमी वेळात पहिला अंक प्रकाशित केलात, ह्यासाठी आपले मनःपूर्वक अभिनंदन. आपल्या कारकिर्दीत नृपोजगत् अजून उंच भरारी घेईल ह्या बाबत शंकाच नाही.

**अशोक देशपांडे**

---

नृपोजगत्’ (मकर संक्रात अंक) संपादिका प्रो. वैदेही कुलकर्णी यांना सप्रेम नमस्कार, प्रथम संपादक पदाचा भार स्विकारल्याबद्दल ‘अभिनंदन’. अतिशय साध्या, आकर्षक आणि मुख्य म्हणजे वाचनीय असा हा अंक आहे. नेहमीच्या जीवनातल्या हरघडी प्रत्ययाला येणाऱ्या विषयांपासून ते अध्यात्मालाही प्राधान्य दिले आहे.

**सुधा गोखले**

नृपोजगत् चा अंक फारच छान केलाय. नवीन संपादकांचे विशेष योगदान सहजपणे लक्षात येते. Colour scheme / artwork/ मांडणी/ क्वालिटी ऑफ प्रिंटिंग अशा सर्व स्तरांवर अंक उत्तमच आहे. संक्रांतीचा अंक म्हणून निवडलेली ब्लॅक मुखपृष्ठ कलर स्कीम विशेष भावली. Full marks and Best job award to सौ. वैदेही मॅडम - संपादक. Contents are also justified in variety and usefulness. Once again Special compliments & Regards to the New editor. One small suggestion / request to give address stickers job to the printer only. There are many faulty address stickers which do not go well. No member would like his name printed defectively.

**Vidyadhar Deshpande**

---

अंक फारच सुंदर व नेटका झाला आहे. अभिनंदन! माझी एक सूचना. लेखकाचा फोन नं. व छोटा फोटो द्यावा. म्हणजे लेख आवडल्या आवडल्या लगेच फोन करता येईल.

**सुरेश नातू**

---

वैदेहीताई : खूप सुंदर मुखपृष्ठ, मांडणी, ऐक वेगळेपणा आणि वेळेत. त्याची आज आमच्या ग्रुपच्या संक्रांत निमित्ताने आयोजित कार्यक्रमात वाटपासाठी उपलब्धता. ही खास वैशिष्ट्ये. अभिनंदन !

**राजेंद्र माहूलकर**

---

मला नृपोजगत् १४ जानेवारीचा अंक मिळाला वैदेही. अंक छानच आहे. अंकाची आतुरतेने वाट पहात होते. ८० वर्ष पूर्ण झाल्याचे बक्षिसही मिळाले. आनंद वाटला.

**मनिषा बोरा**

---

Congratulations Vaidehi Kulkarni for making "Nripojagat Sankrant Issue", ready for distribution today, on the auspicious day of Sankrant, Great Job.

**पद्मा परांजपे**

---

प्रा . सौ .वैदेही कुलकर्णी, यांनी संपादित केलेला पहिला अंक, नृपोजगत् मिळाला. मुखपृष्ठ सुंदर आहे. तबकातील स्नेहाचा तिळगूळ मिळाला. विविधरंगी पतंगाप्रमाणे अंकातील साहित्यातून आनंद मिळणार हेही कळाले. भास्करासम विचारांच्या तेजाने बहुविध विषयांवर सुंदर साहित्य असणारे नृपोजगत्चे अंक वैदेही अधिक संपन्न करणार याची खात्री वाटते. हातात वाचायला घेतलेला अंक संपूर्ण वाचल्यावर खाली ठेवला. विविध विषयांवरचे लेख, कविता, इतर माहिती असलेला अंक वाचतांना आनंद झाला. नृपोजगत्चे शिल्पकार वसंत मुनशी व इतर यांच्या कृतज्ञतेबद्दल विशेष धन्यवाद !

**वसंत मुनशी**

---

वार्षिक कार्यक्रमाबरोबरच नृपो मनाचा कानोसा जेष्ठांनी जेष्ठांसाठी प्रत्यक्ष सहभागातून चालविलेल्या त्रैमासिक 'नृपोजगत्' मधून होत असतो. जानेवारी, २०२२ चा मकर संक्रांत अंक नुकताच श्री. विद्याधर देशपांडे, यांचेकडून प्राप्त झाला व अंकाबरोबरच आपल्या सर्वांचा तिळगूळ ही मिळाला. मकर संक्रांतीला काळ्या रंगाचे महत्व असल्याने मुखपृष्ठ त्यावरील श्लोक व सौंदर्ययुक्त सजावट ह्यांनी आकर्षक व समयोचित तर वाटलाच पण त्याचबरोबर मलपृष्ठावर माजी शिल्पकारांचे फोटो छापून त्यांच्या सहभागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचे प्रयोजन फार भावले ! ह्या अंकापासून मा. स. रा. पटाईत ह्यांचा वारसा अधिक प्रकर्षाने चालविण्याचे व्रत प्रा. सौ. वैदेही कुलकर्णी ह्यांनी स्वीकारले हे नृपोजगत् चे भाग्य व ते तसे कार्यक्षमतेने घडेल हे पहिल्याच अंकातून व्यक्तही झाले आहे. अध्यक्षीय मनोगत, सचिवांचा अहवाल, एक्झिक्युटिव्ह कमिटीच्या सदस्यांच्या माहितीसमवेत त्यातील वैशिष्टपूर्ण लेख, श्री. सुधाकर सुदामे, राजू माहुलकर, स्मिता कुलकर्णी, अंजली देशपांडे, प्रज्ञा साने ह्यांच्या कविता, चौकटीतील भाष्ये उद्बोधक आहेत. मध्यवर्ती पानांतून दिवाळी मेळाव्याची क्षणचित्रे, कै. न्यायमूर्ती ना. ल. अभ्यंकर पुरस्कार प्रदान कार्यक्रम व मलपृष्ठाचे आधी सहस्त्रचंद्र दर्शनाच्या भाग्यवंताचे फोटो, त्यांना उदंड आयुष्य मिळावे ह्या सदिच्छेबरोबरच त्यांचेकडून आपणा सर्वांना उमेद यावी, उभारी यावी ह्या दृष्टीकोनातून महत्वाचे आहे.

सुरेश नाईक साहेबांकडील घुंघूरमास वा सामर्थ्य आहे चळवळीचेच नव्हे तर धार्मिक संस्काराचे, तसेच उखाण्यामागच्या भावना, वैज्ञानिकदृष्ट्या खगोलशाखाची ओळख इ. लेख लक्षात राहण्यासारखे आहेत व वैचारिकदृष्ट्या समृद्ध आहेत. अंकाच्या परंपरेचा दर्जा सांभाळणे हे शिवधनुष्य असते, पण पूर्वसुरींचे अनुभव व सहकार्य, तसेच मान्यवरांच्या नवीन कल्पना, आधुनिकता ह्यांचा समावेश केल्यास त्या शिवधनुष्य पेलण्याला बळकटी देते. हे भाग्य नृपोच्या सदस्यांना प्रा. वैदेही कुलकर्णी ह्यांच्या संपादकत्वातून सातत्याने मिळो, ही तो श्रींची इच्छा !

**शरद द. मांडे**

# एक अनुभवलेला थरार

– डॉ. पुष्पा पिंपळनेरकर
8275875662, ग्रुप नं. २६

१९७४-७५ चा काळ असावा. मी व माझे मिस्टर लंडनला West Minister Hospital व Kings College Hospital मध्ये काम करीत होतो.

हा थरारक अनुभव आठवला की अजूनही अंगावर भीतीचे शहारे उठतात. काळजाची धडधड वाढते.

त्यावेळी मी Kings College Hospital मध्ये Anaesthetist म्हणून काम करीत होते. साधारण दुपारची ११.३०-१२ ची वेळ होती. ऑपरेशनच्या २ केसेस रद्द झाल्यामुळे माझी ऑपरेशन लिस्ट लवकर संपली होती. खूप छान वाटलं, लवकर घरी जायला मिळणार म्हणून शॉपिंग करून मुलांसाठी केक करायचा ठरवलं.

झटपट थिएटरचा ड्रेस बदलला साडी नेसून ऑपरेशन थिएटरच्या बाहेर आले. वॉर्ड मधील ऑपरेशन झालेले पेशंट बघून मी हॉस्पिटलच्या बाहेर पडले.

थोड्याच अंतरावर बस स्टॉप होता. वेस्ट मिनिस्टर हॉस्पिटलकडे जाण्यासाठी. आमचा फ्लॅट Vinscert square West Minister Hospital मध्ये होता. मी बससाठी लाईनमध्ये थांबले होते. ५ मिनिटात बस आली आणि पॅसेंजर बसमध्ये चढू लागले.

इतक्यात माझे लक्ष एक सिनीयर गोऱ्या जोडप्याकडे गेले. ती दोघे बसमध्ये चढत असताना एका मुलाने त्यांच्या पँटच्या मागच्या खिशात वॉलेट काढण्यासाठी हात घातला. मी त्या गोऱ्या वयस्क माणसाच्या अगदी मागेच होते. एका क्षणात काही कळायच्या आत मी त्या मुलाचा हात धरला आणि माझ्या डोळ्यासमोर काजवे चमकले. एकदम ४-५ मुले २०-२२ वर्षांची असावीत, सर्वजण हातातील चाकूचे बटण दाबत पुढे आली. कुठून आले, कसे आले हे कळायच्या आत मी बसच्या पायऱ्यांवर ढकलले गेले होते. त्या मुलांनी मला बसमध्ये चढणे भाग पाडले होते. त्या ४-५ मुलांनी मला हातातील चाकू दाखवून घेरून टाकले होते. त्यांच्या भेदक नजरांनी पूर्णपणे हादरून गेले होते. भीतीने माझी गाळण उडाली होती, डोळ्यासमोर काजवे चमकत होते.

त्या मुलांनी मला जवळ जवळ ढकलतच एका ३ सिटर बाकावर बसवले. माझ्या दोन्ही बाजूला दोघेजण. चाकू उघडून एक एक पाय माझ्या पुढ्यात आडवे टाकून बसले. एकमेकांत काही तरी बोलत होते.

त्या वयस्क गोऱ्या माणसाला त्याच्या मागे काय घडले, घडत आहे याची सुतराम सुद्धा कल्पना नव्हती किंवा जाणीवही झाली नसावी. २-३ मिनिटात मी स्वत:ला सावरले - लक्षात आले ही मुले मला कुणाशीही बोलू देणार नाहीत; पण कंडक्टर तिकीट काढण्यासाठी आल्यावर मला स्टॉप सांगावा लागेल. मग लक्षात आले ही मुले माझ्याबरोबरच उतरली तर, केव्हा काय करतील काही सांगता येत नाही.

मी Victoria Station Big Beach चा खोटा स्टॉप सांगितला. कारण तिथे बरेच पॅसेंजर उतरणार व चढणार. तिथे Bobby Police पण असतातच. त्या गडबडीत मी उतरू शकेल असे वाटले, म्हणून खोटाच स्टॉप सांगितला. आणि मी त्या गर्दीत उतरून Victoria Station च्या गर्दीत मला मिसळून टाकले. पण माझी साडी व माझा इंडियन लुक काही काढता येणार नव्हता. मी स्टेशन मधल्या मोठ्या न्यूज पेपरच्या शॉपमध्ये घुसले. हातात पेपर घेवून बराच वेळ उभी होते. ती वेळ तो अनुभव आणि ती भयानक भीतीची जाणीव अनाकलनीय होती. जवळ जवळ अर्धा तास थांबून मी स्टेशन बाहेर पडले. कशी बशी टॅक्सी करून घरी आले. ४ वाजले होते. मुले शाळेतून आली नव्हती आणि मिस्टर पण हॉस्पिटलमध्येच होते. घराच्या जवळच हॉस्पिटलचा गस्त घालणारा सुरक्षा रक्षक भेटला. त्याला बघून बरं वाटले. त्याला घडलेली सर्व हकीकत सांगितली. त्यांनी त्या मुलांचे रंग, रूप, वय, कपडे याची चौकशी केली.

त्याला घरावर लक्ष ठेवण्यास सांगून मी दार उघडून आत गेले. घर बंद करून रामरक्षा स्तोत्र म्हटले. संध्याकाळी मिस्टर आल्यावर त्यांना सांगितले. त्यानंतर ४ दिवस घराच्या बाहेर पडायचे धाडस झाले नाही. ४ दिवस सिक लिव्ह घेवून मी मला घरात कोंडून घेतले होते. खूप मोठा धसका बसला होता. त्यानंतर १-१।। महिना मला हॉस्पिटलमध्ये जायची भिती वाटत होती. परत त्या बसस्टॉपकडे मी कधीच गेले नाही.

❑❑

# मुक्त - मुक्ताई

- डॉ. सीमा दाबक
9422352700, ग्रुप नं. ४

आत्मभान म्हणजे आत्म्याचे भान - स्वस्वरूपाचे ज्ञान ह्या पृथ्वीतलावरील सजीव सृष्टीतील, प्राणीमात्रांमधील सर्वात उत्क्रांत मनुष्यप्राणी हा सर्वांपेक्षा वेगळा आहे; कारण फक्त त्यांच्याकडेच आहे स्वस्वरूपाचं ज्ञान मिळवण्याची शक्ती. जन्माला येताना चैतन्यरूपी आत्म्याला जड शरीराने (मायेने) वेढल्यामुळे 'आत्मभान' नाहीसे झालेले असते. पण पुण्याईच्या बळावर, सत्संगाने, सद्गुरूंच्या आशिर्वादाने हे आत्मभान, आत्मज्ञान तो प्राप्त करू शकतो.

ह्या पृथ्वीतलावर काही पुण्यात्मे, दैवीशक्ती मनुष्यदेहात जन्म घेतात ते 'आत्मभान, स्वस्वरूपाचे ज्ञान' घेऊनच. साडेसातशे वर्षांपूर्वी ह्या महाराष्ट्राच्या भूमीत इंद्रायणी काठी असलेल्या आळंदी ह्या ग्रामात अशाच चार पुण्यात्मांनी जन्म घेतला. विठ्ठलपंत व रुक्मिणी ह्या सत्शील जोडप्याच्या पोटची निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ता ही ती चार अलौकिक व तेजस्वी भावंडे.

ह्या चार अपत्यांच्या जन्माच्या अगोदर विठ्ठलपंतांनी संन्यास घेतला होता. विठ्ठलपंत लहानपणापासून विरागी - विरक्त. काहीसा मनाचा कौल न मिळताच रुक्मिणीशी विवाहबद्ध झाले खरे, पण त्यांचं मन संसारात कधी रमलेच नाही. मग पत्नीच्या न कळतच ते काशीला गेले. तेथे रामानंदस्वामींकडून संन्यास घेतला. ह्या गोष्टीला बारा वर्षे उलटून गेल्यावर जेव्हा रामानंदस्वामींना समजले की विठ्ठलपंतांनी आपल्या पत्नीच्या परवानगीशिवाय संन्यास घेतला आहे. तेव्हा त्यांनी विठ्ठलपंतांना परत गृहस्थाश्रमाची आज्ञा केली.

आपल्या गुरूची आज्ञा पाळण्यासाठी विठ्ठलपंत परत स्वगृही आले आणि मग ही चार अपत्ये जन्माला आली. कदाचित या अलौकीक दैवी अवतारांनी मानवरूप घ्यावं हेच विधिलिखित असावं. संन्यासाश्रमातून पुन्हा गृहस्थाश्रम हे धर्मबाह्य वर्तन आळंदीतील ब्रह्मवृंदाला मान्य नव्हतं. मग त्यांनी ह्या चारित्र्यसंपन्न आणि वेदवेदांग पारंगत विठ्ठलपंतांना व त्यांच्या कुटुंबाला वाळीत टाकलं व आळंदीबाहेर काढलं. मग आळंदीजवळील इंद्रायणीतील एका बेटावर या कुटुंबानं आपला मुक्काम ठोकला. विठ्ठलपंत सतत स्वत:साठी नव्हे पण आपल्या लहानग्यांना समाजानं स्विकारावं, त्यांचे मौजीबंधन करावे, यासाठी पंडितांच्या, ब्राह्मणांच्या विनवण्या करत असतं. पण या साऱ्याच अलौकीक, तेजस्वी कुटुंबाबद्दल असूया, मत्सर वाटणाऱ्या ब्राह्मणांच्या हृदयाला पाझर फुटत नव्हता. मग विठ्ठलपंतांनी पैठणच्या ब्रह्मवृंदाकडे धाव घेतली. अनेक ग्रंथांच्या उहापोहानंतर तेथील ब्राह्मणांनी विठ्ठलपंत व रुक्मिणीला देहांत प्राय:श्चित्ताचा मार्ग सुचवला. मुलांच्या कल्याणासाठी ह्या सत्वशील जोडप्याने गंगेमध्ये देहार्पण केले. आई-वडिलांचं छत्र गमावलं तेव्हा मोठा निवृत्ती असेल, दहा वर्षांचा तर धाकटी मुक्ता अवघी ६ वर्षांची.

आईचं छत्र हरवल्याचं ध्यानी येताच ही मुक्ताईच 'आई' झाली. आपल्या थोरल्या भावंडांची. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी 'मीच आई' हे भान आलेली मुक्ताई आता सारं घर सांभाळू लागली. निवृत्ती, ज्ञानदेव व सोपान दादांनी आणलेल्या भिक्षेतून अन्न शिजवू लागली. भावंडांचा प्रतिपाळ करू लागली.

ही चारही भावंडे म्हणजे 'आत्मभान' आलेली. त्यातच थोरल्या निवृत्तीला गहिनीनाथांचा अनुग्रह प्राप्त झालेला. मग धाकट्या ज्ञानदेव, सोपान, मुक्तेचा तो अध्यात्मिक गुरु बनला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही सारी भावंडे आत्मसाधना करीत. निवृत्ती हा मुक्तेचा गुरु असला तरी तिचं खरं गूळ-पीठ होतं ते ज्ञानूदादाबरोबर. निवृत्ती व सोपान पहिल्यापासूनच समाजापासून अलिप्त, विरक्त, सुख-दु:खांच्या पलिकडे पोहोचलेले. पण ज्ञानदेव मात्र समाजाशी जोडलेले. समाजाच्या भल्याबुऱ्या चालीरितींनी व्यथित होणारे. मुक्ताईसुद्धा अशीच.

आईच्या माघारी आईच्या मायेने भावंडांना सांभाळणाऱ्या मुक्ताची मग ज्ञानदेवच कित्येकदा आई होत. तिला न्हावू-माखू घालत, तिच्या केसांची वेणी घालत, तिला परकर-चोळी शिवत.

विठ्ठलपंत व रुक्मिणीने देहांत प्रायश्चित्त घेऊनसुद्धा आळंदीतील ब्राह्मण ह्या चारही गुणी भावंडांना सामावून घ्यायला तयार नव्हते. ते सतत या मुलांचा पाणउतारा करीत, अपमान करीत. ही चारही 'आत्मभानी' लेकरे मग एकमेकांची समजूत घालत, शांत संयमीपणानं रहात. तरीसुद्धा कधी तरी एखाद्याचा मनावरचा ताबा सुटे, तो निराश होई.

एकदा असंच ज्ञानदेव भिक्षाटनासाठी आळंदीत गेले; अनेक ठिकाणी अपमान पदरी आलेल्या ज्ञानदेवाला निराशेनं ग्रासलं, ते सारं असह्य होऊन ते घरी आले. घरात कोणीच नव्हतं मग झोपडीचं दार (ताटी) लावून ते एकांतात बसले, आत्मस्वरूपात चिंतन करू लागले. स्वयंपाकाच्या ओढीनं घरी आलेल्या मुक्ताला ज्ञानदेव एकटेच झोपडीत स्वत:ला कोंडून बसले आहेत, हे दिसलं. ज्ञानदेवांच्या मन:स्थितीचं आकलन झालेल्या मुक्ताईनं मग ज्ञानदेवांना समजावलं 'ताटीचे अभंग' रचून. त्या अभंगात तिने व्यक्त केलेल्या विचारधनानं ज्ञानदेव अचंबित झाले. त्यांची निराशा पार पळून गेली.

वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी अभंगातून व्यक्त करणारी मुक्ता म्हणजे एक 'योगमायाच' होती. मुक्ताईच्या त्या अभंगातून व्यक्त झाली होती एक 'ब्रह्ममायाच'. मुक्ताईच्या ठायी आलेल्या आत्मभानांची ओळख ज्ञानदेवांना पटली.

असेच दिवस जात होते. एक दिवस भिक्षेला गेलेल्या निवृत्तीनाथांनी त्या घरात भाजल्या जाणाऱ्या मांड्याचा वास घेतला आणि ते खायची त्यांना इच्छा झाली. भिक्षा घेऊन घरी आलेल्या निवृत्तीदादाने आपल्या बहिणीला ही इच्छा बोलून दाखवली. गुरुतुल्य दादाची इच्छापूर्ती करण्याची घाई मुक्तेला झाली. तिने लगेच मांड्याचे पीठ भिजवले आणि ते भाजण्यासाठी लागणारे खापराचे भांडे आणण्यासाठी ती भिवा कुंभाराकडे गेली; पण तिथे आलेल्या विसोबा चाटी ह्या आळंदीच्या विद्वानाने मुक्तेला मांडे रांधण देण्यास मनाई केली. भावाची इच्छा पूर्ण करता येणार नाही, या विचाराने हिरमुसलेली मुक्ता रडवेली होऊन घरी आली. मुक्तेचं उतरलेलं तोंड बघून ज्ञानदेवांना सारी कल्पना आली. आपल्या योगबळाचा उपयोग करीत मुक्तेची मांडे करण्याची इच्छा पूर्ण करण्याचे त्यांनी ठरवले आणि मग 'योगाग्नी' प्रज्वलीत करून स्वत:ची पाठ तापवली. त्या तापलेल्या पाठीवर मुक्ताने मांडे भाजले. मुक्ताला मांडे रांधण द्यायला मज्जाव केलेल्या विसोबाला, मांडे खायला न मिळाल्याने या भावंडांना झालेले दु:ख बघून आसुरी आनंद अनुभावयाचा होता. म्हणून ते मुक्तापाठोपाठ त्यांच्या घराशी आले होते; पण तिथले ते अलौकिक दृश्य पाहून ते पश्चात्तापदग्ध झाले आणि ह्या भावंडांची माफी मागण्यासाठी त्यांच्या झोपडीत शिरले. त्यांनी ज्ञानदेवांचे पाय धरून त्यांची क्षमायाचना केली व त्यांचे शिष्यत्व पत्करण्याची ज्ञानदेवांना विनवणी केली. पण ज्ञानदेव मोठ्या मनाचे. ज्या आपल्या बहिणीचा त्यांनी अपमान केला होता तिला 'आत्मसन्मान' देण्यासाठी विसोबांचं शिष्यत्व मुक्ताबाईनं पत्करावं अशी ज्ञानदेवांनी तिला विनंती केली. मुक्ताईचं शिष्यत्व पत्करलेले विसोबा आता विसोबा खेचर झाले. मुक्ताईच्या उपदेशानं त्यांच्यात अंत:र्बाह्य बदल झाला. त्यांच्या विद्वत्तेला वैराग्याची जोड मिळाली आणि कोरड्या ज्ञानाला भक्तिची.

विसोबांची गुरु झालेल्या मुक्ताईनं आता अध्यात्मात चांगलीच प्रगती केली होती. स्वत:च अंतरंग ओळखण्याचा अभ्यास पूर्ण होताच लोकांच्या अंतरंगाचाही ठाव घ्यायला ती आता शिकली होती. एकदा ही चारी भावंडे विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरी गेली. विठ्ठलभक्तीत दंग झालेल्या नामदेवाशी तिथे त्यांची गाठ पडली. नामदेव वयानं, अधिकारानं, भक्तिनं या भावंडांपेक्षा मोठे. शिवाय त्यांचा अधिकारही थोर. सगुण विठ्ठलाचं दर्शन ह्या एकट्या भक्ताला घडायचं. याचा काहीसा अहंकार नामदेवाला झाला होता. नामदेवाकडे बघताक्षणी मुक्ताबाईनं हे ओळखलं. तिच्या तिन्ही मोठ्या भावांनी नामदेवांना वंदन केलं; पण मुक्ताबाईनं मात्र अहंकारी नामदेवांना प्रश्न केला – 'अखंड जयाला शेजार । का रे अहंकार नाही गेला ?' आणि मग नामदेवांचा अहंकार उघड करण्यासाठी वयानं श्रेष्ठ, भक्तीनं थोर गोरोबा कुंभारांना प्रत्येकाच्या डोक्याचं मडकं मजबूत आहे का हे तपासायला सांगितलं. मडकं पक्क भाजलं आहे का? (खऱ्या ज्ञानानं – सत्यानं मन भरले आहे का ?) हे बघण्यासाठी गोरोबानं प्रत्येकाच्या डोक्यावर काठीने प्रहार केले तेव्हा फक्त नामदेवांच मडकं (डोकं) कच्च असल्याचं त्यांना जाणवलं. तेव्हा ते मडकं पक्क भाजण्यासाठी तिनं नामदेवला सुनवलं –

अंतर बाहेर भाजू आम्ही कुंभ ।
करू निरालंब सगळेचि ।।
अहं सोहं दोन्ही उर्ध्व लावू फुंकणी ।
नवद्वार फुंकोनी जाळ करू ।।
म्हणे मुक्ताई पळायचे नाही ।
आसन स्थिर नाही नामयाचे ।।

आणि मग मडके भाजण्याच्या कृती मागील आध्यात्मिक गूढ नामदेवाला समजावे म्हणून मुक्ताईने तिचा शिष्य विसोबा खेचरकडे नामदेवाला पाठवले. मुक्ताईकडून अध्यात्माचे धडे घेतलेल्या विसोबाच्या तत्वज्ञानाने नामदेवाचा अहंकार नाहीसा झाला.

हळूहळू या तेजस्वी बालयोग्यांची कीर्ती सर्वदूर पसरली. पुणतांब्याला राहणाऱ्या, चौसष्ठ कला आत्मसात केलेला, चौदाशे वर्षांचं दीर्घायु जगलेल्या महान योगी चांगदेवाला या चारही भावंडांना भेटण्याची इच्छा झाली. हा सांगावा देऊन आपल्या शिष्याला धाडावे म्हणून चांगदेव पत्र लिहिण्यास बसले खरे; पण अजूनही अहंकारानं मन भरलेलं असल्यानं बालयोग्यांना काय मायना लिहावा हे न कळलेल्या चांगदेवानं एक कोराच कागद या भावंडांना पत्र म्हणून पाठवला.

तो कोरा कागद बघून, एवढ्या तपस्येनंतरही ज्ञानप्राप्ती न होता मन तसचं कोरं राहिलेले बघून मुक्ताई अचंब्याने उद्गारली 'कोरा रे कोरा' मग निवृत्तीच्या आज्ञेनं ज्ञानेश्वरांनी ६५ ओव्या रचून चांगदेवाला 'आत्मज्ञाना'चा उपदेश केला. ती 'पासष्टी' (ओव्यांची) घेऊन शिष्य चांगदेवांकडे आलां खरा; पण 'स्व-अहंकारात' मग्न असलेल्या चांगदेवांना या अभंगांचा ओव्यांचा अर्थ समजला नाही. मग स्वत:च जाऊन त्यांची भेट घ्यायची, असे त्यांनी ठरविले आणि आपल्या योगसामर्थ्याचे दर्शन घडविण्यासाठी हिंस्र वाघावर ते स्वार झाले, हाती विषारी सर्पाची दोरी होती. चौदाशे शिष्यांच्या लवाजम्यासहित वाजत गाजत चांगदेवांची स्वारी आळंदीपर्यंत पोहोचली. त्यांच्या आगमनाची चाहूल या भावंडाना लागताच निर्जीव भिंतीला सचेतन करून ती भिंत चालवत ही चारही भावंडे चांगदेवांच्या स्वागताला गेली. ते पाहून योगसामर्थ्याने पश्चात्ताप पावलेले चांगदेव त्यांच्या पायाशी लीन झाले. आता ज्ञानदेवांनी त्यांच्यावर अनुग्रह करावा व त्या पासष्ट ओव्यांचा अर्थ समजावावा म्हणून त्यांनी ज्ञानदेवांची प्रार्थना केली. पण ज्ञानदेवांनी परत एकदा आपल्या 'योगमायेचा - मुक्ताई'चा आत्मसन्मान करत चांगदेवांना समजावण्याचं कार्य मुक्तेवर सोडलं.

मुक्ताई चांगदेवांची गुरु झाली. जगातील सर्वात अद्भुत अशी ही गुरु-शिष्याची जोडी बारा-तेरा वर्षांची परकरी पोर गुरु आणि चौदाशे पावसाळे पाहिलेले वयोवृद्ध शिष्य ! केवढा हा 'आत्मसन्मान' !

साडेसातशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या, अवघं १८ वर्षांचं अल्प आयुष्य जगलेल्या मुक्ताईला आलं होतं खरं-खुरं 'आत्मभान' आणि म्हणूनच तिला मिळाला. खराखुरा 'आत्मसन्मान'.

आज लौकीकार्थानं स्त्रीचं आत्मभान', 'आत्मसन्मान' हे शब्द आपण वारंवार वापरतो खरं; पण यासाठी ही आपली साऱ्या स्त्री जातीची 'आई'च आपल्याला मार्गदर्शन करते. बळ देते. सरिता पदकींच्या कवितात व्यक्त केलेल्या या भावनांसारखी -

*परवाच मला मुक्ताई भेटली - अशी इंद्रायणीच्या काठावर*
*तिच्या मुखावर होती विजेची झळाळी*
*आभाळातल्या विजेनंच तिला कवेत होती ना घेतली ?*
*आई माझ्याकडे बघून हसली, नि म्हणाली का गं माझ्या लेकी*
*माझी वारस असून देखील तू का अशी विषण्ण ?*
*तुझी हालचाल का गं अशी मंद उद्विग्न ?*
*मी थांबले, कसनुशी हसले, अन् मी एकदम विचारलं*
*खरंच ग माझ्या आई तुला कसं सारं जमलं ?*
*तीन भावांची परकरी आई झालीस, त्यांच्याबरोबर भिंतीवरून*
*सहल करून आलीस -*
*त्यांना मांडे करून घातलेस - त्यांचे रूसवे सोडवलेस आणि*
*ताटीचे अभंगही रचलेस*
*वाघावर स्वार होऊन आलेल्या शिष्याचं*
*तू एक रांगतं बाळ बनवलंस*
*कसं जमलं तुला हे सारं ?*
*कशी झाली नाहीस तू खिन्न, उद्विग्न माझ्यासारखी ?*
*आपला विजेचा हात, माझ्या मुखावरून फिरवीत मुक्ताई म्हणाली,*
*पोरी, अगं जग वन्हिच असतं - पण आपण पाणी असतो.*
*आपलं पाणीपण ओळखून आपण वन्हिशी खेळायचं असतं.*
*असं केलं की जय आपलाच असतो नि आभाळातील*
*वीजही आपलीच असते.*
*इतकं सांगून निघून गेली मुक्ताबाई-माझी आई सातशे वर्षांची*
*आता माझ्या मुखाला आहे झळाळी विजेची !*

❑❑

चेहऱ्यावरचे हसू... एक अशी भेटवस्तू आहे जी खूप अनमोल आहे. ज्यामध्ये देणाऱ्याचे काहीच जात नाही; पण घेणारा खूप आनंदी होऊन जातो.


जीवनामध्ये तुमच्या चांगल्या कामाबद्दल जर कोणी प्रशंसा केली नाही तर दु:खी होऊ नका. कारण तुम्ही अशा जगामध्ये राहता, जिथे जळते तेल आणि वात. पण लोक म्हणतात दिवा जळत आहे.

**जयश्री अलूर**

9767428283, ग्रुप १२

# अविस्मरणीय ‘राजबाग’

– बी. बी. कुलकर्णी
9822051830, ग्रुप नं. २६




‘‘गणपती बाप्पा मोरया’’, ‘‘श्री गुरुदेवदत्त’’ अशा गजरात आमच्या दोन्ही बसेस निघाल्या. २६ फेब्रुवारी २०२२ ची रम्य सकाळ आणि कोथरुड एमआयटी कॉलेजचा परिसर. वेळ सकाळी ७.३० ची. आम्ही सगळे नृपो मेंबर्स उत्साहाच्या भरात ‘‘राजबाग’’ आणि आशियातील सगळ्यात भव्य-दिव्य असा डोम बघावयास निघालो होतो. कोरोनाची भिती मनातून केव्हाच गेली होती.

बस एमआयटी कॉम्प्लेक्स कोथरूडमधून बाहेर पडताच, श्री. विद्याधर देशपांडेने बसचा ताबा घेत, नृपो मेंबर्सचा, रोलकॉल घेऊन, सगळ्यांना पाण्याची बाटली, बिस्किटांचा छोटा पुडा, गोळ्या असा छोटा पण आवश्यक पॅक देऊन चकीत केले. गप्पांच्या ओघात आमची बस राजबागमध्ये कधी पोहोचली आणि तेथील ‘‘कॅफेराज’’ समोर कधी थांबली हे कोणाच्याच लक्षात आले नाही.

समोरचा ‘‘राजकॅफे’’ बोर्ड बघताच, सगळ्यांनाच सकाळच्या ब्रेकफास्टची आठवण झाली. समोरच मुळा-मुठा संगमाचे पात्र खूपच विस्तृत आणि त्यातील ३ देवळासारखे घुमट प्रत्येकाचे लक्ष वेधून घेत होते. डोळ्याचे पारणे फिटण्यासारखे दृश्य बघतच आम्ही सगळ्यांनी आमचा ब्रेकफास्ट घेतला.

ब्रेकफास्ट घेतल्यावर आम्ही सगळे परत बसनेच एमआयटी युनिव्हर्सिटी कॉम्प्लेक्समधील आशियातील भव्य दिव्य डोम बघावयास पोहोचलो. समोरचा डोम खरोखरीच भव्य दिव्य आणि विलोभनीय होता. (फोटो नं. १) डोमच्या २५-३० पायऱ्या चढून गेल्यावर मात्र आतील भव्यता पाहून धन्य धन्य वाटले. आत शिरताच श्री. मोहन (आमचा गाईड) आमची वाट पहातच होता. त्याने डोमची उंची, परीघ, कपॅसिटी (प्रेक्षक बसण्याची क्षमता) जमिनीपासून ते मध्यावरचे टोक त्याची उंची हा सगळा तपशील सविस्तरपणे सांगितला. काहीजणांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पण नीट आणि सविस्तरपणे सांगितली. डोममध्ये प्रत्येक दिशेला उभे करण्यात आलेले आणि नुकतेच पेंट केलेले १६ पुतळे खूपच आवडले. त्या पुतळ्यात प्रामुख्याने संतमहिमा जाणवत होता. आमचे नृपो मेंबर्स या सगळ्याचे फोटो काढण्यात गर्क झाले होते.

त्यानंतर आमच्या मेंबर्सचा मोर्चा सप्तर्षी मुनींच्या आश्रमाकडे वळवण्यात आला. (फोटो नं. २) विश्वामित्र, जमदग्नि, अत्री, भारद्वाज, गौतम, कश्यप.... असे सप्तश्री मुनीच्या आश्रमांपैकी ४थ्या नंबरचा आश्रम आम्ही सगळ्यांनी आतून बाहेरून व्यवस्थित पाहिला. या आश्रमाचे वैशिष्ट्य असे की, फार पूर्वी या ऋषीमुनींच्या आश्रमात त्यांचे साधक-शिष्य तेथेच राहून तेथील मुनींची सेवा करत, विद्या ग्रहण करत असत. या सगळ्या आश्रमांनी तेथील रम्य, पवित्र वातावरणाने आम्हा सगळ्यांनाच ऋषी-मुनींच्या काळात नेऊन सोडले. तेथील हवनकुंडही पहाण्याजोगे आहे. आम्ही सगळे नृपो मेंबर्स ऋषीमुनी आश्रम यातून बाहेर येताच आमच्या मोहन गाईडने आम्हाला ‘‘सारेगममपधनी’’ या म्युझिकल शब्दांचे महत्व सांगावयास सुरूवात केली.

श्री. मोहनने आश्रमापासून जवळच असलेल्या ‘‘म्युझिकल डोम्स्’’ जवळ आम्हा सगळ्यांना आणले. या ७ डोम्स (सात म्युझिकल अक्षरे) पैकी पहिला डोम् (सा या अक्षराचा) मध्ये जुने नवे असे संगीतातील वाद्ये, काचेच्या कपाटात नीट ठेवली होती. (फोटो नं. ३) या वाद्यांचे नाव आणि कसे वाजवले जाते याचा बोर्ड होता. ‘सा’ बद्दलचे साग्रसंगीत

महत्व मोहनने सांगितले. याप्रमाणेच रे, ग, म, प, ध, नी चे डोम्स एकमेकांना जोडून होते. येथील वाद्याबद्दलची बरीच माहिती आम्हा सगळ्यांनाच तशी नवीनच होती, पण मनोरंजक होती.

आतापर्यंत पाहिलेले डोम्स्, मुनींचे आश्रम, सारेगम डोम्स एवढे सारे बघत असतानाच आम्हा सगळ्यांचेच पाय भरून आले होते. जवळच्या पाण्याच्या बाटल्यापण रिकाम्या झाल्या होत्या आणि मुख्य, बराच वेळपण झाला होता. असे सगळे होत असतानाच आम्ही इंडियाचा ग्रेट शोमन राज कपूरच्या कुटीराजवळ (जेथे राज कपूर त्याच्या सिनेमाचे / फिल्ममधील भागांचे लिखाण करत असे) आलो होतो आणि मग काय. झालेले श्रम विसरून, सगळेचजण कुटीर बघण्यात दंग झाले. एव्हाना लागलेली भूकही जवळजवळ पळून गेली होती. राजकपूरची ही कुटीरा आणि फोटो प्रदर्शन दुरूस्तीसाठी बंद होते, पण आम्हां नृपोमेंबर्ससाठी आणि श्री. कराडसाहेबांच्या मेहरबानीने ते विनामूल्य दाखवण्यात आले.

आत शिरताच राजकपूरच्या प्रत्येक सिनेमा सुरु होण्याआधी (टायटलपूर्वी) श्री. पृथ्वीराजकपूर शंकराच्या पिंडीची पूजा करत असताना दाखवले जातात. (फोटो नं. ४) त्याचीच हुबेहुब प्रतिमा येथे केलेली आहे. पृथ्वीराज कपूर, मिसेस पृथ्वीराज, त्यांच्या उजवीकडे शेजारीच राज कपूर, कृष्णा कपूर हे पुतळे अगदी खऱ्याप्रमाणे भासत होते आणि नकळतच प्रत्येक नृपो मेंबरच्या तोंडून वा! अप्रतिम, वाव!, ओ माय गॉड असे अनेक रिमार्कस् आले. मेंबर्सनी आपले कॅमेरे, मोबाईलस् सरसावून सगळे टिपून घ्यावयास सुरूवात केली आणि जेव्हा मेंबर्स तेथून हलण्याचे नाव घेत नव्हते तेव्हा आमचा गाईड शेवटी म्हणाला, ''अजून खूप छान गोष्टी, अनेक नट नट्यांचे मोहक पुतळे बघावयाचे आहेत, तरी कृपया पुढे सरकत राहा.''

(फोटो नं. ५) त्यानंतर श्रीमती कृष्णा कपूर व राज कपूरचा पुतळा होता. तो इतका सजीव वाटत होता की राज कपूर आता पुढे येईल आणि आमच्याशी बोलू लागेल असे वाटत होते. या सगळ्याबरोबरच नृपो मेंबर्सचे मोबाइलस्, कॅमेरे अखंडपणे चालू होते. सगळेजण हळू हळू पुढे सरकत होते. यानंतर मात्र प्रत्येक मेंबर आपापल्या आवडत्या नट, नट्यांसोबत उभे राहून पुतळ्यावर हात टाकून किंवा पुतळ्याच्या कमरेवर (हे नट्यांच्या बाबत होत होते) हात ठेवून सेल्फी किंवा इतरांकडून फोटो काढून घेत होता.

एक गोष्ट इथे आवर्जून सांगावीशी वाटते की, प्रत्येक पुतळ्याजवळ सिनेमाचे नाव, साल वगैरे माहिती बोर्डावर लिहिलेली होती, त्यामुळे प्रत्येकाला तो पुतळा, ते लिखाण त्यांच्या काळात घेवून जात होता. त्यामुळे प्रत्येकाने फोटो काढून घेण्याच्या गंगेत मुक्तपणे हात धुवून घेतले, आम्हीपण त्यात मागे नव्हतो.

थोड्यावेळ का होईना, आम्ही सगळेच पोटपूजा विसरलो होतो आणि बहुतेक मेंबर्स विभागले गेले होते.

एक अप्रतिम संग्रहालय पाहिल्याचे मनापासून समाधान वाटले. या राजबागेत, याबरोबरच मधल्या प्रवासात जात असताना पाहिलेले विठ्ठलाचे मंदिर, तसेच इतर मंदिरातील देव आणि संगमरवरी भव्य मूर्त्या आठवून आजच्या दिवशी काही भव्य पण दिव्य पाहिले याचे समाधान वाटते.

परत ''राजकॅफे'' मध्ये भरपूर पेटपूजा केल्यावर आम्ही सगळेजण तेथील Auditorium (Amphi Theatre) मध्ये जमा झालो. थिएटर A/C असल्याने आणि पोट तुडूंब भरले असल्याने बहुतेकांना निद्रा येण्यास सुरूवात होत असतानाच समोरच्या भव्य पडद्यावर ज्ञानेश्वर माऊलींचा आणि प्रो. कराड आणि भव्य फोटो आला. प्रो. कराड हे श्री ज्ञानेश्वर माऊली आणि स्वामी विवेकानंदांचे परम भक्त, त्यामुळे येथील मंदिरे, आश्रम, डोम, राज कपूरचे फोटो आाणि पुतळे संग्रहालय हे राज कपूरकडून मिळवून त्याची जपणूक कशी केली आहे, त्याची फीत दाखवण्यात आली.

या सगळ्यांबरोबर, प्रो. कराड यांनी त्यांच्या येथील एम आय टी युनिव्हर्सिटीसाठी जागेचा, माणसांचा आणि मनातील विविध कल्पनेचा विस्तार कसा केला आहे हे देखील प्रामुख्याने दाखविले आहे. शिवाय शिक्षण क्षेत्रात किती मोठी झेप घेतली आहे हेही ज्ञात झाले. यावरुन कोणतेही भव्य-दिव्य प्रकल्प व त्याची उभारणी करायची असेल तर तेथे भगवंताचे अधिष्ठान असतेच, याची प्रचिती आली.

हे सगळे बघत असतानाच बाहेरच्या कॉरीडॉरमध्ये कप बशांचा आवाज आला आणि सिनेमा फीतही संपली होती म्हणून सगळेजण चहा-कुकीज घेण्यास आणि जड मनाने परतीच्या प्रवासास सज्ज झाले.

❑❑

# लँडलाईनचे दिवस

– अंजली देशपांडे
8956270935, ग्रुप नं. १६

असं म्हणतात की, प्रत्येक गोष्टीला एक एक्सपायरी डेट असते. तसा आमचा लँडलाईन फोन नुकताच कैलासवासी झाला. म्हणजे मला हवा असतानाही तो चालू करून मिळत नाही. आज ना उद्या परत करावा लागेल. बदलत्या काळानुसार मोबाईल नावाची चीज आहेच जवळ. पण त्याचे लहरी काम. बोलल्याचे समाधान मिळत नाही; पण जुळवून घ्यावे लागणार. प्रत्येक कॉलचे नशीब वेगळे असते. असो, तर आता टाईम मशीनमध्ये बसून थोडे मागे जाऊन पाहू या.

मन कित्येक वर्षे मागे जाऊन बालपणीच्या मुंबईत पोहोचले. साधा फोन घरात असण्याचे अप्रूप वाटण्याचे ते दिवस. आमच्याकडे तो असण्याचा प्रश्नच नव्हता. माझ्या प्रोफेसर वडिलांकडे माझ्या लग्नानंतर आला. माझ्या मोठ्या मावशीचे मिस्टर इंजिनियर. एका कंपनीत चांगल्या हुद्द्यावर होते. एके दिवशी त्यांनी अनाउन्स केले की त्यांच्या घरी फोन येणार. मी व मावसबहिण शाळकरी पोरीच. हुरळून गेलो. फोन आल्यानंतरच्या पहिल्या रविवारी माझा मुक्काम त्यांच्याकडेच. तिला नव्याची नवलाई शेअर करायला मी हवी होते. मग काय आम्ही धडाधड नंबर्स फिरवीत बसलो. गोल फिरणारी तबडकी. तिचा कईऽऽ असा विशिष्ट आवाज. कुणीतरी उचलायचं, आम्ही तोंडात येईल ते बोलायचं, खिदळायचं अशी मजामजा चालली होती. तेवढ्यात आमची नजर डिरेक्टरीवर पडली. भरभर पानं चाळू लागलो ए नंतर बी आणि एक वेलनोन नाव दिसलं की. आशा भोसले. होय, त्या काळी प्रसिद्ध व्यक्तिंचे नंबर्स असायचे डिरक्टरीत. धीर करून चक्क नंबर तर फिरवला. आधी तू बोलते का मी झालं आणि मग दोघींनी थोडं थोडं बोलायचे ठरलं. मी जरा मोठी म्हणून सुरवात केली. छान रिंग वाजली आणि धडधडत्या छातीने मी विचारलं आशा भोसले आहेत का ? आशाताई वगैरे म्हणायचं कुणाच्या गावी नव्हतं. लगेचच गोड पण धारदार स्वरात उत्तर मिळालं 'हो मी आशाच बोलतेय', त्या थांबल्या पण इकडे आमची भंबेरी उडाली. पुढे काय बोलायचं ? मग दोघींनी एका सुरात एवढंच सांगितलं आम्हाला तुमची गाणी खूप आवडतात. इतकंच, त्यांनी ताडलं असावं की कुणी लहान मुलीच असाव्यात. थोड्या गॅपनंतर फक्त म्हणाल्या 'हो का ! थँक्यू थँक्यू ! आणि फोन संपला. आम्ही धन्य झालो. कल्पनाही नव्हती केली की, त्याच फोन घेतील. स्टाफचं कुणी घेईल म्हणून धाडस केलं होतं.

अशीच फोन वाचून काही न अडता आयुष्याची वर्षे पुढे जात राहिली. इमर्जन्सीला एखाद्या शेजाऱ्याकडे फोन असायचा, ह्यांचा बँकेचा तर होताच. खरं सांगू, फोन न करताच मैत्रिणीने आपल्याकडे डोकावणं सुखाचं वाटायचं. बदल्यांची गावे फिरलो आणि भोपाळला नवऱ्याला बऱ्यापैकी सिनीयॉरिटी आली. ऑफिसच्या फोनची प्रतिष्ठापना घरात झाली. १९८२ साली घरात प्रथम फोन आला त्यावेळची एक गंमत. तेव्हा हिंदी सिनेमांचा पगडा होता. नायक सतरादा ऑफिसमधून बायकोला फोन करून प्रेमालाप करताना दिसायचा. तर एकदोघी मैत्रिणी चक्क म्हणाल्या 'आता काय बाई घरी फोन. दुपारी आठवण आली की गुजगोष्टी चालतात का दोघांच्या?' मी म्हटलं 'कप्पाळ, असं कहीही नसतं. तो सिनेमा आहे का ? कधी काही काम असलं, कुणी येणार सांगायचं असलं, येताना काही आणायचं असलं की फोन उपयोगी पडतो एवढं मात्र खरं', पण मनातून ही थट्टा गोड वाटली हं. आमची काही नव्याची नव्हाळी नसली तरी आयुष्यातला रोमान्स हरवला नव्हता.

या बँकेच्या कॉलनीत अवघे ४-५ फोन होते आणि त्यातले मराठी आम्हीच होतो. साहजिकच कुणाकुणाच्या नातेवाईकांचे बरे-वाईट निरोप आमच्याकडेच यायचे. अजून आठवते, तळमजल्यावरच्या मैत्रिणीचे वडिल सिरियस असल्यामुळे ॲडमिट असल्याचा तिच्या भावाचा फोन आला. तेव्हा बोलताना तिचा कापणारा आवाज आणि भरलेले डोळे पाहून मला भरून आले होते. एका शेजारी फोन शेजारच्या सोफ्यावर ऐसपैस बसून परगावच्या नातेवाईकांशी मोठ्याने हास्यविनोद करायचे.

कलर टीव्ही नुकताच आला होता आणि आम्ही प्रथम घेतला तो कलरच. बऱ्याच जणांकडे ब्लॅक ॲण्ड व्हाईटच होता. त्यामुळे क्रिकेट मॅचला कधी कधी आमचा हॉल भरायचा. तसेच इंदिराजींची हत्या झाली तेव्हा अंतिम दर्शन घ्यायला बरेच जण आमच्याकडे आले. आतून त्यांचे शव व्यवस्थित तयार करून

दर्शनासाठी आणून ठेवले. ठेवतानाचा चेहऱ्याचा क्लोज अप पाहून असा सार्वत्रिक शुकशुकाट खोलीभर झाला की मन हेलावून गेले. फोन आणि टीव्ही एकाच ठिकाणी हॉलमध्ये होते म्हणून थोडे विषयांतर.

१९८४ च्या भोपाळ गॅस दुर्घटनेच्या वेळी तर आमच्या फोनने मोठीच कामगिरी बजावली म्हणायला हरकत नाही. रात्री तीनच्या सुमारास दरवाज्याची बेल वाजली. आमच्या एका ऑफिसरचे गावात राहणारे नातेवाईक जोडपे नेसत्या वस्त्रानिशी अक्षरश: पळत या दूरच्या रिझर्व्ह बँक कॉलनीत आले होते. तिघांनी आम्हाला उठवलं. गॅलरीत जाऊन बघतो तर दूरवर दिसणारा मेन रोड वाहनांच्या दिव्यांनी चकाकत होता. लोक पळून चालले होते. ताबडतोब माहिती घ्यायला फोनाफोनी सुरू केली. लोकल न्यूज पेपरचे रात्रपाळीचे कर्मचारी निघूनच गेले होते, पोलीस फायर ब्रिगेड उचलत नव्हते, अफवांसाठी खबरदारी म्हणून हातात टेलिफोन धरून प्राण सोडणाऱ्या धीरोदात्त स्टेशनमास्तरांची कथा सगळ्यांनी वाचली असेल. इतर ट्रेन्सनी भोपाळकडे येऊ नये हे कळविण्याचा आटापिटा ते करीत होते. नंतर आमचा फोन संपर्क दिवसभर तुटला. नागपूरहून माझ्या मोठ्या जाऊबाईंनी टेलिफोन एक्सचेंजमध्ये ओळख काढून आमचा भाग सुखरूप असल्याची माहिती मिळवली. रात्री फोन सुरू झाला. संपूर्ण भोपाळ प्रेतांचे नगर झाल्याची देशभर अफवा पसरली होती. रात्रभर आम्ही कॉलनीतल्या इतरांच्या कुटुंबियांचे कॉल्स घेत होतो, त्यांना आश्वस्त करीत होतो, एकाचा भाऊ तर फोनवर रडायलाच लागला. तुम्ही खोटं सांगताय, माझा भाऊ जिवंत नाही म्हणायला लागला.

नंतर आम्ही पुण्यात बँकेच्या क्वार्टर्समध्ये आलो. इथेही आम्हा चौघांकडेच फोन होता; पण काळ पुढे गेल्याने सर्वांचे निरोपाचे वेगवेगळे मार्ग होते. शिवाय येथे नव्याने ऑफिस उघडल्याने एकमेकांच्या फारशा ओळखी नव्हत्या. काही अर्जंट असेल तरच ते आमच्या फोनचा वापर करायचे. तरी एक घटना घडली. वरच्या एका कॉलेजच्या मुलाने आपल्या मैत्रिणीला आमचा नंबर देऊन ठेवला होता. ती अधूनमधून ठराविक वेळी फोन करायची. त्यावेळी तो हजर व्हायचा. बोलवायला वगैरे लागत नव्हते. पण ता वरून ताकभात ओळखता येतो. हे आईवडिलांना माहित नव्हते, हे उघड होते. ह्यांनी मग एक दिवस ही गोष्ट त्याच्या वडिलांच्या कानी घातली. म्हणाले त्याला रागावू नका. हे वय असतं, पण आमच्या घरी नेहमी असं कसं चालेल ? तर हे झालं अनुभवांविषयी. फोनचं सांगायचं तर पुढे मुंबईत प्रथम आमच्याकडे कॉर्डलेस, आन्सरिंग मशीन आले. त्याचे थ्रिल वाटले. स्पीकर फोन मी प्रथम एका बिल्डरच्या ऑफिसमध्ये पाहिला. खोलीभर दुमदुमणारा तो आवाज जादुई वाटला. नंतर हे कॉमन झाले.

अशा माझ्या आवडत्या फोनने पुण्यात असताना काही काळ मात्र मला रडवलं, माझ्या वडिलांनाही फोनवर बोलायची खूप आवड, भरपूर बोलायचे, हसवायचे सगळं मनातलं सविस्तर सांगायचे आणि शेवटी विचारायचे आईशी बोलायचंय का ? त्यांच्यानंतर मुंबईहून फोन आला की उचलायला नको वाटायचं, बोलून झालं की रडवेलं व्हायचं, काहीतरी राहून गेलंय वाटायचं आणि आईला कळू नये म्हणून तारेवरची कसरत करायची.

बघता बघता मोबाईल, स्मार्ट फोन आय फोनचे युग अवतरले आहे. त्याचे सर्व बारकावे अवगत करायला जमतेच असे नाही. तरीपण त्याचे फायदे बरेच आहेत यात शंका नाही. नव्या जमान्यात लँडलाईन फोन आवडणारी माणसे कालबाह्य होत चालली आहेत. सगळे काही ऑनलाइन. तारा बंद झाल्या, मनीऑर्डरी बंद झाल्या, तसाच एका जागी वायरला लटकलेला फोनही. तरीही ज्यांचे चालू आहेत त्यांना मी आवर्जून लँडलाईनवर कॉल करते. ती विशिष्ट बेल 'टिरिंग टिरिंग' कान भरून ऐकते आणि आठवणींच्या जगात मनसोक्त विहार करून येते.

❑❑

## अन्य नसे पर्याय

वाटले नव्हते कधी, हा काळ आहे यायचा,
हा कोरोना, साऱ्या जगाला अस्वस्थ करुनी जायचा!
सान-थोर, राव-रंक, कोणासही ना सोडले,
कित्येक निष्पाप जीव याने, यमसदनी धाडिले.
ठप्प झाले व्यवहार सारे, ह्या कोरोना कारणे,
आपुल्याच हाती आता, सदा सतर्क राहणे.
सामना करण्यास त्याचा, नियम पाळूया तरी,
त्याचेसवे राहण्याची, वेळ आली आहे खरी.
अंत करण्या कोरोनाचा, नाही दुजा उपायही,
संगतीने रहाण्याविना, अन्य ना पर्यायही!!

**– सुधाकर सुदामे**

9850719602, ग्रुप नं. २४

## FOLLOW UP OF NRIPO VISION 2022 WORKSHOP ON ZONING & CLUSTER MEETINGS

**Rajendra Mahulkar**
9822773020, Group 12



On Sun 24th Apr 2022 from 10 am to 5 pm, Nripo Executive Committee had its full day Workshop on 'NRIPO Vision 2022' at Savitri Resort in backdrop Varasgaon Dam backwaters. This was first of its kind, though some works were done earlier by predecessor Presidents. There were primarily five following Sessions, each sub session was addressed by each Committee Member. The spouses were specially invited to understand their views on representative basis of our female Members. All the Sessions were chaired by the current President Suresh Kango being assisted by Rajendra Mahulkar as Convener. A compilation Report (44pages) was distributed as study material comprising previous works done, other program details and Feedback Form. At end, Ashok Deshpande, Committee Member & Co Convener, who was assigned task to take down notes, summarized. Members were interacting during the sessions and also at end. Suresh Kango summed up with remarks to implement some of the vital issues and to prepare Road Map for the successor teams.

| Session | Sub Session | Subject | Initiator |
|---|---|---|---|
| I | 1 | Introduction | Suresh Kango |
| | 2 | Background, Content & Conduct | Rajendra Mahulkar |
| II | 3 | Constitution, Trust & Awards | Suresh Natu |
| | 4 | Office Administration & Logistics | Prakash Kulkarni |
| III | 5 | Finance & Accounting | Open House |
| | 6 | Nripo Jagat | Vaidehee Kulkarni, Editor |
| | 7 | HQ Programmes | Bhalchandra Kulkarni |
| IV | 8 | PR & Fund Raising | Vidyadhar Deshpande |
| | 9 | Membership | Vasudev Kench |
| V | 10 | Summarisation | Ashok Deshpande |
| | 11 | Suggestions & Feedback | Open House |
| | 12 | Overview & Concluding Remarks | Suresh Kango |

The primary purpose of this Workshop was to bring about bonding within the Group and outside with the other Groups, bringing in more homogeneity in administration through preparation of Standard Operating Practices / Procedures (SOPs), effective group meetings - attendance – comradeship, quality and assimilative programmes, bringing in funds and finally sound sustainable membership.

The major issue came up was opportunities for assimilation and participation. It is known that customarily, Nripo HQ arranges 4 programmes during the year eg Sankrant Melava (January), Vasantik Melava (May), Foundation Day (September) and Diwali Melava. During these Melavas, invitation is extended to all Members, be Couple or Single.

However, in addition, every Group (27 in Pune + 28th for Out Stn Members), jointly as indicated in Members' Directory perform / conduct internal programmes, picnics etc. To run this administration smoothly, the HQ has identified Observer from amongst the members of executive committee as its Representative to assist Group Leader and two Coordinators as identified by Consortium of Groups. We have so far, registered about 1420 Members on Roll but currently, about 372 within City appear to be active. For each Group Meeting as and when arranged, attendance is dwindling, Nrupojagat, information not reaching on time or not delivered, age not in favour, health does not respond, few migrated abroad with children. This causes major concern. During Sept 2018, our former President Nandkumar Swadi floated an idea of Cluster Meeting in batches with Group Leader + Coordinators as to understand each other ie Groups & HQ, how to bridge better liasioning and rapport, increase membership, strengthen mutual relationship and bonding with respect and concern etc. A Report of SWOT (Strength, Weaknesses, Opportunities & Threats) was prepared following meetings on 5th, 12th, 19th & 26th Oct 2018. The 'One by Two Scheme' to take care of needy Members, Office Administration were also discussed. The Re-Grouping and Zoning were also then considered. This Workshop, unanimously, decided to re examine these issues and lend priority.

From this point of view, it is proposed to re group all 27 groups into 8 Zones, to activate functioning and motivate participation. The attached Pune City Plan with proposed Zonal boundaries is given for reaction of Members before planning for and conducting Cluster Meetings. Briefly, the regrouping may be as under. The boundaries may change / modify depending on needs from time to time. The number in the following tables are based on information in Members' Directory 2020 and is indicative only.

| Zone | Groups (Current) | Members |
|---|---|---|
| I | 7,8,9,10 (Kalyaninagar) | 45 |
| II | 1,2,3,3,4,6,5 (old Gaothan, Satara Road) | 61 |
| III | 11,12 (East of Karve Road, Kothrud, Karvenagar) | 40 |
| IV | 13,14,15,16.17 (Wtst of Karve Road, Kothrud, Paud Road, Chandani Chowk) | 77 |
| V | 18,19,20 (Prabhat – Law College – Bhandarkar Road) | 36 |
| VI | 22,23,24 (Ganeshkhind – University Road, Shivaji Nagar, Model Colony) | 45 |
| VII | 25,26,27 (University – Pashan – Baner Road, Aundh, Pashan, Baner, Bavdhan) | 68 |
| | | **372** |
| | **N.B. -** Group 28 is Out Stn. Group 21 is not there | 10 |

**These Members, age wise, are generally distributed as follows:**

| Age (years) | Members |
|---|---|
| ➢ 90 | 10 |
| 85 to 90 | 47 |
| 80 to 84 | 97 |
| 75 to 79 | 98 |
| 70 to 74 | 75 |

| Age (years) | Members |
|---|---|
| 60 to 69 | 38 |
| < 60 | 7 |
| **Total** | **372** |
| Single | 115 |
| Couple | 257 |





## डॉ. पंडिता सुजाता नातू D.Litt.

सुजाता नातू यांचे नाव व त्यांची नृत्यसाधना आपणा सर्व नृपो सभासदांना सुपरिचित आहेच. गेल्या पाच तपांहून अथक चालू असलेली तपश्चर्या आणि नृत्यकलेच्या पुनरुत्थपनेसाठी प्रयत्न, हे व्रत घेतल्यासारखे त्या करत आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे नृत्य हा विषय शाळा शाळांमधून चालू झाला. तसेच त्यांच्या पाठपुराव्यामुळे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठ येथे नृत्यासाठी डिप्लोमा, डिग्री आणि पुढील उच्च शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. त्याआधी नृत्य हा विषय पूर्ण उपेक्षित होता आणि त्यात आखीव शिक्षणाची कुठेही सुविधा नव्हती. ‘नृत्यकला विद्येला जोडली गेली तरच तिला प्रतिष्ठा प्राप्त होईल’ हे ध्येय वाक्य त्यांनी सतत पाळले. आज नृत्यकलेचा झालेला प्रसार हा त्याचाच परिपाक आहे. सुजाताताईंची आपल्याला न असलेली ओळख म्हणजे कॉलेज जीवनात त्या राष्ट्रीय ॲथलेटिक्स चॅम्पियन व युनिव्हर्सिटीच्या खो खो संघाच्या कॅप्टन होत्या. रनिंगमध्ये त्यांची ऑलिंपिक स्पर्धेच्या पात्रता फेरीसाठी निवड झाली होती. तसेच युपीएससीची प्रतिष्ठेची परीक्षा देऊन त्या ऑल इंडीया रेडिओमध्ये एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून कार्यरत होत्या. पण ते सर्व सोडून शेवटी त्यांनी नृत्यकलेलाच जीवन वाहून घ्यायचं ठरविलं. वेगवेगळ्या संस्थांकडून अनेक मानसन्मान त्यांना मिळालेले आहेत. प्रत्यक्ष कै. पंडित बिरजू महाराजांनी त्यांना पंडिता हा सन्मान दिला आहे. नुकताच त्यांना बडोद्याच्या राजमाता शुभांगीराजे गायकवाड यांच्या हस्ते ‘नृत्य चन्द्रकला’ हा पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या या प्रदीर्घ कार्याची दाखल घेऊन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने त्यांना **D.Litt.** या सर्वोच्च सन्मानाने विभूषित केले आहे. आपल्या सर्व नृपो परिवारासाठी ही खचितच आनंदाची बाब आहे.

## आदरणीय डॉ. विश्वनाथजी कराड यांना मानपत्र प्रदान






राजबाग एक विलक्षण अनुभूती .......

आदरणीय डॉ. विश्वनाथजी कराड,
संस्थापक, अध्यक्ष एम.आय.टी. विश्वशांती विद्यापीठ पुणे.

महोदय,

समस्त NRIPO (नॉन रेसिडेंट इंडियन्स पेरेंट्स ऑर्गनायझेशन) सदस्यांकडून सस्नेह नमस्कार..!

आपल्या सुविख्यात राजबाग, एम.आय.टी. विश्वशांती घुमट परिसर, लोणीकाळभोर, पुणे, येथील भेटीसाठी, आम्हा जेष्ठ सदस्यांकरिता आपण केलेले आदरातिथ्य व भोजन व्यवस्था तसेच इतर सोयी सुविधा, आणि संकुल दाखविण्यासाठी दर्शविलेली सौहार्दता याबदल मन:पूर्वक धन्यवाद !

राजबागेमध्ये प्रवेश करताक्षणीच आणि पुढे पदोपदी शब्द केवळ बापुडवाणे... अशीच आम्हा सर्वांची अवस्था झाली. ज्ञानगंगा आणि भक्तिगंगा यांच्या संगमावरील विश्वविख्यात उत्तुंग घुमट असो, 'शिष्यस्तेऽहंशाधि मां त्वां प्रपन्नम्' अशी व्याकूळ अंतःकरणाने विनवणी करणारा अर्जुन असलेले 'गीतादालन' असो, संगीत कलेची सा रे ग अशी भारतीय आणि वैश्विक वाद्यांनी सजविलेली सप्तसुर दालने असोत किंवा भारतीय चित्रपट सृष्टीच्या सुवर्णयुगात महत्वाचे योगदान देणाऱ्या राज कपूर या महान शोमॅनचे 'स्मृती-संग्रहालय' असो, सर्वत्र स्थापत्यकला, अभिरुची संपन्न सौंदर्यदृष्टी, भारतीय सनातन संस्कृती, परंपरा आणि मूल्ये यांचा परीसस्पर्श ठायीठायी जाणवतो.

'जे न देखे रवी ते देखे कवि'.. आपली संकल्पना, नियोजन, स्थापत्य, संकल्प चित्रण या योगे एकहाती राजबागेची झालेली उभारणी पाहिल्यावर हे सर्व आपल्या अंतर्मनातून आले असावे. आपण खरोखरच एक सृजनशील 'कवी'च आहात.

जेव्हा कोणतीही भव्य दिव्य उभारणी व्हायची असते, तेव्हा तेथे भगवंताचे अधिष्ठान असतेच. आपण श्री ज्ञानेश्वर माऊलींचे आणि प.पू. स्वामी विवेकानंदाचे परम भक्त, ते आपले प्रेरणास्थान, म्हणूनच जगद्नियंत्याने योजकस्तत्र दुर्लभः .... या न्यायाने ज्ञानेश्वर अध्यासन, राजबाग व विश्वशांती घुमट या सारखे अनेक प्रकल्प भविष्यातही उभारणीसाठी आपली योजना केलेली आहे, यात शंका नाही.

शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पण्डितः।
वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥
यामध्ये थोडा बदल करून असे म्हणू या ....द्रष्टा भवति वा न वा..!!

आपल्यातील द्रष्ट्या मनाने केलेले सर्व संकल्प लवकरात लवकर साकार होवोत, व यासाठी आपल्याला दीर्घायू, उत्तम शारीरिक-मानसिक आरोग्य, उत्साह लाभो आणि आपले हे सारे कार्य साकार झालेले पाहण्याची संधी आम्हां सर्वांना लाभो, ही परमेश्वर चरणी प्रार्थना..!!

पुन्हा एकदा धन्यवाद व सादर प्रणाम !!

सुरेश कानगो
अध्यक्ष, नृपो, पुणे.

विद्याधर देशपांडे
कार्यकारिणी सदस्य, नृपो, पुणे.




| Zone | Group | No. |
|---|---|---|
| I | 7,8,9,10 | 45 |
| II | 1,2,3,4,5,6 | 61 |
| III | 11,12 | 40 |
| IV | 13,14,15,16,17 | 77 |
| V | 18,19,20 | 36 |
| VI | 22,23,24 | 45 |
| VII | 25,26,27 | 68 |




प्रार्थनामहे भव शतायुषी ।
ईश्वरः सदा त्वां च रक्षतु ।।



**सौ. सुनिता कुलकर्णी**
**२ फेब्रुवारी**



**नीला ठोसर**
**८ फेब्रुवारी**



**अशोक देशपांडे**
**१३ मार्च**



**डॉ. सुनिता जोगळेकर**
**२३ मार्च**



**अविनाश पानसे**
**१० मे**



**दत्तात्रय निकम**
**२२ मे**

# बुऱ्हाणपुर येथील आश्चर्यकारक जलव्यवस्थापन


– **शरद द. मांडे,** जल अभ्यासक
9860982825, ग्रुप नं. १७

(आपल्या ह्या 'नृपोजगत्' नियतकालिकात लेख देण्यामध्ये, सदस्यांच्या वैचारिक भावनांना एक चांगले व्यासपीठ उपलब्ध द्यावे व त्याचबरोबर नृपो सदस्यांना आपले पाल्य बाहेरच्या देशांत आहेत, त्यांची दैनंदिन जाणवणारी पोकळी ह्या निमित्ताने कांहीशी भरून निघावी म्हणून हा सुखसंवाद आहे. त्यादृष्टीने, 'नृपोजगत्' 'सेतू' म्हणून कार्य करीत असते. आपल्यातील कांहींचे पाल्य इराण, इजिप्त, तुर्कस्तान इ. वाळवंटी देशात असतील किंवा कारणपरत्वे त्या देशात जावे लागले असेलही, तेथील वास्तव्यातून त्या प्रदेशांची ओळख होतांना तेथील पाणी (?) पाहिले ही असेल, त्या दृष्टीने भारतातल्या बुऱ्हाणपूर येथील जलव्यवस्थापनाबद्दलचा हा लेख.)

**जल इतिहासाच्या पाऊलखुणा –**

भारतातील मध्य प्रदेशच्या राजधानी – भोपाळ पासून बुऱ्हाणपूरला पोहोचण्यासाठी रस्त्याने साधारणत: चार तास लागतात, परंतु मुघल साम्राज्याचा चमकणारा तेजस्वी काळ तुम्हाला इतिहासांत चार शतके मागे नेईल. बुऱ्हाणपूरच्या परिसरांत सर्व धर्मांचे ठसे उमटले आहेत. महत्त्वाचं म्हणजे शहाजहान बादशहाच्या पत्नीचा म्हणजे मुमताजचा बुऱ्हाणपूर येथे प्रसूती दरम्यान मृत्यू झाला होता व तो मृतदेह सहा महिने अहुखानाजवळ दफन करण्यात आला होता. नंतर ताजमहालमध्ये आकर्षक कबरस्थानात चिरस्थायी करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शहरांत जामा मशीद, शाही किल्ला, बीवी-की-मशीद इ. इस्लामिक संस्कृतीशी संबंधित असलेली, तसेच असीरगड आणि हिंदू समाजाची मंदिरे, शीखांची गुरुद्वारा बडी संघ, दाऊदी बोहरांची दर्गाह-ए-हकीमी, कबीरांच्या अनुयायांची कबीर पंथी – इ. प्रमुख स्थानके असून, त्या काळात व्यापार आणि बाजारपेठ सर्वाधिक व्यस्त होती. जरीकलाबटूचे कापूस, कपडे इत्यादी अगदी अफगाणिस्तान, अरब आणि युरोपियन देशांमध्ये निर्यात केले जात असत. बुऱ्हाणपूर येथे त्यावेळी सुमारे २ लाख पायदळांचा मोठा लष्करी तळ होता व दक्षिण भारतावर जाण्यासाठीचे प्रवेशदार म्हणून ओळखले जात होते. त्या जलव्यवस्थापन काळातील महत्वाची योजना म्हणजे बुऱ्हाणपूर येथील शहाजहाँने बांधलेल्या आठ भूमिगत बोगद्याद्वारे पाणी पुरवठा योजना की ज्यातील तीन योजना आजही चालू असून शहराच्या मध्यभागात सुमारे २५,०००-३०,००० लोकवस्तीला गेली ४०० वर्षे अव्याहत पाणी पुरवठा करीत आहेत. ह्या पार्श्वभूमीवर बुऱ्हाणपूर येथील शहाजहाँचे काळात १६१५ मध्ये आसिरगडच्या पायथ्याच्या टेकड्यावरील पाणी पाझरत नेवून, ५०-६० फूटावर चुनखडी, कोळसा ह्यावर फिरवून शुद्ध झालेनंतर बोगद्यातून ६-७ मैल अंतरावर शहरात वेगवेगळ्या भंडाऱ्यातून कारंजात आणले व नंतर जनतेला पुरविले ह्यावरून योजनेचे महात्म्य लक्षात येते. भारतातील सर्वात महत्त्वाची आणि कदाचित जगातील अद्वितीय ही भूमिगत बोगदा पाणीपुरवठा यंत्रणा आहे, जी १६१५-१६२० च्या सुमारास कार्यान्वित झाली. गेल्या ३००-४०० वर्षांत कालपरत्वे व शहराची सुधारणा करतांना उत्खनन झाल्यामुळे ५ योजना विस्कळीत झाल्या, निकामी बनल्या आहेत, म्हणूनच मूळ योजनांतील विविध घटक पुन:संचयित करणे, ते त्यांच्या मूळ डिझाइन केलेल्या स्तरावर कार्यान्वित करणे अत्यंत आवश्यक आहे. हे केवळ पाणी मिळविण्यासाठीच नव्हे तर जलविज्ञानांतील आश्चर्याच्या या ऐतिहासिक वास्तूचे जतन करण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी मध्ययुगीन वास्तुकला, काटेकोर जलप्रवाह, विज्ञान आणि स्थापत्य अभियांत्रिकी यांच्या एकात्मिक अभ्यासासाठी उपयोगी आहेत. इराणमधील 'कनात' प्रमाणेच या स्मारकीय हायड्रोलिक योजनेची पुन:स्थापना करण्याचे मुख्य ध्येय म्हणजे त्याचे महत्त्व ओळखणे, त्यातील ज्ञान आणि अनुभव येणाऱ्या पिढ्यांपर्यंत हस्तांतरित करणे आणि सांस्कृतिक वारसा जतन करणे. शतकानुशतके मोठ्या परिश्रमाने मिळालेले असे अनमोल अनुभव पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे अपरिहार्य वाटते. पाणी, संस्कृती, मानव आणि सभ्यता ह्यांची जपणूक हे एकमेकांशी खोलवर विणलेले गोफ आहेत. ऐतिहासिक हायड्रॉलिक संरचना आणि संदर्भित मानवता नेहमीच एकमेकांच्या खोल प्रभावाखाली असतात. या योजनांच्या अनेक

घटकांचे अवशेष चार शतके विचित्र नैसर्गिक आपत्ती, वातावरणीय परिस्थिती आणि आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांच्या दुर्लक्षानंतरही मजबूत आहेत, हे भाग्य.




स्थळ नकाशा

**मध्ययुगीन बुऱ्हाणपूर –**


पाण्याच्या स्त्रोताचे आसपास वस्त्या, गावे, शहरे, विस्तारली, शेती पसरली, उद्योगधंदे बहरले, त्यातून मानवी विकास झाला. ह्या विविध टप्प्यांतील संस्कृतीमध्ये जलाचे स्थान, त्यासाठी वापरलेली जलप्रवणता, वापर, जलपूर्ती इ. विषयांतून अवलोकन होते. जलसंस्कृतीचे नाते भौतिक, भावनिक व धार्मिक स्तरावर असते. त्यासाठी साहित्यिक – म्हणजे ग्रंथसंपदा उदा. स्त्रोत्रे, चरित्र, पुराणे इ. ('कौटिल्याचे अर्थशास्त्र', 'वराहमिहीराची बृहत्संहिता', 'गाथा सप्तशती' इ.), धार्मिक – म्हणजे पौराणिक वाङ्मय, पंचांग, ज्योतिष, इ. लोकगीते, तसेच भौतिक – म्हणजे प्राचीन अवशेष, शिलालेख, इत्यादि मौलिक साधने उपलब्ध आहेत. त्यावेळच्या भारतीय उपखंडात (हिंदूस्तान, पाकिस्तान, नेपाळ, भूतान इ.) इतिहासातील प्रदीर्घ व व्यापक बैठकीतून अनेक ऐतिहासिक घराण्यांचा कालखंड, संस्थापक नृपती, त्यांचे साम्राज्य, लोककल्याणासाठी कार्यान्वित केलेल्या योजना व जलव्यवस्थापनातील सहभाग आढळून येतो. साधारणत: समृद्ध विजयनगर साम्राज्याचे (इ. स. १३३५ ते १५६५) अस्तानंतर मध्ययुगीन कालखंड गणण्यात येतो. त्या काळातील सुमारे १३५ हून अधिक शिलालेखातून श्रीशैलम् जवळील अनंतसागर जलाशय (सन१३६९ मधील) किंवा हंपी (इ.स. १५२५) कृष्णदेवराय सागर वरून कल्पना येते. त्या सुमारास महंमद घोरीने भारतावर आक्रमण करून दिल्ली परिसरात स्वत:ची राजवट स्थापित केली, घोरीच्या मृत्युनंतर त्याने घेतलेल्या दत्तक ऐबकने गुलाम वंशाची स्थापना करून त्याची सुलतानशाही १२०६ ते १५२६ अशा ३२० वर्षांच्या कालखंडात सत्तेवर राहिली. त्यानंतर बाबराने भारतात मोघल सत्तेचा पाया घातला. त्याचे नंतर हूमायून, शेरशहा, अकबर ह्यांनी अनेक कलाकुसर व सौंदर्ययुक्त स्थापत्य कामे फत्तेपूर शिक्री, आग्रा, दिल्ली येथे केली, मुख्यत: त्याच्या नंतरच्या आलेल्या जहांगीराने फार कामे केली नाहीत, पण नंतरच्या शहाजहाने व औरंगजेबाने महंमदशहा, मलिक अंबर, यांचे सहाय्याने जलसंधारण कामे केली हा मध्ययुगीन कालखंड. तत्कालीन मध्ययुगीन काळात जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या संकलनावर आधारित भारतातील विविध प्रदेशात तेथील भूगर्भ, भूजल ह्यांचा विचार करून पारंपारिक प्रणाली विविध प्रदेशात विकसित केल्या गेल्या होत्या. त्यातील कित्येक नंतरच्या काळात दुर्लक्षित झाल्यामुळे नादुरूस्त होऊन अस्तंगत झाल्यात. वास्तविक त्या वेळच्या तांत्रिक ठोकताळे, अनुभव, कारागिरी व हत्यारे ह्यांचा उपयोग करून राबविण्यात आलेल्या योजना, वाढत्या लोकसंख्येला अपुऱ्या पडत असल्या तरी त्यांनी वापर केलेल्या तंत्रज्ञानामागील जलविज्ञान समजावून घेऊन त्यातून आजच्या काळात उपयोगी पडेल असे तंत्रज्ञान विकसित करून अंमलात आणणे आवश्यक आहे. युनेस्कोने अशा प्रकारच्या वाळवंटी, जलअभाव क्षेत्रासाठी International Centre on Qanats and Historic Hydraulic Structures (ICQHHS) स्थापन केले आहे. भारतात अशा योजना बुऱ्हाणपूर, देवगिरी, बिदर, इंदौर येथे राबविल्या आहेत. आशीरगढच्या आसा अहिर-ए-हिंदू राजाचा विश्वासघात करून, नासिर खानने बुऱ्हाणपूर शहराची पायाभरणी केली (१४०० इ.स.), दौलताबादच्या बुरहानुद्दीन गरीब शाहच्या नावाच्या – चिश्ती अवलियाच्या आज्ञेचे प्रसिद्ध सूफी संत आणि बुरहानुद्दीन गरीबनाह यांचे शिष्य – जैनुद्दीन यांच्यावरील श्रद्धेने तापीचे काठावर जैनाबादची स्थापना केली. फारुकीसने दोन शतके राज्य केले, ज्यादरम्यान शहराने केवळ राजकीय केंद्रच नव्हे तर धर्माचे प्रगत केंद्र आणि महान प्रतिष्ठित सांस्कृतिक केंद्र म्हणून नांव कमावले. १७ व्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकात, अकबर द ग्रेट मुघल, याने अहमदनगरपासून दक्षिणेकडील बुऱ्हाणपूर ते सध्या काबूल आणि कंदाहारपर्यंतचा प्रदेश आपल्या अधिपत्याखाली आणला. त्याचा मुलगा आणि उत्तराधिकारी जहांगीर यांनी मात्र चांगले प्रशासकीय कौशल्य वापरून स्थिती कायम ठेवली.

**बुऱ्हाणपूर योजनेतील उपांगे –**

अब्दुर-रेहमान-खान-ए-खानन याने स्वखर्चाने भूमिगत पाणीपुरवठा प्रणाली विकसित करण्याची कल्पना मांडली, त्यासाठी १६१५ मध्ये प्रसिद्ध पर्शियावी भूवैज्ञानिक तबकुतल अर्ज यांना बुऱ्हाणपूर येथे आमंत्रित केले. पर्शियामध्ये, हे वैशिष्ट्य खूप सामान्य होते. हा एक हलक्या उताराचा भूगर्भीय कालवा आहे, ज्यातून जास्त उंचीवर पाणी धारण केलेल्या स्तरातील पाणी पाझरून खालच्या स्तरावरील लागवडीच्या जमिनीपर्यंत खाली आणले जाते. कुंडी भंडारा, मूल भंडारा, चिंताहरण भंडारा या नावाने ३ ठिकाणी पाणी गोळा केले जाते, तेथून ते पोर्सिलेन आणि दगडात छिन्नीने भोक पाडलेल्या पाईप्सद्वारे बुऱ्हाणपूर शहरातील गोल कारंजा येथे आणले जाते. या चारशे वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत या ८ वाहिन्यांपैकी २ पूर्णपणे खराब झाल्या आहेत, उर्वरित ६ वाहिन्या भूमिगत गॅलरींना बोगद्याद्वारे जोडल्या गेल्या आहेत आणि जवळच्या टेकड्यांमधून झिरपणारे पाणी बाजूच्या भिंतीतील छिद्रातून त्यांच्यापर्यंत पोहोचते. यापैकी ३ वाहिन्या बुऱ्हाणपूर शहराला, ४ थी व ५ वी बुऱ्हाणपूर व रावरतनच्या राजवाड्यांना पाणी पुरवठा करतात आणि शेवटची ६ वी वाहिनी जमिनीत नाहीशी झाली आहे. वाहत्या पाण्याला उच्छ्वास देण्यासाठी २० मीटरच्या कमी अंतरावर खुल्या विहिरी बांधल्या गेल्या होत्या, त्या कुंडी म्हणून ओळखल्या जातात. त्यांची तोंडे शेजारील जमिनीपासून एक मीटर उंचीपर्यंत बांधली आहेत. या कुंडीतून वरून आंत पाहिल्यास खाली वाहणारे पाणी दिसते. या कुंडी बहुतेक वेळा गोल आकाराच्या असतात, ज्याची त्रिज्या १.२ ते १.८ मीटर किंवा काही वेळा चौरसही असते. कुंडीचे डोके किंवा उंची पाण्याच्या स्त्रोताच्या किंवा उत्पत्तीचे डोके किंवा उंची सारखीच आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. गुरुत्वाकर्षणाच्या नियमानुसार पाणी वाहून नेणारे बोगदे सुमारे ८० सें.मी. रुंद आणि इतके उंच आहेत की सरासरी माणूस त्यावर सहज चालू शकतो.

**कुंडी बंधारा**

ते जमिनीपासून ३० मीटर खाली असून एक मीटर रुंदीची भिंत चुना आणि मातीत दगडांनी बांधली होती. खडकांमधून तसेच एक मीटर रुंद भिंतीमध्ये हेतुपुर:सर प्रदान केलेल्या छिद्रांमधून पाणी झिरपत जाते.




**भूमिगत पाणी पुरवठा प्रणालीचा नकाशा, बुऱ्हाणपूर**

**मूल बंधारा –** बुऱ्हाणपूरपासून मूल भंडारा १० किमी दूर अंतरावर आहे. लालबागच्या दिशेला नाल्याच्या काठावर दगडांतून छिन्नीने खोदून बनवलेला १५ मीटर खोल जलाशय आहे. त्याच्या १० मीटर उंचीच्या चार भिंती विटा आणि दगडांनी बनवलेल्या आहेत. मूल भंडाराचे पाणी शेवटी चिंताहरण भंडाराच्या पाण्यात मिसळते.

**चिंताहरण बंधारा –** हे मूल भंडारापासून दक्षिणेकडे २ फर्लांग अंतरावर नाल्याच्या दुसऱ्या काठावर आहे आणि ९० मीटर खोल दगडांनी बनवलेले आहे. चिंताहरण आणि मूल भंडारा एका फर्लांगच्या अंतरावर भेटतात आणि नंतर मूल भंडाराच्या बाजूने कुंड्यांमधून लालबाग परिसरात जातात आणि लालबागच्या गोल भंडारामध्ये पाणी जमा करतात.

**गोल कारंजा –** गोल कारंजा शहरापासून ५ किमी अंतरावर लालबागच्या दिशेने आहे आणि जमिनीच्या वर १० मीटर आहे. गोल भंडारा येथे ३.६ मीटरपर्यंत दगडी भिंती आणि त्याहून अधिक बारीक चपट्या विटांच्या भिंती आहेत. जमिनीच्या वरची रचना जाड विटांची आहे. येथे तिन्ही भंडार (कुंडी, मूल आणि चिंताहरण) चे पाणी गोळा केले जाते.

**तिसरी योजना (सक्कर तलाव फिल्टर प्लांट) –** १६७०-८० मध्ये शक्कर तलावापासून बहादूरपूरपर्यंत दोन मोठ्या विहिरींसह ३०० मीटर पूर्वेला शक्कर तलावाचे काठावर २० मीटर अंतरावर करंजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दोन विहिरी बांधण्यात आली होती, परंतु त्यांना घाण पाणी मिळते, म्हणून १ १/२ मीटर उंच आणि १/२ मीटर खोल दगड-चुना पायाभूत सुविधा टाकून २ लहान कालवे कारंजापासून १० मी लांब बांधले गेले व तेथून ५ ठिकाणी विभागलेला होता.

**चौथी योजना (आहुखान्यासाठी) –** चौथी पाण्याची व्यवस्था आहुखान्यात होती. म्हणजे जैनाबाद येथे आहे, बुऱ्हाणपूरच्या पलीकडे तापी नदीच्या दक्षिण किनाऱ्याकडे जैनाबाद वसले आहे.

**पाचवी योजना (कालडोह धबधबा) –** १६५०–१६७० मध्ये मुघलांनी बुऱ्हाणपूरच्या उत्तर–पश्चिम १५ किमी अंतरावर असलेल्या कालडोह धबधबा. सातपुड्याच्या पायथ्यापासून उगम पावून थाथर गावाकडे मोठ्या खडकांकडे जाऊन खाली पडते व तलावात साठते. दोन्ही बाजूंना ५०० मीटर लांबीच्या १६ फूट उंच दगडी भिंती बांधून धरणाची भिंत बांधून पाणी साठविले. धरणाच्या मध्यापासून थोड्या अंतरावर एक लहान धरण बांधण्यात आले आणि १ ते १.५ फूट मातीच्या पाईपच्या जाळ्याद्वारे, एका पाईपमधून दुसऱ्या पाईपमध्ये पाणी पुढे जाण्यासाठी लहान घुमटांमध्ये पाणी जमा केले गेले जाते व नंतर ३० ते ४० मीटर अंतरावर २० ते ३० खुले घुमट बांधण्यात आले असून असे नदीचा प्रवाह उलटविण्याचे एकमेव उदाहरण आहे !

**जलप्रवाहाचे विश्लेषण –**

आजपर्यंत कोठेही पाणी जास्त झाले म्हणून तुंबून बाहेर आले अथवा कोठे कमी पडून रूकले असे घडले नाही, अशा प्रकारचा ढाळ खालीलप्रमाणे दिला आहे त्यावरून त्यावेळचे प्रवाहाच्या गतीचे शास्त्र किती विकसित होते ते लक्षात येईल.

अ) मूल भंडारा ते गोल भंडारा – ३०० फूटामध्ये १ फूट उतार

ब) कुंडी भंडारा ते गोल भंडारा – ७०० फूटामध्ये १ फूट उतार

क) जाळी करंज ते गोल भंडारा – २४५ फूटामध्ये १ फूट उतार

ड) कुंडी भंडारा ते जाळी करंज – ३२४ फूटामध्ये १ फूट उतार

**योजनांची वैशिष्ट्ये –**

**१) वापरण्यात आलेली जलसंधारण पद्धती :–** बारमाही प्रवाही तापी नदीच्या काठी ४०० वर्षांपूर्वी उपलब्ध असलेले जंगल, वृक्ष वनराई ह्यांनी पर्जन्याचे केलेले संरक्षण, ह्यावरून भरपूर पुरेसे पाणी निश्चितच उपलब्ध होते, पण जवळचा हा खात्रीचा उद्‌भव वगळून आंतरिक भांडणे, भाऊबंदकी वा राज्ययंत्रणा गिळंकृत करणेबाबत इस्लामिक राजे मशहूर असल्याने अधिक विश्वासार्ह खात्रीचा स्त्रोत म्हणून जलसंधारणातून मिळणारे पाणी अडवून ही योजना आखली.

**२) जलशुद्धीकरण केंद्र :–** सक्कर तलावाचे बाजूस पाणी पाझरण्यासाठी विशेष विहिरी व त्याखाली चुनखडी, कोळसा ह्यांचे थरावरून झिरपलेले पाणी फिरवून शुद्ध करण्याची पद्धत अवलंबलेली आढळते. ते शुद्ध पाणी नंतर भूमिगत तलावात साठवले जाऊन नंतर जमिनीखाली दगडातून खोदलेल्या कालव्याद्वारे शहराकडे वाहून नेणेत येत आहे.

**३) बोगद्यातील प्रवाहाबाबत वैज्ञानिक प्रणाली :–** त्या बोगद्याचा व्यास, पुरूषभर ऊंची, जाण्यासाठी दोन्ही बाजूने पायवाट, प्रवाहाची दिशा, त्यासाठी दिलेला ढाळ, त्यामुळे होणारी वहनक्षमता, कोठेही अतिसाठा होऊन साकळू नये वा कोठेही प्रवाहाचा वेग कमी होऊन निवळून गाळाने भरू नये अशा पद्धतीचे तंत्रज्ञान वापरात आणले आहे. तसेच शेजारील भिंतीमधून बाजूचे पाणी पाझरून छिद्राद्वारे बोगद्यातच जमा होते तो पाझरही विचारात घेतला आहे. ४०० वर्षांपूर्वी केवळ पाणसळ, ओळंबा, छिन्नी, हातोडा, दोरी इ. उपकरणांच्या सहाय्याने हे घडवून आणले आहे हे वैशिष्ट ! प्रवाहाची पहाणी करणे, बंदिस्त पाण्यात प्रवाहाने निर्माण झालेले वायुवीजन, खालील नळीची तपासणी, भिंतीची देखरेख ह्यासाठी उतरण्यासाठी म्हणून सोय ह्यादृष्टीने ५०–१०० फूटावर 'कुंडी' (Manholes) १–१॥ मीटरहून अधिक व्यासाच्या गोलाकार किंवा चौकोनी बांधल्या आहेत.

**४) कारंजी :–** गावात पाणी पुरवठा करण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी गरजेप्रमाणे हौद बांधले असून त्यात त्यांना पन्हाळे ठेवले असल्याने त्यातून नागरिक, घरगुती वापरासाठी पाणी घेऊन जातात.

**सद्यस्थिती व प्रणालीचे संवर्धन –**

शहाजहाँचे काळांत आठ योजना राबविण्यात आल्या, परंतु कालौघात कांही ठिकाणी दुर्लक्ष झाल्याने, जवळपासच्या रहिवाशांनी कुंड्यात घाण, कचरा टाकल्याने त्या बुजल्या. तसेच त्यातील जलप्रवाहालाही अडथळा आला. मध्यंतरीच्या काळात रस्ते दुरूस्ती, त्यातील पर्यायी बदल ह्यामुळे कांही भूमिगत कालवे मोडकळीस आले. रेल्वेच्या विस्तारामुळे त्यात तोडफोड केली. ती पुन्हा दुरूस्त केली गेली नाही. सध्या योजनेत रस्त्यावरील अतिभाराच्या वाहतुकीमुळे कालव्याचे काम कोसळले आहे. सततच्या गळतीमुळे, विटांच्या आतील पृष्ठभागावर आणि बाहेरील काठावर मोठ्या प्रमाणात क्षार जमा झाले आहे. तसेच वरील जमिनीवर मोठ्या प्रमाणात शेती झाल्याने येणारा पाझर कमी झाला आहे. भूगर्भातील वाहिन्यांच्या भिंतीमधील छिद्रे काही ठिकाणी अति क्षारामुळे

बुजली असल्याने त्यातून पाझरणारे पाणी कमी कमी झाले असून त्यामुळे बोगद्यात आवक कमी झाली आहे. काही कुंड्यामध्ये जवळपासच्या नागरिकांनी घाण डंपिंगचे स्त्रोत म्हणून वापर केला आहे.

पाणलोट क्षेत्रात भूजल क्षमतेचा विकास करणेसाठी, समतल पाझर खंदक, बंधारे बांधणे. पाझर आवक वाढवणे आणि भंडाराच्या आसपासच्या क्षेत्राच्या पुनर्भरणाला चालना देणे. कालव्यातील गुरुत्वाकर्षणाद्वारे चालू असलेल्या प्रवाहाची नियमितपणे स्वच्छता आणि निरीक्षण करणे. गाळण्याची प्रक्रिया किंवा पध्दती, करंजा, कुंड्या इत्यादी साफ करणे. रेकॉर्ड ड्रॉइंग, डिझाईन्स, माहिती फलक, छायाचित्रे, फोल्डर इत्यादी तयार करणे आवश्यक आहे.

**भविष्याचा वेध –**

आर्य लोक गंगेच्या खोऱ्यात प्रथम स्थायिक झाले तेव्हापासूनच पाण्याच्या साठवणीच्या आदर्श पद्धतींनी माध्यमे तयार केली गेली आहेत. ज्यांनी वांशिक गटांना राजकीय अर्थव्यवस्थेत बांधले आहे, त्यांनी समुदायाच्या संसाधनांचा वापर अनुकूल करण्यासाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, कायदेशीर आणि पर्यावरणीय भागीदारी एकत्रित करण्यासाठी सेवा दिली आहे. त्यासाठी सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय साधणे. बोगद्याच्या संरेखनाचे GIS मॅपिंग करणे आणि विद्यमान संरचनांचा आराखडा, विभाग इत्यादी काढणे. रचनानिहाय सद्य:स्थिती अहवाल तयार करणे, नुकसानीची गणना करणे, उपायांचे प्रमाण आणि खर्चाच्या अंदाजांसह पुन:निर्माणाचा मास्टर प्लॅन करणे, प्रगती आणि खर्च नियंत्रणाचे निरीक्षण करणे या सांस्कृतिक वारशाच्या जीर्णोद्धारासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धीसाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि स्थानिक माध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्धी दिली जावी. शहराला राष्ट्रीय वारसा योजनेत आणण्यासाठी या योजनेवरील साहित्य, माहितीपत्र तसेच बुऱ्हाणपूर आणि आसपासच्या इतर ऐतिहासिक वास्तूची माहिती प्रकाशित करणे, योजनेच्या महत्वाच्या ठिकाणी त्याचे नकाशे लावणे.

'एकात्मिक जलस्त्रोत विकास आणि व्यवस्थापन' हा योजना सुरू झाल्यापासूनचा एक पैलू आहे, परंतु सांस्कृतिक वारशाचा जीर्णोद्धार हा सर्वांत महत्त्वाचा आहे. पाण्याची गुणवत्ता, आपत्तीची तयारी, प्रभाव मूल्यांकन, पर्यटन, कृषी इत्यादी बाबींची माहिती समजून घ्यायची आहे. हे समुदाय-आधारित गट, क्षेत्रीय कर्मचारी आणि तज्ज्ञांच्या टीमद्वारे केले जातील. या संघांचे निष्कर्ष उप-योजना किंवा कृती योजनांमध्ये रूपांतरित केले जावेत म्हणून भारतातील ''विज्ञान आणि हेरिटेज रिसर्च इनिशिएटिव्ह (SHRI)''; कार्यक्रमांतर्गत सुमारे ८-१० कोटींचा प्रस्ताव सादर केला आहे त्या अंतर्गत निधी प्राप्त झाल्यास चालना मिळू शकेल, पण मुख्यत: हे कार्य बुऱ्हाणपूर मधील नागरिकांनी त्यांचे पूर्वसंचित प्रकाशात आणणेसाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे.

**संस्मरण –**

ह्या लेखासाठी व त्यावरील पुस्तकासाठी डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, माजी, निवृत्त प्रमुख, इतिहास व पुरातत्व विभाग डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - औरंगाबाद ह्यांचे मार्गदर्शन, डॉ.अरुणचंद्र पाठक - माजी. गॅझेटियर महाराष्ट्र, श्रीमती यामिनी मुबायी - संशोधक, नवी दिल्ली, स्नेहा बक्षी - वास्तुविशारद, औरंगाबाद, राजेश पुल्लरवार - आंतरराष्ट्रीय किर्तीचे आर्टिस्ट, मुंबई ह्यांचे योगदानाबद्दल आणि मुख्यत: कै. नंदकुमार देवडा, बुऱ्हाणपूर - एक अग्रणी व्यक्तिमत्व - ज्यांनी त्यांच्या आयुष्यात असे पुस्तक प्रकाशित पाहण्यासाठी अविरत मेहनत घेतली - व ते घडून आले ह्यासाठी सर्वांना विनम्र अभिवादन.

❑❑

## धाव घेई देवा आता .....

साऱ्या जगाची गती आहे थांबली,
कशी नशीबानं थट्टा आज मांडली! (धृ)
विश्वचक्र फिरतही होतं, आपुल्या गतीत,
आनंदे करीतही होतं, काळ हा व्यतीत,
याला एका विषाणूची, दृष्ट आज लागली! (धृ)
राव-रंक धावत होते, व्यस्त जीवनात,
जो तो आपुल्या परीने, होता कार्यरत,
चालत्या गाडीला, खीळ कशी लागली(धृ)
विघ्नहरण करण्या देवा, धाव तरी आता,
तुझ्या विना कोण आहे आम्हा जगी त्राता,
काय पापे केली म्हणूनी, नियती अशी वागली (धृ)

**सुधाकर सुदामे**
9850719602, ग्रुप नं. २४

# पुन:श्च हरि ॐ

– श्रीकांत मेहेंदळे

9960895492, ग्रुप नं. २४

आमचा नृपो ग्रुप २४ गेली कित्येक वर्षे नियमितपणे मासिक सभा घेणारा, प्रतिवर्षी पर्जन्य काळात चिंब भिजायला आणि थंडीच्या मोसमात हुरड्याचा आस्वाद घ्यायला अशा किमान दोन सहलींचा आनंद लुटणारा, नृपोची वार्षिक वर्गणी वेळेवर भरणारा, परस्परांशी सातत्याने संपर्क साधणारा असा उत्साही, आनंदी व सकारात्मक वृत्तीच्या हौशी सदस्यांचा सळसळता, हसता खेळता आणि जीवनाचा आनंद मनापासून उपभोगणारा, किमान ६८ व कमाल ९० वयोमान असलेल्या ज्येष्ठांचा सुसंघटीत ग्रुप. पण वर्ष २०२० च्या आगमनाबरोबरच 'कोरोना' नामक वैश्विक महामारीच्या भयानक आपत्तीने अखिल मानवतेला 'न भूतो न भविष्यती' अशा भयग्रस्त वातावरणाच्या खाईत निर्दयपणे लोटून दिले. शेवटची मासिक सभा जानेवारी २०२० मध्ये झाली आणि दर्जेदार इंधनासह सुयोग्य वंगण घालून सुनियंत्रित वेगाने धावणारे एखादे वाहन जसे अचानक बंद पडावे तसे झाले.

मी कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरीचे निमित्ताने सुमारे चाळीस वर्षे वावरल्याने आजवर 'लॉक आऊट' म्हणजे कारखान्यांची 'टाळेबंदी' करतात हे माहित होते. पण आता 'लॉकडाऊन' या शब्दाची रोजच्या ऐकण्या वाचनात भर पडू लागली. साबणाने वारंवार हात धुणे, तोंडावर 'मास्क' लावणे, 'सोशल डिस्टन्सिंग', रस्त्यात कुणी मित्र भेटले तर हस्तांदोलन न करता फक्त लांबूनच (पण कोपरापासून नव्हे बरं का) नमस्कार करणे असे निर्बंधात्मक सोपस्कार नव्या जोमाने जीवन शैलीत प्रवेशकर्ते झाले. बँकेत प्रवेश करताना प्रथम हात पसरून दोनही तळव्यांवर सॅनिटायझरचा प्रसाद घेणे आणि भालप्रदेशावर पिस्तुल रोखून स्वागत व्हायला लागले. आत गेल्यावर बसण्यासाठी म्हणून ठेवलेल्या खुर्च्यांनी आपल्याकडे पाठ फिरवून काउंटर आणि ग्राहक यांच्यात दुरावा निर्मितीचा कट केलेला दिसून यायचा. सभा, जलतरण तलाव, लग्न समारंभ, मंदिरे, उद्याने आणि स्मशानभूमीतही उपस्थितीच्या आकड्यांवर काटेकोर निर्बंध आले. शाळा, कॉलेज, नाटक-चित्रपटगृहे बंद. अशा भयावह वातावरणात कुणी कुणाला भेटणे नाही. मासिक सभा तर दूरच. फोनवर संपर्क साधावा इतकेच शक्य व्हायचे. अशा विचित्र वातावरणात आठवडे, महिने आणि दोन वर्षांचा बंदिस्त काळ पुढे सरकला आणि there is always light at the end of the tunnel' या उक्तीनुसार 'कोरोना'चा विळखा थोडसा सैल होत असल्याचे चित्र दिसू लागले. एके दिवशी समजले की ग्रुपच्या मासिक सभा पूर्ववत सुरू होण्यास उत्तेजन म्हणून ३१ मार्चचे अगोदर सभा घेतल्यास ग्रुपसाठी 'नृपो'ने अनुदान योजना जाहीर केली आहे. या कल्पकतापूर्ण योजनेचा व सुधारलेल्या परिस्थितीचा आधार घेत गेल्या २८ मार्चला २६ महिन्यांनंतर 'पुन:श्च हरि ॐ' म्हणत पहिली सभा आयोजण्याचे ठरले आणि ग्रुपच्या २९ सदस्यांपैकी २२ सदस्यांनी म्हणजे तब्बल ८० टक्के सदस्यांनी 'सुहास्य वदने' सभेसाठी उपस्थित राहून भरभक्कम प्रतिसाद दिला. आता बहुसंख्य सदस्यांचा एकमेकांना भेटून दोन वर्षाहून अधिक काळ लोटलेला असल्यामुळे गेले दोन पावसाळे पाहून कुणात काय बदल झालेत, कुणाचे वजन वाढून पोट अधिक सुटले किंवा कोण काळजीने अधिक कृश झाले... विशेषत: आमच्यापैकी एक उत्तम रेखाचित्रकार सदस्य आहेत त्यांच्या 'सातबारा' साठी तर हे 'फेरफार' खूपच महत्वाचे होते. कारण ते प्रत्येक सदस्याच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा संदेश पाठवताना त्या सदस्यांचे रेखाचित्रही भेट म्हणून पाठवत असतात. सभेसाठी एकत्र जमल्यावर पहिली पंधरा वीस मिनिटे मनसोक्त हा हा हु हू' करण्यासाठी जाणे केवळ अपरिहार्यच. 'आम्ही कसे, तुम्ही कसे' याची देवाण घेवाण करण्यात आणखी थोडा वेळ. मग सभेच्या औपचारिक कामकाजाला प्रारंभ. मागच्या सभेनंतर गेल्या सव्वीस महिन्यात वैकुंठवासी झालेल्या सदस्यांना आदरांजली अर्पण केली. त्यानंतर विविध गुण दर्शन. म्हणजे वेगवेगळ्या सदस्यांचे सादरीकरण. अमेरिकेहून नुकत्याच परतलेल्या सदस्याने भारतातून प्रस्थान करताना 'कोरोना'च्या संदर्भात आलेले काही क्लेषकारक व तणावदायक अनुभव आपल्या खुमासदार शैलीत कथन केले जेणेकरून येत्या मे महिन्यात अमेरिकेला जाण्याचा बेत आखलेल्या सदस्यांना त्याचा उपयोग व्हावा. नंतर एका रसिक आणि उत्तम पाठांतर असलेल्या सदस्याने एका जेष्ठ नागरिकांची मजेशीरपण वास्तवपूर्ण कैफियत

कथन करणारी गजल आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि मनोरंजक शैलीत सादर केली. आता पाळी होती एखाद्या गोड गाण्याची. ती फर्माईशही पूर्ण झाली. 'कशी रे तुला भेटू मला वाटे लाज, लौकिक तुझा मोठा आणि घरंदाज' हे मंदाकिनी पांडे यांनी अनेक वर्षापूर्वी रसिकांच्या स्मृतीपटलावर कोरलेले भावगीत आपल्या भावमधुर आवाजात एका स्त्री सदस्याने सादर केले. उपस्थित बंधू, भगिनी या सर्व सादरीकरणांचा आस्वाद घेत असताना घड्याळाचे काटे मात्र आपले काम चोखपणे करतच होते. इतक्यात अल्पोपहाराच्या साहित्याचे आगमन सभास्थानी झाल्याची सुखद वार्ता कानावर आली आणि शाळा सुटल्याची घंटा वाजल्यावर वर्गातल्या मुलांचे चेहरे एकदम आनंदाने उजळून यावेत त्या दिवसांची मजेशीर आठवण झाली.

मग काही सदस्य खाद्यपदार्थ बाजूच्या टेबलावर मांडून ठेवण्याच्या कामाला लागले. पेपर डिशेस भरून एकेकापुढे सरकू लागल्या. रूचकर आणि स्वादिष्ट पदार्थांचा मनमुराद आस्वाद घेण्यात मंडळी हरखून गेली. प्रत्येकाने आपापल्या पोटोबाची प्रसन्न चित्ताने पूजा करतानाचे दृष्य खरोखरीच विलोभनीय असेच होते. आता सभा Self contributory तत्त्वावर आयोजिली असल्याने प्रत्येक सदस्य सभेच्या खर्चातला आपापला हिस्सा चुकता करण्यात गुंतला. सर्वांचे आभार मानून सभा संपन्न झाल्याचे सूप वाजले. दीर्घ कालावधीनंतर 'पुन:श्च हरि ॐ' म्हणत आणि एक संध्याकाळ फिरून एकवार ग्रूप सदस्यांच्या आपुलकीपूर्ण संगतीत व्यतीत केल्याचा आनंद मनोमन जपत सर्व उपस्थित आपापल्या सुखसदनी परतले.

❑❑

award winning

## Colour

**Red** is angry, bloody, and vile
It is the colour of lips on an evil smile But it is first in the rainbow,
leadership, and pride It stands with strawberries and cherries that
you'll find at a picturesque picnic by the riverside

**Orange** is rude, frivolous, and dumb Orange could well be unwanted to some,
But it forms a sunset, freeing and fair, It is the colour of flames, with burning in the air.

1536, Catherine of Aragon's funeral morning, Anne Boleyn showed up in yellow for mourning,
But yellow is more than a Tudor woman's sadness, It's daffodils, springtime, the light in the madness

**Green** can make you feel sick, envious, greedy, It is the colour disgust, and gardens so weedy,
But greenery can be beautiful, not annoying like those weeds,
It can be algae, pears, or majestic, divine leaves

**Blue** is depression, sadness and cold
The aloofness, loneliness in one's soul,
But blue is mature, like a waterfall,
Or elegant and tall like an icicle

**Purple** is a common theme with animated villains, It is the colour of power, wealth,
and want for every shilling, But in the beautiful rows of lavender, purple is all you will see,
Just like how it is in a night-time galaxy

But a flower can be any colour, and it will be just fine No matter, the petals, the size, or the design
When a colour is brought into nature, you'll find That, it is truly a colour's time to shine

**Anoushka Dev,** UK, age 10 yrs. Grand daughter of B.B./Vaidhee

# डॉ. आशुतोष कोतवाल: एक अलौकिक भौतिकशास्त्रज्ञ

– अलका गर्दे
9689132206, ग्रुप नं. १४

डॉ. आशुतोष !

पहिल्याच दृष्टिक्षेपात जाणवतं ते त्यांच राजस व्यक्तिमत्व ! गोरापान वर्ण, देखणा चेहरा, सौम्य मृदु स्वभाव, वागण्यात-बोलण्यात अत्यंत नम्र अन् सुसंस्कृतता असा हा Good Boy. त्याचे काळेभोर डोळे दर्शवितात, त्याची तैल बुद्धिमत्ता, अज्ञानाचे वेध लागलेले त्यातले भाव, आपले उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी ध्यास घेऊन काम करण्याची वृत्ती ! असा हा आशुतोष आज जगद्विख्यात शास्त्रज्ञ म्हणून अढळ पदावर जाऊन बसलाय ! त्याच्या कर्तृत्वाची झेप आपल्या नजरेपलीकडची आहे.



सौ. माणिकताई व श्री. विजयराव कोतवाल यांचा हा सुपुत्र ! आशुतोषचा जन्म २० डिसेंबर १९६५ ला झाला. अन् 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' ही म्हण जणू सिद्ध झाली. आई-वडिल दोघंही तोडीस तोड कर्तबगार, सुसंस्कृत अन् गुणी व्यक्तिमत्व ! अत्यंत कसोशीनं, सुजाण वृत्तीनं आशुतोषचं संगोपन या दोघांनी केलं. उत्तम संस्कार दिलेत.

आशुतोषचं शालेय शिक्षण 'दिल्ली पब्लिक स्कूल' आणि 'कॅथेड्रल ॲण्ड जॉन कॉनन अँग्लो-स्कॉटिश स्कूल' या सारख्या श्रेष्ठ दर्जाच्या शाळांमध्ये झालं. त्याने तिथे तर नाव कमावलंय, शिवाय उच्च शिक्षण सर्वस्वी स्वत:च्या गुणवत्तेवर चांगल्या संस्थांमध्ये प्रवेश मिळवून केलं. मुंबई आय.आय.टी., एडिन्बर्ग विद्यापीठ, युनिर्व्हसिटी ऑफ पेनसिल्वेनिया, हार्वर्ड हे जगमान्य विद्यापीठ आणि व्हॉर्टन (Wharton) बिझिनेस स्कूल, हेही जागतिक दृष्ट्या सर्वश्रेष्ठ आहे. या सर्व नामवंत संस्थांमध्ये आशुतोषचं उच्च शिक्षण झाले. शिवाय तो सध्या जिथं स्वत: शिकवतोय, ते ड्यूक विद्यापीठही अमेरिकेतील एक सर्वोच्च श्रेणीचं विद्यापीठ आहे. अशा सर्वोत्तम संस्थामध्ये शिकलेल्या आशुतोषला पदार्थ विज्ञान / भौतिकशास्त्र या विषयात प्रचंड रस होता. वृत्तीनं संशोधक ! त्यामुळे वर्षानुवर्षे शास्त्रज्ञांनी केलेल्या 'विश्वनिर्मिती'च्या रहस्यांविषयीचं ज्ञानार्जन त्यानं परिश्रमानं अभ्यासलं.

'या विश्वाची निर्मिती कशी झाली असेल, केव्हा ?' हा अखिल मानवजातीला पडलेला मूलभूत प्रश्न आहे. अनेक वर्षांपासून अनेक शास्त्रज्ञांनी यावर संशोधनही केलंय. त्यांच्या मते १ हजार ३८० कोटी वर्षांपूर्वी विश्व अतितप्त, अतिघन पण बिंदूवत् अवस्थेत होतं. त्या बिंदूचा एका क्षणी महाविस्फोट झाला आणि त्यातून विश्वनिर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. ही प्रक्रिया अजूनही सुरू आहे. 'बिग बँग थिअरी' !

यासाठी चालू असलेल्या संशोधनातून प्रथम 'अणू'चे अस्तित्व सिद्ध झाले. 'अणू' हा एक अविभाज्य, अतिसूक्ष्म कण आहे. असेच समजले गेले. परंतु पुढे त्यात प्रोटॉन, इलेक्ट्रॉन आणि न्यूट्रॉन हे उपकणही असतात, असे एकेक विलक्षण शोध लागत गेले. याच शोधमालिकेमध्ये २४ फेब्रुवारी १९८३ रोजी एका आंतरराष्ट्रीय विज्ञान पत्रिकेत प्रकाशित झालेल्या शोध निबंधात w बोसॉन या अत्यंत 'अस्थिर' अशा मूलकणांचा शोध लागल्याचे नमूद करण्यात आले. तसेच 'हिंग्ज बोसॉन' या एका विलक्षण मूलकणाच्या (यालाच 'देव'कण म्हणतात) अस्तित्वाची ही शक्यता वर्तविण्यात आली.

विश्वनिर्मितीशी निगडित असलेल्या रहस्यांचा सखोल शोध घ्यायचा असेल तर प्रयोगशाळेत कृत्रिम पद्धतीने असाच एक 'मिनी बिग बँग' घडवून आणावा असं

काही संशोधकांना वाटू लागलं. हे सर्व खूपच आव्हानात्मक असल्यानं यात सुमारे १०० देशांचे हजारो संशोधक कार्यरत होते. २०१२ साली झालेल्या 'लार्ज ड्रॅान कोलायडर' चा उपयोग सर्वश्रुत आहेच ! या प्रयोगातच 'हिंग्ज बोसॉन' चे अस्तित्व निर्विवाद सिद्ध झाले.

हा प्रयोग यशस्वी होण्यात डॉ. आशुतोषच्या १९९५ पासून सुरू असलेल्या w बोसॉन वरील संशोधनाचा एक दिशादर्शक' या नात्यानं खूप उपयोग झाला. हा w बोसॉन ऋणभारीत किंवा घनभारीतही असू शकतो आणि तो इतर अनेक सूक्ष्म कणात विलीन होतो. त्याला स्वतंत्र अस्तित्व उरत नाही. इतर कणात विलीन होताना हा त्यांच्या गुणधर्मात बदल घडवतो. म्हणूनच विश्वनिर्मितीच्या प्रक्रियेत w बोसॉन चे महत्व अनन्य साधारण आहे.

याच कारणासाठी डॉ. आशुतोषचे w बोसॉनवर सखोल संशोधन सुरूच होते. २००२ पासून २०११ पर्यत शिकागोजवळच्या 'फर्मिलॅब' येथे Tevatron Accelerator प्रयोगात होणाऱ्या प्रोटॉन आणि अँटीप्रोटॉन या मूलकणांच्या टक्करीतून मिळालेल्या डाटा चा अभ्यास करता ४.२ दशलक्ष w बोसॉन कणांचे गणित मांडण्यात आले व त्यांचे वजन निश्चित करण्यात आजवरच्या सर्व अनुमानांमध्ये सर्वाधिक अचूक अनुमान काढण्यात तो यशस्वी झाला. अचुकतेचा निर्देशांक 99.999999999% किंवा Sigma 7 असा आहे.

डॉ. आशुतोषच्या या दैदीप्यमान यशाची दखल साहजिकच जगभरातल्या समस्त वैज्ञानिक विश्वाने घेतली आहे. त्याच्यावर उत्स्फूर्त कौतुकाचा वर्षाव होतोय. डॉ. आशुतोष याचं वैयिक्तक मत असं – 'प्रमाणित कण भौतिकशास्त्रामध्ये गेल्या ४ ते ५ दशकात अनेक संशोधने झालीत. परंतु या सर्व संशोधनातून Particle Physics जे स्टँडर्ड मॉडेल (SM Theory) म्हणून सिद्धांतामध्ये बसणारे होते. मी २७ वर्षे w बोसॉनवर संशोधन केले; त्यामुळे आत्तापर्यंतच्या SM सिद्धांताला छेद गेला आहे. पुढील संशोधन 'सर्न', 'फर्मिलॅब' यासारख्या संस्थांमध्ये होऊ शकते.

डॉ. आशुतोषच्या संशोधनामुळे विश्वाच्या उत्पत्तीचा गाभा कशात आहे, या विषयी नवीन विचारमंथन सुरू होऊ शकते. यामुळे पुढील संशोधनाला नवी दिशा मिळू शकते. केवढी ही अभूतपूर्व अन् अतुलनीय कामगिरी केलीय डॉ. आशुतोष याने ! त्याच्या संपूर्ण करियर मधला हा 'माइलस्टोन' ठरावा इतकं भरीव, महत्त्वपूर्ण काम आहे. हे ! विशेष म्हणजे यासाठी भारतीय वंशाच्या एका अत्यंत निगर्वी अन् बुद्धिमान शास्त्रज्ञ व्यक्तिला अमेरिकेसारख्या बलशाली राष्ट्राच्या सर्व शास्त्रज्ञांनी एकमुखाने गौरविले आहे. या गोष्टीचं फार अप्रूप वाटतं. त्याने स्वत: अथक परिश्रमाने ध्यास घेऊन जे यश साध्य केलंय, त्यामुळे स्वत:बरोबरच इतरांनाही त्यानं खूप आनंदित केलंय ! अतिशय अभिमानास्पद अशी ही घटना आहे. त्याचे आई-वडिल, पत्नी, मुलगा आणि आमच्यासारखे सर्व सुहृद, आप्तजन, मित्रगण सर्वच धन्य झाले आहेत !

यापुढेही डॉ. आशुतोष याच्या हातून असेच महान कार्य घडत राहो, ही सदिच्छा - शुभकामना !

❑❑

## मीपण माझे....

गात्रे थकली शिणली काया
जीर्णशा नेत्रा वाट दिसेना
दु:ख तयाचे कशास करावे
ठेविले अनंते तैसेचि रहावे

शीण थकवा शरीरावस्था
तयातून ना कोणी सुटला
उत्साहाने मज कवटाळावे
मीपण माझे मज गवसावे

मनातील मरगळ निराशा
जाऊदे आता दूर गणेशा
चैतन्य सुप्त प्रकटू दे आता
आत्मानंदी राहू दे सदासर्वदा

**– विजय माजगावकर**

9421081138, ग्रुप नं. १३

# Non Resident Indians' Parents' Organisation

Registration No. F - 10763
ESTD : 1994

6 Phule Chambers,
Shivdarshan Chowk,
Parvati, Pune - 411 009.

**e-mail :** nripoho@yahoo.in • nripojagat@gmail.com (only for Nripojagat) • Website : www.nripopune.org


## Revised Rates for Various Types of Sponsorships

| DISPLAYING BANNERS | |
|---|---|
| Single Gathering (Banners to be provided by donor) | Rs. 3,000/- |
| **TABLE SPACE** | |
| Single Gathering | Rs. 6,000/- |
| Four Gatherings(discounted price) | Rs. 20,000/- |
| **SPONSORING FUNCTION** | |
| Sponsoring General Function | Rs. 30,000/- |
| Sponsoring Full Function | Rs. 60,000/- |
| Expected Audiance | 200 No |
| Duration of function | 3.0 Hours |
| Tentative schedule (NRIPO Business) | 0.5 Hour |
| Presentation | 1.5 Hours |
| Entertainment | 1.00 Hour |
| 'PAN' is necessary (your brochure will be circulated to all members | |

NRIPO DIRECTORY INSERTION

| | |
|---|---|
| Size of directory | 14x22cm |
| Size of Insertion | 11x19cm |
| Back Cover (Colored) | Rs. 25,000/- |
| Inner Cover Front and Rear (Colored) | Rs. 20,000/- each |
| Inner Page(Colored) | Rs. 10,000/- |
| Inner Page (Full) Black & white | Rs. 6,000/- |
| Inner Page (Half) Black & white | Rs. 4,000/- |
| Inner page(Full) Black&white (For Members ) | Rs. 5000 |

NRIPOJAGAT (Quarterly House Journal)

| | | |
|---|---|---|
| Back Cover (Coloured) | 21x28 cm. | Rs. 10000/- |
| Inner Cover (Coloured) | 21x28 cm. | Rs. 8000/- |
| Inner Page full (Coloured) | 21x28 cm. | Rs. 7000/- |
| Inner Page full (black & white) | 18x23 cm. | Rs. 4000/- |
| Inner Page half (black & white) | 11.5x18 cm. | Rs. 2500/- |
| Best Complement from Member half page Black & White | 11.5x18 cm. | Rs. 2000/- |

## आधुनिक तरुणीची कैफियत

– मनिषा बोरा
9421141945, ग्रुप नं. २५

नेहमीच काळ चैनीत जावा । कधीच कामधंदा न करावा ।
चांगला पॉश फ्लॅट, कार असावी । आरामात लोळत सुखाने झोप घ्यावी ।
हेच मागणे देवापाशी ।।

नको सासरचे नातेवाईक, खाष्ट सासू, दीर, जावा, नणंदा,
सासरा भोळा भाबडा सांब असावा, सत्ता मात्र माझीच हवी ।
हेच मागणे देवापाशी ।।

मला नित्य घ्यावीत जीन्स, टी शर्ट, केप्री व इतर मॉडर्न ब्रॅन्डचे कपडे,
तसेच सणावारासाठी एखादी भारी साडी, डायमंडचे नेकलेस, कुडी हवी ।
हेच मागणे देवापाशी ।।

पगाराची तारीख आल्यावर मला खूप खरेदी करायची असते,
त्याचा जमाखर्च सासूने, नवऱ्याने विचारू नये व मागू नये ।
हेच मागणे देवापाशी ।।

दररोज खाणे, पिणे, नाश्ता, स्वयंपाक कोण करणार, केलाच तर नवऱ्याने
खूप मदत करावी, नाहीतर रुचीपालट म्हणून चांगल्या हॉटेलात न्यावे ।
हेच मागणे देवापाशी ।।

कधी मी फिरायला गेले तर, बाळाला नवऱ्यानेच सांभाळावे,
मी फक्त मनीपर्स घेऊन, उंच टाचाच्या चपला घालून, डुलत पुढे चालावे
हेच मागणे देवापाशी ।।

कधी मी मित्र-मैत्रिणीच्या घोळक्यात, स्मार्ट फोनवर, फेसबुक वॉटस्ॲप,
यु ट्यूबमध्ये रमले व हॉटेलात गेले, तरी संशय घेऊ नये ।
हेच मागणे देवापाशी ।।

नवऱ्याने जास्त वाद, भांडण काढून दुखवू नये, रडवू नये,
खूप प्रेमाने मला समजून घ्यावे व माझ्या बाळाला सांभाळावे ।
हेच मागणे देवापाशी ।।

## *Blossom into Godhood*

**Vaidehee Kulkarni**
9370147497, Gr. No. 26

*Swami Ramtirtha was sitting in the jungles of Garhwal when he saw a young man about to pluck a flower. Swamiji restrained him from doing so. The young man protested saying, "But Swamiji it is an offering to the temple." "That's why I am stopping you", said Swamiji. " It would have been fine if the flowers were for your beloved." With regard to God, the flower has already blossomed for God. What is the need for you to pluck it and offer it to God again? By blossoming the flower has already reached Godhood. Offering flower is not the right way for you to reach Godhood. You too are needed to blossom by your good deeds to find you at Godhood. That is the essence of spiritual journey.*

वेळ ही एखाद्या वाहत्या नदी सारखी असते, एकदा स्पर्श केलेल्या पाण्याला तुम्ही पुन्हा स्पर्श करू शकत नाही; कारण नदीच्या प्रवाहाबरोबर गेलेलं पाणी कधीही परत येत नाही, असेच वेळेचेही आहे. एकदा गेलेली वेळ पुन्हा येत नाही. म्हणून आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा आनंद घ्या.

**जयश्री अलूर**
9767428283, ग्रुप १२

**HEARTFELT CONDOLENCES**

**MRS. SANJIVANI GOKHALE**
**MR. MADHAV GODBOLE**

# आमचे अण्णा आजोबा

– डॉ. कमला संखे
9950143711, ग्रुप नं. १२

माझ्या यजमानांचे हे आजोबा. त्यांच्या आईचे वडील. त्यांना सर्वजण अण्णा म्हणत. माझे यजमान बालपणापासूनच आपल्या आजोळीच लहानाचे मोठे झाल्यामुळे आजोबांच्या धाकट्या मुलाइतकाच त्यांना ह्या आजोबांचा सहवास मिळाला. आजोबांचे घर तेथे माझे घर इतके साहचर्य त्यांना त्या घराविषयी झाले होते. आमच्या लग्नानंतर अण्णा आमच्या घरी आले की माझ्या यजमानांना अपार आनंद होई.

लहानपणीच्या या कुटुंबाशी निगडीत असलेल्या आठवणी ते मला व मुलांना सांगण्यात इतके तल्लीन होऊन जात की हा आजोबा नातवाचा प्रितीसंगम बघून मला गहिवरल्यासारखे होऊन जाई.

आमच्याकडे राहण्याचा त्यांचा कालावधीही घाईचा नसायचा. त्यावेळी माझी मुले लहान (शाळकरी) सतत आईभोवती चिवचिव करणारी ही बाळे पाहून नकळत ते म्हणून जायचे 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' अण्णा आले की जणू माझ्या घराची रयाच बदलून जायचं. एरवी मी मोठ्याने बोलणारी, मुले चौकस बुद्धीनुसार एकमेकांशी व माझ्याशी जोरजोरात वाद घालणारी पण हे आजोबा आले की एक प्रसन्न, आदरयुक्त भावना व वातावरण सर्वत्र घरात पसरलेले असायचे. त्यांचे राहणे, बोलणे, हसणे, वागणे ह्यांचा असा एक परिणाम ह्या घरावर व्हायचा की जणू प्रसन्न मंदिराचा गाभारा ! एक अतूट प्रेमाचा बंध सर्वांमध्ये दृढ व्हायचा. त्यांच्या आतून शांत प्रसन्न असलेल्या व्यक्तिमत्वाचा जणू हा प्रभाव. उत्तम विचाराची स्पंदने आजूबाजूच्या वातावरणात पसरत. आपल्या चर्मचक्षूंना ही स्पंदने दिसत नसतात. आजोबांच्या सान्निध्यात आम्ही मात्र हा अनुभव पुरेपूर घेत होतो.

दुर्दैवाने माझ्या मुलांचे दोन्हीकडचे आजी-आजोबा लवकर वारल्यामुळे त्यांच्या पप्पांचे हे आजोबा आले की मुलं अक्षरश: अत्यानंदित होत. भूतकाळातल्या किंवा चालू काळातल्या काही विनोदी गोष्टी ते त्यांच्या ढंगात सांगायला लागले की मुले तहान भूक विसरून जायचे. आपल्यात हे आजोबा आहेत तरी कसे ? ह्या उत्सुकतेपोटी त्यांना मालिश करायच्या निमित्ताने ते त्यांच्या सर्व अंगाला स्पर्श करीत. डोक्याचा तुकतुकीत गोटा, गोरेपान, सुरकुतलेली त्वचा, निळेकाळे मिचमिचणारे डोळे हे सर्व काही हाताळताना माझ्या मुलांना परमानंद मिळत असे. त्यांचे तरुणपणातले कार्य सांगायचे तर दोन पानही कमी पडतील. त्यावेळच्या मदर इंडिया' मासिकांचे संपादक बाबूराव पटेलांचे हे सख्खे काका. तसेच त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईकांच्या ठाणे जिल्ह्यातल्या बऱ्याचशा बैठका व कार्य त्यांच्या घरीच चाले.

फावल्या वेळात माझ्याही त्यांच्याशी खूप गप्पा चालत. उतार वयातला त्यांचा रोजचा कार्यक्रम बघून मी चाट पडे. तरुणपणी अतिउत्साही, कार्यक्षम असलेली पण म्हातारपणी अगदी अगतिक, सैरभैर झालेली अनेक माणसे मी पाहिलीत. अण्णांना सकाळी ४।।-५ वाजता आपोआप जाग येत असे. पण घरातल्या इतर माणसांची झोपमोड होऊ नये म्हणून अंथरूणातच ते स्वत:ला येत असलेले गणेशस्तोत्र, विष्णू सहस्त्रनाम, श्रीसूक्त, अथर्वशीर्ष इत्यादी देवाची स्तवने म्हणत. घरातील कुणी उठले की मग मात्र स्वत:चा प्रात:र्विधी उरकून बाहेर येत. सूर्याच्या कोवळ्या किरणांकडे अनिमिष नेमाने बघून हात जोडून सवितासूक्त (सूर्यांची नावे) म्हणत ती सूर्योपासना बघून मला असं वाटायचे, पंचमहाभूतांशी नातं राखून जगणाऱ्या ऋषीमुनींचे जीवनच जणू साकार होतेय. ९०-९२ वर्षापर्यंत रोजच्या घरातील कामाला त्यांनी चष्मा वापरला नाही. त्यांच्या नेत्रांचे सामर्थ्य त्यांचे आराध्य दैवत सूर्यनारायण आपल्या कोवळ्या किरणातून देत असावे अशी माझी पक्की खात्री झाली होती. चहा घेऊन खूप तन्मयतेने ते सकाळचा पेपर वाचीत. टिळक, आगरकर, नेहरू व गांधींचे युग बघितलेला हा माणूस, त्यामुळे त्यांची वर्तमानपत्रावर अपार श्रद्धा. पुढे आजच्या पेपरचे (Sensational news) विकृत स्वरूप त्यांच्या लक्षात आले होते, पण त्याला इलाज नाही असे ते म्हणत.

दिवाळीच्या पाडव्याचा दिवस हा त्यांचा जन्म दिवस त्यांची जन्मशताब्दी करण्याचे सर्व कुटुंबियाने जेव्हा ठरविले तेव्हा मी खूप आनंदात होते. एखाद्या परिवारात हजारो वर्षानंतर (त्या काळात) येणारी सुंदर वेगळी घटना' असाच हा प्रसंग.

आपण आपल्या आवडत्या व्यक्तिचा वाढदिवस साजरा करणार म्हणून आमचे सर्व कुटूंब खूप उत्सुक होते. काय काय कार्यक्रम करायचे याची आखणी आम्ही मनात करत होतो; कारण आता ते बरेच थकले होते. तरीदेखील दिवसभरातले त्यांचे सर्व कार्यक्रम ते दोन काठ्यांच्या सहाय्याने करत होते. माझी मुलं सारखी म्हणत होती. आई घरी असते. त्यांच्या शताब्दीला तीनच महिने उरले. तुम्ही आजोबांना आपल्याकडे आणा पण पावसाळ्याचे दिवस. वाहनांची तेवढी सोय नव्हती. त्यांना ७-८ तासांचा प्रवासही झेपला नसता. ह्या दोलायमान परिस्थितीत असताना अचानक हृदयाचे ठोके वाढविणारी ती बातमी कानावर पडली.

आजोबा बाथरूमला जाताना, उठत असतानाच पडले. डोक्याला जबरदस्त खोच पडून रक्तही बरेच गेले. माझी तर क्षणभर पायाखालची भूमीच सरकली. त्यांच्या डॉक्टर नातवाने घरीच उपचार केले. बरीच लोक मामांकडे (त्यांच्या मुलांकडे) भेटायला येऊ लागली. माणसांशी हितगूज हेच जणू औषध असलेल्या ह्या माणसाला त्यामुळे खूप बरे वाटू लागले. पण शरीर झिजलेले असल्यामुळे १०-१२ दिवस न जातात तोच त्यांना श्वास घेणे कठीण होऊ लागले. (एकाएकी) त्यामुळे त्यांच्या नातवाने नाईलाजाने हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात (Intensive Care Unit) दाखल केले. ही अंत:करणाचा ठाव घेणारी दुसरी बातमी होती. ३०-४० वर्षात एकदाही ॲलोपॅथीचे औषध न घेतलेल्या गृहस्थाला कृत्रिम श्वासोच्छवास कृत्रिम अन्नपुरवठा म्हणजे हरणाला मासांचा तुकडा खाऊ घालण्याचा प्रकार झाला. घरी न्या, हे मला नको, असा त्यांचा आग्रह; तर डॉक्टर एकामागोमाग एक आधुनिक उपाययोजनेच्या मागे मग्न. अशा परिस्थितीत घरच्या माणसांना चूप राहण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. आजोबांनीही पाहिले की हे लोक आपल्याला घरी न्यायला तयार नाहीत, तेव्हा त्यांनी आपल्या पूर्व स्वभावानुसार सर्व शांतपणे घ्यायचे ठरविले आणि आजी गेल्यानंतर (त्यांची बायको) गेली ३०-४० वर्षे सोबती असलेल्या परमेश्वराच्या नामजपाचा मनातल्या मनात आधार घेत यथावकाश शांतपणे त्यांनी आपला देह त्या विश्वचालकाला समर्पित केला. शेवटी परमेश्वराने व्यवहारी जगातील आमची इच्छा अतृप्त ठेऊनच त्यांना उचलले. प्रसन्न मनाने जगाचा निरोप घेतलेल्या आजोबांची मूर्ती मात्र माझ्या मन:चक्षूसमोर कायमचे घर करून गेली.

❑❑

## मला वाटते

मला वाटते
तव पूजेस्तव अशी करावी
एक कविता भाव फुलांची
जशी गुंफीली बकुल फुलांची
अन् रेशीम धागी माळ मण्यांची

क्षणात पडते टपकन अन्
भाव फूल ते माझ्या हृदयी
आठवणींची फुले सुगंधी
झरझर वेची भाव फुलारी

एक एक ते फुल हुंगिता
आनंदाचे तरंग उठती
नील जळावर जसे उमटती
उमलूनि यैता नील कमलिनी

नकोच मजला तुळस मंजिरी
नको मला ते बेल पत्रही
वाहीन तुजला भावपुष्प मी
मम भक्तीभाव हा तव चरणी

**– डॉ. पुष्पा पिंपळनेरकर**
8275875662, ग्रुप नं. २६

**On Lighter Side**

- What did the left eye say to the right eye ?
  **Between you and me, something smells.**
- Which is faster, hot or cold ?
  **Hot, because you can catch cold.**
- How do celebrities stay cool ?
  **They have many fans.**
- Did you hear about the guy whose left side was cut off ?
  **He's all right now.**
- I stayed up all night and tried to figure out where the sun was.
  **Then it dawned an me.**
- Why was six afraid of seven ?
  **Because 7-8-9.**
- Why couldn/t the bicycle stand up by itself ?
  **It was two tired.**
- Why should you never trust stairs ?
  **They're always up to something.**
- How do you measure a snake ?
  **In inches - they don't have feet.**
- Where should you stand in a room if you're feeling cold ?
  **The corner, they are usually 90 degrees.**
- Why spiders are great web developers ?
  **Because they like finding bugs.**

Assist 4 Parents
Your trusted caretaker

**तुम्ही लहानाचे मोठे होत असतांना पालकांनी जेवढे शक्य होते तेवढे तुमच्यासाठी केले, मग आता त्यांची काळजी तुम्ही घ्यायला नको का?**

## असिस्ट ४ पेरेंट्स संस्थेचे उद्दिष्ट

**परदेशात तुम्ही उत्तम रीतीने स्थिरस्थावर झालेले आहात आणि आता तुम्ही भारतात कायमस्वरूपी परतण्याची शक्यता नाही. तुमचे पालक भारताबाहेर कायमचे वास्तव्य करण्यास तयार नाहीत. पालकांना आपला वृद्धापकाळ भारतात उत्तम रीतीने घालवयाचा आहे तथापि भारतातील वृद्धसेवी संस्थांबरोबर खूप पाठपुरावा करावा लागतो. तुमच्या दैनंदिन व्यापात तुम्ही खूप व्यग्र असल्यामुळे हे काम तुम्ही परदेशात राहून करू शकत नाही असिस्ट ४ पेरेंट्स हि संस्था वृद्धसेवा पुरवताना तुमचे आणि पालकांचे नातेसंबंध अधिक दृढ करते. आम्ही तुमचे प्रतिनिधी म्हणून भारतात सेवा देतो.**

## थोडेसे आमच्या विषयी

- **आमच्या संस्थेतील मंडळींनी भारत, अमेरिका, इंग्लंडमध्ये राहून आय. टी. क्षेत्रात काम केले आहे.**
- **विविध आय्. आय्. टी., आय्. आय्. एम्., आर्. इ. सी. मधून उच्च शिक्षण घेतल्यानंतर, जगभरातील नामांकित कंपन्यांमधून आम्ही मोठ्या हुद्द्यावर प्रत्यक्ष काम करत आहोत किंवा आता निवृत्त झालो आहोत.**
- **आमच्या वयस्कर पालकांची काळजी आम्ही घेत असल्याने त्यांच्या गरजा आणि मुलांकडून त्यांच्या असलेल्या अपेक्षांची आम्हाला जाणीव आहे.**

## आमच्या सेवा

• आरोग्यविषयक • आर्थिक व्यवहारासंबंधी • तंत्रज्ञाना विषयी मदत • घराचे नूतनीकरण
• घरगुती गरजांबाबत • घराची देखभाल व दुरुस्ती • व्यक्तिगत सेवांबाबत • गरजेनुसार अन्य सेवा

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**नीलेश ओंकार (CEO, असिस्ट ४ पेरेंट्स) ९७३००१३४७६**

**www.assist4parents.com** आमचा ई-मेल: : **info@assist4parents.com**

*With Best Compliments From*

ACW

# ADITYA
## COLOUR WORLDS

**Undertake All types of Painting Work**
**Authorised Applicator of Asian Paints Ltd.**

Address
**Yashwant Bedge**
S. No 5/4, Matapita, Shinde Wasti Nere
Tal. Mulshi, Dist. Pune
Pune 411033, Maharashtra



Email: yabedge@gmail.com

Phone: 9881166924/9764356293

# एक आदर्श व निष्ठावान शिक्षक - प्रा. डॉ. विश्वनाथ दादाराव कराड

- विद्याधर देशपांडे
9867621272, ग्रुप नं. १४



- संस्थापक, अध्यक्ष व महासंचालक विश्वशांती केंद्र (आळंदी) माईर्स एमआयटी, पुणे, भारत
- मानवाधिकार, लोकशाही, सहिष्णुता व विश्वशांतीसाठीचे युनेस्को अध्यासन प्रमुख
- सदस्य, वर्ल्ड असोसिएशन ऑफ नॉन-गव्हर्नमेंटल ऑर्गनायझेशन्स, न्यूयॉर्क.
- संस्थापक सदस्य, वर्ल्ड फोरम ऑफ नेटवर्क, स्पेन
- सदस्य, आंतरराष्ट्रीय सल्लागार मंडळ, विश्वशांतीच्या आंतरधर्मीय आणि आंतरराष्ट्रीय संघटना, न्यूयार्क.
- सदस्य, संचालक मंडळ, भारतांतर्गत युनायटेड स्टेटस एज्युकेशनल फाऊंडेशन, नवी दिल्ली
- कार्याध्यक्ष, श्री क्षेत्र आळंदी - देहू परिसर विकास समिती

**अल्प परिचय :**

महाराष्ट्रातील मराठवाड्यासारख्या मागास भागातील लातूर तालुक्यात अत्यंत दुर्गम अशा रामेश्वर (रूई) या छोट्याशा खेड्यात दिनांक ३/२/१९४१ रोजी वारकरी कुटुंबात जन्म झाला. अध्यात्मिक पार्श्वभूमी लाभलेल्या प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांना लहानपणापासूनच भारतीय संस्कृति, परंपरा आणि सांस्कृतिक चालीरीती यांचा अभिमान वाटतो. शैक्षणिक कार्याचा ठसा उमटवत असतानाच त्यांनी स्वत: सुरू केलेल्या मूल्याधिष्ठीत वैश्विक शिक्षण प्रणालीचा अवलंब त्यांच्या शैक्षणिक संस्थेमधील सर्व विभागांमध्ये त्यांनी प्रत्यक्ष अवलंबिला. त्यामुळेच त्यांच्या दूरदृष्टीच्या डोळस नेतृत्वामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरही अनेक मानमरातब त्यांना प्राप्त झाले आहेत.

प्रा. विश्वनाथ कराड यांची राहणी अत्यंत साधी असून, त्यांची वृत्ती अत्यंत नम्र आहे. तात्विक विचारांची बैठक असल्यामुळे प्रत्येक गोष्टीमध्ये ते बारकाईने विचार करून आपले कार्य करीत असतात. विश्वबंधुत्व, आंतरधर्मीय सामंजस्य व बंधुभाव या तत्वांचे त्यांच्या जीवनात अढळ स्थान आहे. त्यामुळेच ते स्वत: जाती-धर्मापलीकडचा विचार करून प्रत्येकाला सन्मानाने वागवीत असतात. सर्व धर्म समान असून त्यांची शिकवण ही मानवाच्या कल्याणासाठीच असते हे तत्वज्ञान प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी ते अविरतपणे कार्य करीत असतात.

प्रा. विश्वनाथ कराड हे एक बहुआयामी व्यक्तिमत्व असून त्यांच्या जीवनाचे अनेक पैलू त्यांच्या कार्याच्या अविष्कारातून स्पष्टपणे दिसून येतात. त्यांच्यातील हाडाचा शिक्षक, कुशल अभियंता, स्थापत्यशास्त्र तज्ञ, वक्तृत्व कला, थोर मानवतावादी व तत्सम सद्गुणांचे दर्शन हे त्यांच्या व्यक्तिमत्वात क्षणोक्षणी दिसून येते.

प्रा. कराड यांना निसर्गाबद्दल अत्यंत आकर्षण असून वसुंधरेचे पर्यावरण रक्षण व प्रदूषण नियंत्रण या कार्यात त्यांनी जीव ओतून कार्य केले आहे व करीत आहेत.

प्रा. विश्वनाथ कराड यांच्यामध्ये मूलत:च औपचारिक व अनौपचारिक शैक्षणिक कार्याबद्दल जाज्वल्य निष्ठा असून विश्वशांती संस्कृति रूजविण्यासाठी त्यांनी विश्वशांती केंद्राची सन १९९६ मध्ये संस्थापना केली आणि या केंद्रांद्वारे अनेकविध समाजोपयोगी व शैक्षणिक असे अभिनव उपक्रम त्यांच्या नेतृत्वाखाली राबविले गेले आहेत. त्यामुळेच त्यांच्या शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांमध्ये समाजाप्रती सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होत राहिला आणि हे विद्यार्थी पुढे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:बरोबरच एम.आय.टी. संस्थेचाही नावलौकिक वाढवित राहिले.

स्वामी विवेकानंदांच्या, 'विज्ञान आणि अध्यात्म यांच्या समन्वयातूनच जगात शांतता निर्माण होईल!', या ध्येयाने प्रेरित होऊन, डॉ. कराड यांनी त्यांच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली. मूल्याधिष्ठित वैश्विक शिक्षण पद्धतीतून ''माईर्स, एमआयटी'',

पुणे, या संस्थेची स्थापना सन १९८३ केली. या संस्थेच्या माध्यमातून चारित्र्यसंपन्न असे आदर्श नागरिक/ विद्यार्थी निर्माण करण्यासाठी, ज्ञानदानाचे पवित्र कार्य करण्याचा नम्र प्रयत्न ते अव्याहतपणे करीत आहेत.

प्रा. कराड यांच्या संस्थेच्या ध्येयाची मूर्तीमंत प्रतिके म्हणजे, पुण्याची 'एमआयटी', 'एमआयटी स्कूल ऑफ मॅनेजमेंट' आणि 'महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी', 'एमआयटी महिला अभियांत्रिकी महाविद्यालय', 'नौका अभियांत्रिकी महाविद्यालय', श्रीक्षेत्र आळंदी येथील 'महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग' हे इंजिनिअरिंग कॉलेज, तसेच लातूर आणि तळेगाव येथील 'वैद्यकीय महाविद्यालये', अंबेजोगाई येथील 'पब्लिक स्कूल', आणि अन्य पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालये त्यांनी यशस्वीपणे उभी केलीत. केवळ महिलांना तांत्रिक शिक्षण देण्यासाठी सुरू केलेले, 'श्री सावित्रीबाई फुले तंत्रनिकेतन' म्हणजे तर संस्थेचे अभिमान चिन्हच आहे.

संस्थेच्या पुढाकाराने आणि जनताजनार्दनाच्या सहकार्याने, श्रीक्षेत्र आळंदी - देहू परिसर विकास समितीतर्फे, इंद्रायणीकाठी, 'पर्यावरणसुधार व प्रदूषण नियंत्रण' कार्याद्वारे, तीर्थक्षेत्र विकासाचे आणि भक्तांच्या आरोग्य सेवेचे कार्य त्यांनी अनेक वर्षांपासून सुरू केले आहे. तीर्थक्षेत्रे ही खऱ्याखुऱ्या अर्थाने ज्ञानतीर्थक्षेत्रे व्हावीत, या हेतूने श्रीक्षेत्र आळंदी येथे विश्वरूप दर्शनमंच उभारून, त्यावर विश्वशांती केंद्राचे, 'श्री संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानतीर्थ क्षेत्र' साकारले आहे.

'अणू रेणू या थोकडा । तुका आकाशा एवढा ।।' या वैज्ञानिक मूलभूत तत्त्वाची प्रचिती देणारी श्री क्षेत्र देहू येथे 'थोर तत्त्वज्ञ जगद्‌गुरू संत श्री तुकाराम महाराज ज्ञान-कर्म-भक्तियोग महाद्वारा'ची उभारणी केली आहे.

प्रा. कराड यांनी पुणे आणि जिनिव्हा येथे दोन ''जागतिक तत्त्वज्ञान परिषदा'' आयोजित केल्या, तसेच श्रीसंत ज्ञानेश्वर-तुकाराम महाराज स्मृति व्याख्यानमाला आणि आशिया-पॅसिफिक विभागीय अशा जागतिक स्तरावरील मानवी हक्क, विश्वशांती शिक्षणविषयक परिषदेच्या विचारमंथनातून, त्यांनी ''विश्वशांती विद्यापीठ' निर्मितीकडे वाटचाल सुरू ठेवली आहे.

**प्रा. कराड यांना मिळालेले प्रमुख मानसन्मान :**

प्रा. डॉ. वि. दा. कराड यांना अनेक मानसन्मान आजवर मिळाले आहेत. भारतीय तंत्रविज्ञान शिक्षण परिषद, नवी दिल्लीच्या वतीने १९९२ साली तंत्रविज्ञान तांत्रिक शिक्षणातील त्यांच्या अद्वितीय कार्याच्या योगदानाने ग्रामीण विकासाचे कार्य आणि श्री क्षेत्र आळंदी देहू येथील पर्यावरण प्रदूषण नियंत्रणाच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल ''राष्ट्रीय पारितोषिक'' देऊन यथोचित असा त्यांचा सन्मान करण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र आळंदी-देहू या पवित्र स्थळांच्या प्रदूषण नियंत्रण चेहरा मोहरा बदलून ग्राम विकासाचे क्षेत्रात स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल त्यांना 'माधव - मंदाकिनी' पारितोषिक देऊन गौरवण्यात आले आहे.

आदर्श शिक्षक म्हणून पुणे नगर पालिकेने १९८५ साली त्यांना सन्मानित केले आहे. तसेच शालेय व महाविद्यालयीन जीवनात शैक्षणिक क्षमतेत त्यांना अनेक पारितोषिके मिळाली आहेत.

या खेरीज खालील पुरस्कारांने डॉ. कराडांना आजपर्यंत सन्मानित करण्यात आले आहे.

- राष्ट्रभूषण पुरस्कार -२००३
- विश्व तत्व पुरस्कार -२००१
- आळंदी भूषण पुरस्कार -१९९९
- पुण्य मुद्रा पुरस्कार -२००५
- विज्ञान रत्न पुरस्कार -२००४
- मंत्रालयम, उडपी यांचा भक्ती भूषण पुरस्कार
- प्रज्ञावंत पुरस्कार -१९९८
- समता पुरस्कार -१९९९
- झोरास्ट्रेयन कॉलेज, मुंबईचा मिलेनियम पुरस्कार - २०००
- भृगू ऋषी पुरस्कार - २००२
- मराठवाडा गौरव पुरस्कार - २००३
- गरुडा पुरस्कार - २००३
- धर्म भूषण पुरस्कार
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार
- श्री मोरया गोसावी पुरस्कार
- भारत गौरव पुरस्कार

**सन्माननीय पदे भूषविली :**

२१ नोव्हेंबर १९८५ ते ८ डिसेंबर १९९६ मध्ये झालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन सप्तशताब्दी सोहळा महासमितीचे स्वागताध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले. १ ते ४ फेब्रुवारी १९९६ दरम्यान श्री क्षेत्र आळंदी येथे

झालेल्या ६९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष राहिले. हे साहित्य संमेलन अतिशय यशस्वी झाले होते. तसेच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सप्तशताब्दी सोहळ्या निमित्ताने पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या जागतिक तत्त्वज्ञान परिषदेच्या संयोजन समितीचे ते अध्यक्ष होते. पुण्याच्या माईर्स एमआयटीच्या आळंदी येथील विश्वशांती केंद्राच्या युनेस्को अध्यापनातर्फे स्वित्झर्लंड येथे दुसरी जागतिक तत्त्वज्ञान परिषद १८ ते २१ ऑगस्ट या कालावधीत डॉ. कराड यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या संपन्न झाली. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या वतीने 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी इन इंजिनिअरिंग अँड एज्युकेशन' ही सन्मानाची पदवी त्यांना देण्यात आली.

'युनेस्को'तर्फे आता, 'माईर्स, एमआयटी, पुणे' संस्थेच्या विश्वशांती केंद्रास, मानवी हक्क, लोकशाही, सहिष्णूता व विश्वशांतीसाठी 'युनेस्को अध्यासन' सन १९९८ ला मिळाले आहे. याचे सर्व श्रेय प्रा. कराड यांच्याकडे जाते. अशा प्रकारचे हे भारतातील पहिले व दक्षिण आशिया खंडातील दुसरे अध्यासन आहे. तत्वज्ञ संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या, जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराजांच्या व स्वामी विवेकानंदांच्या आशीर्वादाने आणि सर्वांच्या सहकार्यातून हे विश्वशांति विद्यापीठाचे स्वप्न साकार होईल, असा त्यांना विश्वास वाटतो. भारतीय संस्कृती, भारतीय तत्त्वज्ञान आणि पंरपरा यावर आधारित अशा मूल्याधिष्ठीत वैश्विक शिक्षण पद्धतीतून सर्व मानव जातीला सुखाचा, समाधानाचा व शांतीचा मार्ग दिसेल यावर त्यांची पूर्ण निष्ठा आहे व या धारणेतूनच त्यांच्या कार्याची वाटचाल अहोरात्र त्यांनी चालू ठेवली आहे.

प्रा. कराड यांनी आजवर खालील प्रमाणे पुस्तके संपादित करून प्रकाशित केली.

1) In Quest of Universal Peace.
2) Harmony (Samanvaya)
3) Human Rights, Human Values and Social Change
4) "Dnyaneshwara – A Mantra for the New Millennium
5) The Bell of Hiroshima

A) Journals and News Bulletins:

1) MAEER's MIT, Pune, Journal (Quarterly): Special Issues include,

a) Education,
b) Population Problems : A Geographical Perspective,
c) Water,
d) Drought,
e) Energy,
f) Indian Agriculture in 21st Century.
g) Geopolitics and International Relations,
h) Coastal Environment Management.

प्रा. कराड यांनी आजवर विविध देशांमध्ये अनेक कॉन्फरन्सेस, सेमिनार यांमध्ये सहभागी होऊन ६० ते ६५ शोधनिबंध सादर केलेले आहेत.

अशा या थोर व्यक्तिमत्वास त्रिवार वंदन !

❑❑

---

## मायलेकी



मायलेकीने किती गप्पा मारल्या तरी त्या संपतच नाहीत । खरंतर त्यांच्याकडे एवढे बोलायला विषय कोणते ते कळत नाही ।।१।।

त्याच त्याच विषयावर बोलून चाळण झाली तरी बोलावेसेच वाटते । त्यात एक अवीट गोडी असते, प्रेमाची हे कसे कोणास कळत नाही ।।२।।

भाबडेपणाने विचारलेले लेकीने प्रश्न, त्याची फक्त काथ्याकुट होते । आईला वाटते माझं केस पांढरे झाले अनुभवाने तरी तिला कळत नाही ।।३।।

आधुनिक विज्ञानयुगाकडे, संगणकाकडे बघता आपल्यापेक्षा विचारी आहेत । ती माय जुन्या विचारातच राहून तिला जिंकण्याचा प्रयत्न करते कळत नाही ।।४।।

पण लेकही काही आपला हेका सोडत नाही, आपल्याच मतांवर ठाम असते । गप्पांत वेळ किती मजेत पटकन हसतखेळत निघून गेला हे कळत नाही ।।५।।

देवा अशाच गप्पात आम्ही रमून जाऊ देत हीच आमची प्रार्थना । अशी लाघवी, प्रेमळ विचारी लेक दिलीस यात देवापुढे आभार कसे मानावेत हेच कळत नाही ।।६।।

**– मनिषा बोरा**

९४२११४१९४५, ग्रुप नं. २५

# पुस्तक प्रकाशन समारंभ – स. रा. पटाईत

**– दीपा झानपुरे**
(श्री. पटाईत यांची सुकन्या)



'नृपो'चे माजी कार्यकारिणी सदस्य आणि 'नृपोजगत्' चे माजी संपादक श्री. स. रा. पटाईत यांनी लिहिलेल्या 'अनादि मी' (लेख संग्रह) आणि 'तरंग' (कविता संग्रह) या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा दिनांक ५ मार्च २०२२ रोजी 'एस एम जोशी सभागृह, पुणे' येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, (सुप्रसिद्ध लेखक, कथाकार, वक्ता आणि संतसाहित्याचे अभ्यासक) यांच्या हस्ते या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा पार पडला. श्री सुरेश कानगो, अध्यक्ष, नृपो हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. निमंत्रित वक्ते म्हणून सुप्रसिद्ध कवी व गझलकार श्री. दीपक करंदीकर, कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे हे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या ज्येष्ठ गुणीजनांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये श्री. एन. ए. जोशी (निवृत्त तांत्रिक सदस्य, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ), श्री. विद्यानंद महादेव रानडे (निवत्तृ सचिव, महाराष्ट्र राज्य जलसिंचन विभाग), श्री. विजय माजगावकर (ज्येष्ठ नृपो सदस्य), पंडित रत्नाकर गोखले (ज्येष्ठ व्हायोलिन वादक) यांचा समावेश होता.

या प्रसंगी श्री. स. रा. पटाईत यांनी 'अनादि मी' या लेखसंग्रहातील वैचारिक व अध्यात्मिक पार्श्वभूमी असलेले लेख, तसेच 'तरंग' या कवितासंग्रहातील जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या कविता, यांच्या लिखाणामागची त्यांची मनोभूमिका विशद केली. या पुस्तकांमधील बरेचसे लेख व कविता 'नृपोजगत्' या नियतकालिकामध्ये प्रसिद्ध झालेले आहेत. या सर्व लिखाणाचे कौतुक करणारे व प्रोत्साहन देणारे 'नृपो' मधील रसिक स्नेहीजन व सहकारी यांचे त्यांनी आभार मानले. प्रमुख पाहुणे प्रा. मिलिंद जोशी यांचे व्यासंगी परंतु खुसखुशीत भाषण ही उपस्थित रसिकांना मेजवानी ठरली. साहित्य निर्मितीच्या क्षेत्रात हल्ली अभियंते, डॉक्टर्स यांचे योगदान वाढत असल्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. तसेच इतक्या जेष्ठ वयातसुद्धा मनाचे तारुण्य व उत्साह कायम राखत ही पुस्तके लिहिल्याबद्दल श्री. स. रा. पटाईत यांच्याबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले.

संतसाहित्य तसेच अध्यात्मिक विषयावरील लेखन–वाचन या क्षेत्रात तरुणांचा सक्रिय सहभाग वाढण्याची गरज त्यांनी स्वानुभवावरून व्यक्त केली. सुप्रसिद्ध कवी व गझलकार श्री. दीपक करंदीकर यांनी 'तरंग' या कविता संग्रहातील कवितांचे रसग्रहण केले. एका मोठ्या कालखंडातील मराठी कवितेच्या विकासाच्या विविध टप्प्यांविषयी त्यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले.

श्री. सुरेश कानगो यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात 'नृपोजगत्' या नियतकालिकाची वाटचाल व त्यातील श्री. स. रा. पटाईत यांचे संपादकीय व साहित्यिक योगदान यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

श्री. विजय माजगावकर यांनी आपल्या मनोगतातून या दोन्ही पुस्तकांमधील लिखाणाला दिलखुलास दाद दिली. या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये श्री. स. रा. पटाईत यांच्या कुटुंबियांपैकी, पडद्यामागच्या कार्याध्यक्षा सौ. उमा पटाईत यांचे नियोजन, दीपा झानपुरे यांचे समयोचित सूत्रसंचालन, डॉ. ज्योति हिरेकेरूर यांचे लेख व कवितांचे भावपूर्ण अभिवाचन, रेवती पटाईत यांच्या सुरेल आवाजातील शारदास्तवन व पसायदान गान, तसेच अभिजित पटाईत यांनी केलेले आभारप्रदर्शन यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला 'नृपो' मधील सर्वश्री सुरेश व सुजाता नातू, सुभाष कुलकर्णी, भालचंद्र कुलकर्णी, राज माहुलकर, कुंदा कानगो, 'नृपोजगत्'च्या संपादिका वैदेही कुलकर्णी अशोक व सुहासिनी देशपांडे, प्रकाश कुलकर्णी आणि इतर अनेक मान्यवर

उपस्थित होते. याशिवाय श्री. स. रा. पटाईत यांचे 'महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळा'तील अनेक स्नेही व सहकारी, कुटुंबीय व मित्रपरिवार यांचीही उपस्थिती उल्लेखनीय होती.

एक देखणा प्रकाशन सोहळा अनुभवल्याची भावना उपस्थितांपैकी अनेकांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्व रसिकांना ही दोन्ही पुस्तके श्री. स. रा. पटाईत यांच्यातर्फे भेट म्हणून देण्यात आली.

❑❑

---

**एक बोलकी प्रतिक्रिया - विजय माजगावकर**

'तरंग' म्हणजे मला भावलेला एक मनस्वी आविष्कार, काव्यात्मक, अध्यात्माची झालर असलेलं जीवनावरचं प्रामाणिक भाष्य, अंतर्मुख करणारं, काहीसं अस्वस्थ करणारं, जीवाला हुरहूर लावणारं, आमच्यासारख्यांना मनोमन लाजवणारं अन् त्याचवेळी अलिप्तपणे आयुष्याचा प्रांजळ रोखठोक हिशेब करायला लावणारं हळूवार शब्दातलं चिंतन, मनन. विचारांचे तरंगापाठोपाठ तरंग मनपटलावर उमटवणारं विलक्षण अल्हाददायक शब्द माधुर्याने श्वासालाच गुंतवून ठेवणारी विचारधनाची ओंजळ आमच्यासाठी रिती केली आहे.

'शब्दांच्या पलिकडले' हा शब्दप्रयोग आपण अनेकदा करतो इथे दोन ओळींच्या मधले असा एक वेगळाच शब्दप्रयोग करावासा वाटतोय. त्याला कारण दोन ओळींमध्ये बरंच काही मनाला समृद्ध करणारं दडलंय only he who can read it could understand it. त्याची अनुभूती अनुभवू शकतो. दोन ओळीतल्या शब्दानी व्यक्त झालेल्यापेक्षा दोन ओळीमधल्या अव्यक्ताने बरंच काही मला तरी व्यक्त करून सांगितल्या सारखं वाटतंय आणि मनाला बेचैन करतंय आणि विचारप्रवृत्तही करतंय एकाच वेळी. आश्चर्य म्हणजे हे एका साहित्यिकाच्या नव्हे तर इंजिनीअरच्या लेखणीतून उतरलंय पटाईतपणे, प्रभावीपणे, सहजपणे, अकृत्रिमपणे, सराईतपणे आणि हेच भारावून टाकणारं आहे. असाध्य सहजपणे साध्य करून नामानिराळा झालाय कवी, तत्ववेत्ता, विचारवंत; हा जो कोणी आहे तो...

❑❑

## मानवंदना फुलासारखी

– प्रभाकर कुलकर्णी
8308999529, ग्रुप नं. ४

माझ्या मित्राला सोडायला मी रेल्वे स्टेशनवर गेलो असताना मला तेथे एक मिलिटरी जवान गाडीत चढताना दिसला. गाडी सुरू झाली होती. पलिकडे एक तरुणी उभी होती व हात हलवून निरोप देत होती. मला वाटले हा जवान देशाच्या रक्षणासाठी तिला सोडून जात असावा आणि प्रियकर दूर जात असताना सुद्धा त्या तरुणीचा उर अभिमानाने भरून आलेला असेल काय बरे म्हणत असेल ती ?

शत्रुसंगे युद्ध कराया पार करशील गिरी शिरी ।
मानवंदना फुलासारखी बरसत राहो तुझ्या शिरी ।।
देशाचा जो शत्रू येई खातमा त्याचा तूच करी ।
आम जनता सुरक्षित असो प्रयत्न यास्तव तूच करी ।।
जीवन झिजवी लक्तर जैसे कष्टप्रद हे जरी तरी ।
मानवंदना फुलासारखी बरसत राहो तुझ्या शिरी ।।
संसारावर तुझ्या स्वत:च्या वीर ठेवूनी जाशी दूरी ।
जनतेचा संसार फुलावा मनात इच्छा हीच धरी ।।
असत नाही पाऊल पुढती हिंडत राहे भिरी भिरी ।
मानवंदना फुलासारखी बरसत राहो तुझ्या शिरी ।।

❑❑

---

## Hearty Welcome To New Members

1. MR./MRS VIJAY AND VIDYA KULKARNI
2. MR./MRS. PRAVEEN AND ANJU GARG
3. MRS. JAYASHREE KELKAR
4. MR./MRS. SANJAY AND NEHA THAKUR
5. MR./MRS. MANOJ /DEEPA JUNNARKAR



ACE KUDALE CAR
L.KUDALE GROUP SINCE 1932
MARUTI SUZUKI ARENA
MJF Lion Deepak Kudale
MJF Lion Neeraj Kudale
Presents deepak group's
ACE KUDALE CAR PVT. LTD.
MARUTI SUZUKI AUTHORISED DEALER
SALES
SERVICE
SPARE
HADAPSAR : Manjari, Pune Solapur Road, Next to Octroi Post, Pune.
Contact : Sales : 9689914042 I Service : 9689914030 I Exchange : 9689914037 I Showroom : 020 - 67474444
BHOSARI : Janeseva Bank Compound, Under Flyover Bridge,(Old Ganesh Karyalaya), Bhosari, Pune - 411 039.
Sales - Sunil (SM) : 9689914051 I Service - Sandeep - 9552193904
Free Pick-up & Delivery (Servicing)
Insurance services are available
MARUTI DRIVING SCHOOL
MDS PARVATI 8380054455
MDS AUNDH 9552019600
MDS MANJARI 9689914039
MDS FURSUNGI 9552559973
MDS BHOSARI 9552528629
ACE KUDALE BIKING
PUNE SOLAPUR HIGHWAY
SALES | SERVICE | REPAIR
Contact : +91 8805055000
ALL RANGE AVAILABLE
FIREFOX
LECTRO
HERO SPRINT
Nilkamal
India's Favourite Furniture
ACE KUDALE FURNITURE
Bhugaon, Pune
Contact : 91122 11114
SUZUKI
ACE KUDALE SUZUKI
(A unit of Ace Kudale Car Pvt. Ltd.)
* WAGHOLI I KHARADI I VILUX TALKIES I VISHRANTWADI I SHIKRAPUR
Sales - Mahesh : : 9552512336 | Service : Vijay : 7722021841
Contact : 70304 80010
मेरा SWARAJ
ACE KUDALE GROUP
M/s. S K TRACTORS
Total Funding
simplified
+91-9021388128
info.support@totalfunding.in
www.totalfunding.in
Ace Kudale Electric
THE NEW DX SERIES
YObykes
Arun Talekar : 9689914044
ACE KUDALE E RICKSHAW
Contact - Mahesh : +91 8805055000
ACE SPICEZ
Contact : 7722021844
Web Site : www.acespicez.com Email : info@acespicez.com, contact@acespicez.com
KHADKI
VEG, NON VEG
We Accept Party /Banquet
Out Door Catering Orders
SAIRADHE IT PARK
ONLY VEG HOTEL
Behind Sheraton Grand,
Pune Station

# ANIKA PICCADILLY
PUNAWALE, **PUNE**

EXCLUSIVE 2 BHK PROJECT **INSPIRED BY BRITISH ARCHITECTURE**



**Project spread over 7 acres** with the best of amenities; Work from Home Space @ Clubhouse, Childrcare centre, SwimmingPool, Gym, Podium Garden, Tennis, Basketball, skating rink, minigolf and much more. **Book your site visit today!**

CURRENTLY THE **BIGGEST 2BHK IN PUNAWALE!**

**2BHK @RS.55 LAKHS***

**NO EMI. NO INTEREST.***
FOR 18 MONTHS
**NO PROCESSING FEE.***

- **TOP NOTCH AMENITIES**
- **INSPIRING ARCHITECTURE**
- **EXCELLENT LOCATION**

CALL FOR **VALUE PRICE** **7720058058, 7720059059**

A project by Arun Sheth & Co.™

Anika Piccadilly Phase 1 - P52100022784.
http://maharera.mahaonline.gov.in

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

* T&C Apply

Book-Post

To, ______________________

**NON RESIDENT INDIANS' PARENTS' ORGANIZATION**
Flat No. 6, Phule Chambers, Shivdarshan Chowk,
Parvati, Pune 411 009.
**E-mail :** nripoho@yahoo.co.in • **Website :** www.nripopune.org